म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ........
दा. क्र. ४०८७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

IRBK-0104097

# संस्कृत कवींचीं नाट्यकथानकें

## भाग दुसरा

नीळकंठ शंकर नवरे
बी. ए. (ऑ.), बी. टी.
सेवानिवृत्त प्राचार्य, अध्यापक विद्यालय, पनवेल

डॉ. के. ना. वाटवे, एम्. ए., पीएच्. डी., पुणें ह्यांचा उपोद्घात

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

IRBK-0104097
IRBK-0104097

ज्या संस्थेचें तिच्या जन्मापासून पहिलीं पांच वर्षें संगोपन करण्याची संधि मला लाभली आणि –

ज्या संस्थेनें माझ्या जीवनांत नव्या निर्मितीचा आनंद मला मिळवून दिला आणि –

ज्या संस्थेंतील अध्यापकांनीं व विद्यार्थ्यांनीं सौहार्द व संस्कृति यांचा साक्षात्कार घडविला –

**त्या पनवेल येथील अध्यापक विद्यालयास –**

**— नी. शं. नवरे**

सर्वाधिकार सुरक्षित

प्रथमावृत्ति : ऑगस्ट, १९५२

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई ४

# उपोद्घात

संस्कृत भाषा म्हणजे प्राचीन भारतीय विद्यांचें क्रीडामंदिर, कलांचें केलासस्थान, सद्विचाररत्नांचें भांडार, तत्त्वज्ञानाची तपोवाटिका, सदाचाराचें प्रयाग. थोडक्यांत सांगावयाचें तर संस्कृत भाषा म्हणजे भारतीय आर्यांनीं दहा सहस्र वर्षे जोपासलेल्या आर्य संस्कृतीची रत्नमञ्जूषाच होय. हिच्यामधील चैतन्यशक्तीवर भारतीय पिंड पोसला आहे. भारताच्या संकटकालांत ह्याच चैतन्यशक्तीनें भारतास सावरून धरलें आहे. त्यामुळें संस्कृतांतील भारतीय संस्कृति हें भारताचें कायमचें विश्वासस्थळ आणि आशास्थान होऊन बसलें आहे. संस्कृत भाषा जाणणारांस तिच्यामधील चैतन्यशक्तीचा लाभ साक्षात् होतो. देशभाषा जाणणारांना मात्र तो अप्रत्यक्षपणें त्या त्या भाषांच्या द्वारा करून घ्यावा लागतो.

महाराष्ट्रांत सुमारें सातशें वर्षांपूर्वी संस्कृतांतील ज्ञानभाण्डार मराठी बोलणाऱ्या बहुजन समाजाला मराठी काव्याच्या द्वारेंच खुलें करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. कारण त्या वेळीं खऱ्या जिवंत संस्कृतीचें अज्ञान व प्रमत्त यावनी सत्ता ह्यांच्या दुहेरी पाशांत तो बेजार झाला होता. मराठी संतकवि आणि पंडितकवि ह्यांनीं आपल्या प्रासादिक मराठी काव्याच्या अनुपानानें संस्कृतांतील ऐक्यवर्धक विचाररसायन महाराष्ट्रास पाजून त्याला त्या वेळीं ताजातवाना केलें. ती त्याची टवटवी अठराव्या शतकाअखेर टिकली. पुढें आंग्ल सत्तेच्या पक्षघातानें भारत पुन्हा एकदा जर्जर झाला. तो अवनतीचा काळ शें-सव्वाशें वर्षे टिकून होता. तोही दुबळेपणा व अंधार जाऊन स्वातंत्र्यसूर्याचीं चैतन्यदायी किरणें भारतावर पसरलीं आहेत. ह्या स्वातंत्र्यरवीच्या उदयाला जशी भारतीय चैतन्यशक्ति संस्कृत भाषेंतील संस्कृतीच्या पुनरुज्जीवनानें ह्याही वेळीं उपयोगी पडली, तशी पाश्चात्यविद्याही इंग्रजी भाषेच्या द्वारा कारणीभूत झाली हें मान्य करावयास पाहिजे. पण ह्या वेळीं असा एक चमत्कार झाला कीं भारताचें पुनरुत्थान घडवून आणण्यास कारण झालेल्या दोन स्वकीय व परकीय संजीवनी विद्यांचाच संघर्ष झाला आणि रोग्यास बरें करणाऱ्या वैद्य–डॉक्टरांत तंटा व्हावा तसें झालें व त्यांतही वाईट गोष्ट अशी झाली कीं बऱ्या झालेल्या रोग्याचा विश्वास आपल्या जुन्या कुटुंबवैद्यावर बसण्यापेक्षां तो परक्या डॉक्टरावरच जास्त

दृढावला ! सातशें वर्षांपूर्वींच्या संत व पंडित चिकित्सकांना संस्कृत वैद्याला चुचकारून त्याची संजीवनी मराठी काव्याच्या गोड अनुपानांतून रोग्याला द्यावी लागली आणि त्यानें ती विनतक्रार घेतली. पण आजचा बरा होणारा रोगी परधार्जिणा होऊन परकी संजीवकाच्याच मागें लागला आहे. तो घरांतल्या औषधींकडे अश्रद्धेनें आणि संशयानें पाहत आहे. अशा वेळीं त्याच्यापुढें पुन्हा एकदा घरची संजीवनी विद्या विवरून मांडली पाहिजे. तिचे गुणदोष तपासले पाहिजेत. तिच्या दोषांचा परिहार व नव्या विद्येच्या गुणांचा स्वीकार करून भारताच्या पुढच्या तन्दुरुस्तीचा मार्ग चोखाळला पाहिजे. आतां परका डॉक्टर आपला दवाखाना आवरून आपल्या घरीं चालता झाला आहे. तरी त्याच्यावरील श्रद्धा मात्र अद्याप येथें रेंगाळतच आहे. तिचा उपयोग आपण आपल्या घरच्या चिकित्सापद्धतीच्या चिकित्सक तपासणीला करून घ्यावयास हवा. पण त्यासाठींसुद्धा आपल्या घरच्या कुटुंबवैद्याचा जुना बटवा देशी भाषिकांपुढें उलगडून नीट पुन्हा एकदा मांडलाच पाहिजे ! तसें करण्याला आजच्यासारखी नामी संधि पूर्वीं कधींच नव्हती.

केवळ परक्यांच्या राजकीय वर्चस्वामुळें भारतीयांच्या मनांत उत्पन्न झालेला न्यूनगंड आज कमी झाला आहे आणि स्वतःकडे स्वाभिमानबुद्धीनें पाहण्याची वृत्ति वाढत आहे. भारतीय भाग्याचे आजचे विधाते महामंत्री जवाहरलाल नेहरू हे अहमदाबाद येथील आपल्या भाषणांत म्हणाले, "भारताचा मोठ्यांत मोठा वारसा कोणता ? असें जर मला कोणीं विचारलें तर मी त्याला एकदम सांगेन कीं संस्कृत-भाषा व तिच्यांतील विचारधन." जोंपर्यंत ह्या अमोल ठेव्याच्या योगेंकरून भारतीय जीवनाला वळण लागत राहील तोंपर्यंत खऱ्या भारतीय प्रेरणा — अस्सल भारतीय प्रवृत्ति — टिकून राहतील. स्वतंत्र भारताकडे पाहण्याची पाश्चात्यांची दृष्टिही आज निवळली आहे. 'पूर्व ती पूर्व व पश्चिम ती पश्चिम ; त्यांचें मीलन कदापि होणार नाहीं,' असें ताठरपणें उद्गारणाऱ्या रुडयार्ड किपलिंगची भारताविषयींची अवमानबुद्धि आजच्या विचारवंतांत उरलेली नाहीं. यूनेस्को संस्थेतर्फे परवांच दिल्ली येथें भरलेल्या तत्त्वचिंतकांच्या परिषदेंत पूर्व-पश्चिम असा भेदभाव न ठेवतां परस्पर साहाय्याच्या व अखिल मानव्याच्या उदात्त भूमिकेवरून चर्चा झाली. तिच्यामध्यें अमेरिकन तत्त्वचिंतक प्रो. क्लॅरेन्स एच्. फाऊस्ट ह्यांनीं तर पूर्व-पश्चिमेच्या कल्पित दुजाभावाचें खंडन

केलें. वैराग्नीचा उपशम व शांतता ही आजच्या जगाची नड आहे असा सर्व विचारवंतांचा रोख असून ती नड भागविण्यास पूर्वेचें — विशेषतः शांततामय आणि निर्वैर अशा भारतीय संस्कृतीचें — मार्गदर्शन लाभदायक होईल अशी आशा सर्वत्र उदित झालेली दिसत आहे. अशा वेळीं भारताच्या भावी नागरिकांनीं भारतीय संस्कृति ही अशी काय चीज आहे हें समजून घेण्याला सज्ज व्हावयास नको काय ?

भारतीय संस्कृति हें एक गहन शास्त्र आहे. त्याचा अभ्यास भारतीय तत्त्वज्ञान, भारतीय धर्म, समाजशास्त्र, विद्या, कला, इत्यादि भारतीय जीवनाच्या अंगोपांगाच्या सूक्ष्म निरीक्षणानें करावयास पाहिजे. पण तेवढें सामर्थ्य व सवड फार थोड्यांनाच असते. मात्र ह्यामुळें बहुसंख्य वाचकांनीं ह्याविषयीं निराश होण्याचें कारण नाहीं. त्यांच्यासाठींही संस्कृतीच्या अभ्यासाचें एक सुलभ साधन आहे. तें म्हणजे संस्कृत महाकाव्यें, संस्कृत नाटकें, संस्कृत कथा, इत्यादि संस्कृत ललित वाङ्मय. हें ललित वाङ्मय मोदाबरोबर भारतीय संस्कृतीचा बोधही जातां जातां आणि सूचकतेनें करून देईल. शास्त्र हें रुक्ष व अभ्यासावयास प्रथम तरी थोडें कडवट वाटतें. पण गोड अशा काव्यरसाच्या अनुपानानें तें दिलें तर मधांतून दिलेल्या औषधासारखें सेवनीय होतें, असा भामह नांवाच्या एका प्राचीन साहित्यशास्त्रज्ञाचा अभिप्राय आहे. संस्कृत ललित वाङ्मयाचा अभ्यास संस्कृतांतूनच करण्याचें सामर्थ्य ज्यांना नाहीं त्यांच्यासाठीं ह्या मधांत मराठी भाषेचें शर्करायुक्त गोदुग्ध घातलें तर तें संस्कृतिरसायन पंचामृतासारखें गोड व बलवर्धक होईल हें काय सांगावयास पाहिजे ?

संस्कृत काव्यनाटकांतील भारतीय संस्कृतिशास्त्र मराठी भाषेच्या पंचामृततुल्य अनुपानांतून देण्याचा उपक्रम माझे स्नेही श्री. नी. शं. नवरे, ह्यांनीं चोवीस वर्षांपूर्वीपासून सुरू केला आहे. त्यांनीं आजवर संस्कृत कवींचीं नाट्यकथानकें, भाग १ (७ नाटकें), 'रघुवंशकथा', 'कादंबरीकथा', 'मेघदूतकथा', इत्यादि संस्कृत ललित वाङ्मयाचा परिचय मराठी वाचकांस आपल्या सोप्या, सुबोध व प्रसन्न मराठीच्या द्वारें करून दिला आहे. आज ह्या 'संस्कृत नाट्यकथानकां'च्या दुसऱ्या भागाच्या (५ नाटकें) प्रकाशनानें आपलें द्वादशनाट्यपरिचयरूप 'तप' ते पुरें करीत आहेत. ह्या तपःसिद्धीबद्दल, मराठी वाचकांतर्फे त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांनीं प्रकाशित केलेल्या संस्कृत नाट्यवाङ्मयांतील

भारतीय संस्कृतीचें अल्पसें दिग्दर्शन करतों. ज्या सात संस्कृत कवींचीं बारा नाट्य-कथानकें श्री. नवरे ह्यांनीं दोन भागांत निरूपिलीं आहेत ते ख्रिस्तपूर्व २०० पासून ख्रिस्तोत्तर ८०० पर्यंत हजार वर्षांत होऊन गेले. म्हणजे एक हजार वर्षांच्या कालांतील भारतीय संस्कृतीचें दर्शन ह्या बारा नाटकांत आपल्यास होतें. रामायण, महाभारत, गुणाढ्याची बृहत्कथा, कांहीं खरा इतिहास व कांहीं कल्पित प्रसंग हे बारा नाटकांचे आधार आहेत. एक 'मृच्छकटिक' सोडल्यास बाकीच्या सर्व नाटकांतून समाजाच्या वरच्या थरांतील स्त्रीपुरुषांच्या व्यवहाराचें वर्णन आहे. त्या काळीं आजच्याप्रमाणें लोकशाही व सामाजिक समता नव्हती. त्या वेळची राज्यपद्धति चातुर्वर्ण्यबद्ध होती. तथापि त्या वेळचे आदर्श राजे प्रजाहिततत्पर व चारी वर्ण गुण्यागोविंदानें आपापलीं नियत कर्तव्यें पार पाडणारे होते. ह्या नाटकांत क्षत्रिय राजांचें जीवनच प्राधान्यें करून वर्णिलें असून, ब्राह्मण, वैश्य व शूद्र ह्यांचींही जीवनचित्रें मधून मधून प्रसंगोपात्त रेखाटलीं आहेत. तथापि आपापलीं नियत कर्तव्यें तत्कालीन धर्माप्रमाणें चोख रीतीनें पार पाडणारे वर्णविरहित मानव ह्या दृष्टीनें त्यांतील स्त्रीपुरुषांची सांस्कृतिक पातळी आपण तपासून पाहूं.

भासाचें 'प्रतिमा' व भवभूतीचें 'उत्तररामचरित' ह्या दोन नाटकांत रामचंद्राचें संपूर्ण चरित्र चित्रित केलेलें आहे. ज्यांत आर्य संस्कृतीनें आपलें स्पष्ट प्रतिबिंब उमटलेलें पाहावें असा आरसा म्हणजेच रामचरित्र ! कौटुंबिक व सामाजिक जीवनांतील नीतितत्त्वांचे प्रत्यक्ष पाठ म्हणजे रामचरित्र ! सत्यनिष्ठा, त्याग, पितृभक्ति, पातिव्रत्य, बंधुप्रेम, स्वामिभक्ति, प्रजावात्सल्य, निर्भयता व पराक्रम ह्या सद्गुणांच्या चालत्याबोलत्या मूर्ति म्हणजेच राम, सीता, लक्ष्मण, भरत आणि हनुमान हीं पात्रें होत. हीं दोन्ही नाटकें अमुक एक विषय किंवा घटना मुख्य कल्पून त्यावरच सर्व लक्ष केंद्रित करणारीं नाहींत. तीं चरित्र-प्रधान आहेत. म्हणजे रामाचें पूर्व व उत्तर चरित्र त्यांत वर्णिलें आहे. त्यांतील पात्रांच्या उदात्त चारित्र्याचा उठाव दाखविला आहे. पण इतर नाटकांचें तसें नाहीं. त्यांतील दोन नाटकें 'वेणीसंहार' व 'मुद्राराक्षस' युद्ध व राज्यक्रान्ति ह्या विषयांवर असून त्यांत पांडवांचा जय व राक्षस नांवाच्या प्रधानाचें वशीकरण हीं ध्येयें दृष्टीसमोर ठेविलीं आहेत. बाकीचीं आठ नाटकें — शाकुन्तल, विक्रमोर्वशीय, मालविकाग्निमित्र, स्वप्नवासवदत्त, मृच्छकटिक, रत्नावलि,

नागानंद आणि मालतीमाधव — प्रणयप्रधान आहेत. त्यांत नायक-नायिकेचें मीलन अनेक आपत्ति व संकटें ह्यानंतर झालेलें दाखविलें आहे.

" प्रणयांत व युद्धांत कोणतींही बरींवाईट साधनें वापरलीं तरी चालतात; साध्य गवसलें म्हणजे झालें." ( Everything is fair in love and war. ) अशी एक इंग्रजी म्हण आहे. सामान्य व्यवहार ह्या दृष्टीनें ती ठीक आहे. पण कोणत्याही समाजांतील माणसें ह्या प्रणयाच्या व युद्धाच्या व्यवहारांतच कशीं वागतात हें मुद्दाम बघावें लागतें. कामप्रवृत्ति व दुसऱ्यावर चढाई करून आपलें वर्चस्व स्थापण्याची प्रवृत्ति ह्या माणसाच्या दोन जबरदस्त सहज प्रवृत्ति ( Instincts ) आहेत. तो मानवाचा दुर्दम्य निसर्ग आहे. पण ह्या अंतर्गत निसर्गावर विजय मिळविणें — त्याला नियंत्रित करून उच्च वैयक्तिक आणि सामाजिक श्रेय साधणें — ह्यालाच संस्कृति म्हणतात. भारतीय संस्कृतींत अर्थ म्हणजे धन आणि उपभोगाचीं इतर साधनें मिळविणें व काम म्हणजे त्यांच्या द्वारा सर्व इच्छा-आकांक्षांची तृप्ति करणें हे दोन पुरुषार्थ मानलेले असले तरी त्यांवर धर्म आणि मोक्ष ह्या उच्चतर ध्येयांचें नियंत्रण आहे. धर्म आणि मोक्ष ह्यांना अविरुद्ध म्हणजे अनुकूल काम व अर्थ ही आमच्या संस्कृतीची गुरुकिल्ली आहे. ह्या दृष्टीनें पाहिल्यास पांडवांचें कौरवांशीं युद्ध हें धर्म्य आहे. भीम व द्रौपदी ह्यांची तेजस्विता व युद्धिष्ठिराचा सात्त्विकपणा हीं आदर्शभूत आहेत. 'मुद्राराक्षसां' तील सर्वच व्यवहार सात्त्विक नसला व सर्वच साधनें शुचि नसलीं तरी चाणक्याची निर्लोभी वृत्ति व त्याच्या राजकारणाचें अंतिम ध्येय ह्या गोष्टी प्रशंसनीयच आहेत. स्वतःच्या बुद्धिबलानें प्रचंड राज्यक्रान्ति घडवून आणणारा हा महामंत्री वल्कलें परिधान करून एका साध्या खोपटांत राहतो व चंद्रगुप्ताचें संपूर्ण राज्य नंदाच्याच एका कुशल प्रधानावर सोंपवून आपण तपश्चरणांत उरलेलें आयुष्य घालवितो हें केवढें उदात्त दृश्य आहे !

मृच्छकटिक, विक्रमोर्वशीय, मालविकाग्निमित्र, रत्नावलि व मालतीमाधव ह्यांतील प्रणयाची प्रत मध्यमच म्हणावी लागेल. ह्यांतील सर्व नायक उच्च दर्जाचे असून त्यांतील नायिकांपैकीं तीन उत्तम कुलांतल्या कुमारिका आहेत आणि दोन साधारण स्त्रिया म्हणजे एक वेश्या व दुसरी देवांगना आहे. पण परक्याची स्त्री प्रेमाचा विषय करणें हा जो प्रणयाचा अधम प्रकार तो आमच्या नाट्यवाङ्मयांत नाहीं. ह्या दृष्टीनें ज्याला इंग्रजी वाङ्मयेतिहासांत 'रेस्टोरेशन

पीरिअड ' म्हणतात त्यांतील सांवळागोंधळ पाहण्यासारखा आहे. वुइलसन ह्यानें आपल्या 'The Hindu Theatre' ह्या पुस्तकांत आमचीं प्रणय-नाटकें आणि ड्रायडन व कॉंग्रीव्ह ह्यांच्या कलाकृति ह्यांची तुलना करून संस्कृत नाटकांतील प्रणयाच्या शुद्धतेबद्दल मोकळ्या मनानें प्रशंसोद्गार काढले आहेत. पण वरील पांच नाटकांना मीं मध्यम प्रतीचीं नाटकें म्हटलें ह्याचें कारण असें कीं त्यांत प्रणय हेंच साध्य आहे. त्यांतील नायक प्रेमासाठींसुद्धा मोठा त्याग करीत नाहींत. त्यांना एकदोन पत्न्या असूनही (त्या वेळीं बहुपत्नीकत्वाची रूढी होतीच म्हणा!) दृष्टीस पडलेल्या सुंदर कुमारिकेवर ते आसक्त होतात. ह्या कुमारिका त्यांच्या पालकांनीं ह्या नायकांना देण्यासाठींच नियुक्त केलेल्या असल्या तरी त्या नायकांना हें माहीत नसतें. अशा स्थितींत त्यांच्या लाभासाठीं हे नायक आपण स्वतः किंवा आपल्या हस्तकांकरवीं अनेक खटपटी लटपटी करीत असतात! (मालविकाग्निमित्र व रत्नावलि पाहा.) तथापि ते सर्व आपल्या पूर्वींच्या स्त्रियांशीं दाक्षिण्यानें वागतात, त्यांचा धाक बाळगतात व त्यांची क्षमाही मागतात. सर्व नायिका मात्र त्यागी, अनुरक्त व पूर्णपणें पातिव्रत्य पाळणाऱ्या आहेत. स्त्रीची नीतिमत्ता हाच संस्कृतीचा खरा आधार आहे. स्त्री जोंपर्यंत अविचलित व नीतिप्रवण आहे तोंपर्यंत संस्कृति व समाजस्वास्थ्य अबाधित राहतें. अशी स्थिति वरील नाटकांत खासच आहे.

संस्कृतिदृष्ट्या उत्तम दर्जाचीं प्रणयनाटकें म्हणजे शाकुन्तल, नागानंद व स्वप्नवासवदत्त हीं होत. शाकुन्तलाच्या पहिल्या भागांत शारीरप्रेमाचा अंश असला तरी त्यांतील नायक-नायिकेचें खरें मीलन संपूर्ण उदात्ततेंतच होतें. पश्चात्ताप आणि तपस्या यांनीं विशुद्ध झालेला व अपत्यप्रेमानें मंगल झालेला दुष्यन्त-शकुन्तला-प्रणय हा भारतीय कौटुंबिक जीवनाचा आदर्शच होय. स्वप्नवासवदत्तांतील नायक उदयन व नायिका वासवदत्ता ह्यांचा प्रणय उच्च आहे. वासवदत्तेवरील उत्कट प्रेमामुळें उदयन ह्याचा प्रणय उच्च प्रतीचा आहे. वासवदत्तेवरील उत्कट प्रेमामुळें उदयन हा इतर स्त्रीपराङ्मुख आहे. त्याला वासवदत्तेच्या मृत्यूमुळें व राजकारणांतील पेंचामुळें पद्मावतीशीं विवाह करणें भागच पडलें तरी त्याचें सर्व लक्ष (त्याच्या समजुतीप्रमाणें) मृत वासवदत्तेवर केंद्रित झालेलें असतें. पूर्वपत्नीच्या प्रेमाबद्दल इतकी एक-निष्ठा वरील नाटकांपैकीं एकाही नाटकांतील नायकाच्या ठायीं नाहीं. वासवदत्तेच्या पतीसाठीं

केलेल्या त्यागाला तर इतर नायिकांत तोडच नाहीं. जुलमानें नव्हे तर स्वखुषीनें ती सवतीच्या घरीं अज्ञातवासाचा अपमान सोसून राहते व राज्यरक्षणासाठीं आपल्या पतीचें लग्न तिच्याशीं लावून देते. इतर नायिकांनींही सवती खपवून घेतल्या आहेत. पण तें त्यांचा निरुपाय होतो म्हणून. तो त्यांचा धर्मावर सोमवार होता !

सर्व प्रकारच्या त्यागाचें उत्तम उदाहरण म्हणजे 'नागानंद' नाटक. ह्यांतील नायक जीमूतवाहन हा तारुण्य व राजवैभव ह्यांनीं संपन्न असतांही बुद्धाप्रमाणें विरक्त आहे. विनय, सेवा, त्याग, तपस्या, अहिंसा, सत्य व परोपकार याच त्याच्या प्रभावी प्रेरणा आहेत. मलयवतीसारख्या त्रिभुवनसुंदरीशीं विवाह झाल्यावरही तो विषयसुखांत रमत नाहीं. शंखचूड नांवाच्या नागाचा जीव वांचविण्यासाठीं तो आत्मबलिदान करण्यास सिद्ध होतो. विवाहांतील रक्तवस्त्रें परिधान करूनच तो वध्यशिळेवर चढतो ! विवाहवस्त्रांना केवळ परजीवित-रक्षणासाठीं स्वतःचीं वध्यचिन्हें बनविणें ही सात्त्विक त्यागाची शुद्ध परिसीमा होय. ह्या अहिंसातपामुळेंच जीमूतवाहनाचा शत्रु हा युद्धावांचून त्यास शरण आला.

नैतिक अधःपात व उच्च जीवनमूल्यांचा ऱ्हास ज्या काळीं झालेला असतो अशा काळींसुद्धा माणसाच्या सुप्त जीवनशक्तीप्रमाणें सुप्त संस्कृति दिसून आली तर तो परंपरागत संस्कृतीच्या संधारकशक्तीचा खरा प्रभाव होय. मृच्छकटिकांत हीच स्थिति आहे. त्यांतला समाज अधःपतित आहे. तेथें अन्याय, अरेरावी, व्यसनें व असत्य ह्यांचेंच साम्राज्य आहे. बहुतेक सर्व पात्रें कांहीं तरी दोषांनीं डागाळलेलीं आहेत. नायक चारुदत्त हा जुगारी व वेश्यासक्त आहे. नायिका ही वेश्या आहे. शर्विलक हा ब्राह्मण चोरी करतो. जुगारी लोक सर्वत्र धिंगाणा घालतात. विट व चेट अन्नासाठीं हीन-सेवा करतात. पालक राजा हा दुर्बल व अन्यायी आहे आणि शकार तर सर्व दुर्गुणांचें आगर आहे. पण अशाही स्थितींत भारतीय संस्कृतीचे सुप्त अवशेष ह्या अधःपातांतसुद्धा त्या स्त्रीपुरुषांना सावरून धरून त्यांना अखेर उदात्त बनवितात. वरील पात्रांचें बाह्य वर्तन जरी कालदोषानें थोडेंसें मलिन झालेलें दिसलें तरी त्यांच्या अंतरंगांत परंपरागत संस्कृतीचीं बीजें कायम झालेलीं होतीं. वसंतसेना ही वेश्येची कन्या असली व तिच्या भोवतालचें वातावरण दूषित असलें तरी तिच्या अंतःकरणांत पातिव्रत्य —खरें जाज्वल्य पातिव्रत्य—जागृत होतें. तिची दरिद्री चारुदत्तावरील निष्ठा

पतिव्रतेला लाजवील अशी आहे. चारुदत्त हा हाडाचा उदार, परोपकाररत, कनवाळू व निर्वैर आहे. त्याच्यामध्यें शत्रूलाही — अपकारकर्त्यालाही — उपकारानें जिंकण्याची थोर वृत्ति आहे. शर्वीलक हा कांहीं कारणानें चोरी करण्यास प्रवृत्त झाला असला तरी त्याची न्यायबुद्धि तीव्र आहे. नूतन परिणीत वधूच्या लोभावर लाथ मारून तो अन्यायी पालक राजाच्या विरुद्ध झालेल्या बंडांत लगेच सामील होतो. जुगारी संवाहक हा बुद्धश्रमणक बनून आपलें आयुष्य परोपकाराला लावतो व विटही शकारसेवेचा त्याग करतो. संस्कृतीच्या संधारक शक्तीचें हें दृश्य शूद्रकानें मोठ्या कौशल्यानें दाखविलें आहे ह्यांत शंका नाहीं. प्रस्तुत बारा नाटकांत रंगविलेला भारतीय संस्कृतीचा चित्रपट हा असा आहे. ह्या सर्व नाटकांचे कर्ते – भास, कालिदास, भवभूति, इत्यादि थोर पंडित होते आणि संस्कृतीचे मोठे अभिमानी होते. त्यांनीं वेद-वेदान्त, स्मृति-पुराणें व रामायण-महाभारत ह्यांतील संस्कृति आपापल्या नाट्यकथानकांत सगुण व साकार केली आहे.

वेद व उपनिषदें, धर्म आणि धर्मपंथ ह्यांतील ह्याच संस्कृतीच्या जोरावर ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास ह्यांनीं बुडत्या महाराष्ट्रास व भारतास सांवरून धरलें. ह्याच संस्कृतीच्या साहाय्यानें रानडे, टिळक, सावरकर, सुभाषबाबू, महात्मा गांधी, इत्यादि नेत्यांनीं भारताचें पुनरुत्थान घडवून आणलें. हीच संस्कृति ह्यापुढें स्वतंत्र भारताला संघटित, समृद्ध व संपन्न करणार आहे, असा पंतप्रधान पंडित नेहरू ह्यांचा विश्वास आहे. म्हणून ही संस्कृति अंगीं मुरवून घेऊन भारताच्या पुनर्घटनेचें महान कार्य भारताच्या नागरिकांनीं केलें पाहिजे.

त्या कार्याचा एक लहान व मनोरंजक उपक्रम म्हणून विद्यार्थ्यांनीं हीं नाट्यकथानकें अवश्य वाचावीं. त्यामुळें मूळ नाटकें वाचण्याची जिज्ञासा त्यांना होईल व मूळ नाटकें वाचल्यानें भारतीय संस्कृतीचे मूळ ग्रंथ पाहाण्याची त्यांची इच्छा वळावेल आणि संस्कृतीचा मूळ झरा हस्तगत होऊन मोठी कार्यप्रेरणा त्यांच्या ठायीं निर्माण होईल.

माझे स्नेही श्री. नवरे ह्यांनीं अशी सोय आपल्या पुस्तकांत बालवाचकांसाठीं करून ठेवली आहे ह्याबद्दल वाचकांतर्फे त्यांचे पुन्हा एकदा आभार मानतों.

के. ना. वाटवे

# थोडेंसें प्रास्ताविक

प्रस्तुत पुस्तकाची कल्पना मनांत येऊन बराच कालावधि लोटला आहे. चोवीस वर्षें झालीं त्या गोष्टीला आज. मीं संस्कृत कवींच्या नाट्यकथा लिहून पहिला भाग प्रसिद्ध केला. त्यांत कालिदासाचें शाकुन्तल व विक्रमोर्वशीय; शूद्रकाचें मृच्छकटिक, भासाचें स्वप्नवासवदत्त, भट्टनारायणाचें वेणीसंहार, विशाखदत्ताचें मुद्राराक्षस आणि भवभूतीचें उत्तररामचरित ह्या नाटकांच्या कथा दिलेल्या आहेत. त्यानंतर बाणाची कादंबरी व कालिदासाचें 'रघुवंश' महाकाव्य ह्यांच्या कथा मीं प्रसिद्धिल्या. बाणभट्टाच्या कादंबरीचा परिचय कथारूपानें मराठींतच केवळ नव्हे तर संस्कृतमध्यें करून दिला आहे. तदनंतर मराठी मेघदूतकथा प्रसिद्ध केली. हा प्रयत्न संस्कृत-मराठी वाचकांस अभिनव व उपयुक्त वाटला हें सांगण्यास मला अतिशय आनंद वाटतो. ह्याचें एक प्रत्यंतर असें कीं हा प्रयत्न येथेंच न थांबवितां आणखी राहिलेल्या प्रसिद्ध संस्कृत नाटकांचाही मराठींत परिचय करून द्यावा अशा सूचना अनेक लोकांकडून मला वारंवार होऊं लागल्या.

'संस्कृत कवींचीं नाट्यकथानकें' या पुस्तकाची द्वितीयावृत्तीही संपत आली तरी बाकी राहिलेल्या नाटकांच्या कथा आपल्या हातून अद्यापि लिहून झाल्या नाहींत म्हणून माझ्या मनाला सारखी टोंचणी लागून राहिली होती. आज योजिलेल्या नाटकांपैकीं पांच नाटकांच्या कथा लिहून मी मनाच्या रुखरुखींतून स्वतःस मुक्त करून घेत आहें. चिरमित्रांच्या जाचापेक्षां (?) स्वतःच्या मनाचा जाच फार वाईट असतो हें चांगलें प्रत्ययास आलें.

"तुमचा नाट्यकथानकांचा द्वितीय भाग केव्हां तयार होणार?" म्हणून माझे कांहीं 'संस्कृत–प्राकृत' परिचित व अपरिचित मित्र कोणी जिज्ञासेनें, कोणी सदिच्छेनें तर कोणी आतुरतेनें पृच्छा करीत. "कॉलेजमध्यें यंदा मालविकाग्निमित्र नाटक पहिल्या वर्षाला नेमिलें आहे, त्याचें कथानक तुमच्या पुस्तकांत असेल म्हणून मीं तें पुस्तक ग्रंथालयांतून मागवून घेतलें, पण त्यांत तें कथानक मला दिसलें नाहीं. मी विद्यार्थ्यांना तें कथानक वाचण्यास recommend करणार होतों," असे उद्गार माझ्या एका संस्कृत–प्राध्यापक स्नेह्यानें माझ्यापाशीं काढले होते. आज मी सर्वांना असें सांगण्यास मोकळा

झालों आहें कीं संस्कृतमध्यें जीं प्रमुख नाटकें आहेत आणि जीं कॉलेजमध्यें वारंवार नेमतात तीं सगळीं माझ्या दोन्ही भागांत आलीं आहेत कीं नाहींत हें पाहा. पहिल्या भागांतलीं सात आणि दुसऱ्या भागांतलीं पांच मिळून बारा नाटकांच्या कथा लिहून मीं बारा वर्षांनीं हें 'नाट्यतप' पुरें केलें आहे.

ह्या पुस्तकाचें सामान्य स्वरूप व धोरण माझ्या पूर्वींच्या पुस्तकांप्रमाणेंच आहे. 'मुळांतलें स्वारस्य व सौंदर्य जाऊं न देणें' हेंच तें धोरण! कालिदासाचें मालविकाग्निमित्र, भासाचें प्रतिमा, भवभूतीचें मालतीमाधव आणि श्रीहर्षाचीं नागानंद व रत्नावलि मिळून पांच नाटकें ह्या भागांत घेतलीं आहेत. त्यांचीं कथानकें गेल्या पांच वर्षांत अगदीं पिपीलिका-गतीनें लिहून काढून वेळोवेळीं माझे चिरस्नेही रसविमर्शकार डॉ. के. ना. वाटवे, ह्यांना वाचून दाखविलीं. त्यांपैकीं कांहीं नाटकें डॉ. वाटवे ह्यांनीं कॉलेजांत शिकविलीं असल्यानें त्यांच्या सूचनांचा मला फार उपयोग झाला आहे. माझे नूतन 'संस्कृत' स्नेही पनवेलचे श्री. ग. दा. टिल्लू ह्यांच्याशीं चर्चा करतांना मला काव्यशास्त्रविनोदाचा आनंद लुटतां आला त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. मी पनवेलीस असतां हा 'मित्रलाभ' झाला. तसेंच संस्कृत–प्रवेशकर्ते श्री. रा. दा. देसाई आणि गांधी–टिळक चरित्रकार श्री. दा. न. शिखरे ह्यांच्या रसिक, तीक्ष्ण व चोखंदळ दृष्टीचें मला अमोल साहाय्य लाभलें.

हायस्कुलांत संस्कृत नाटकांचे उतारे शिकवितात, त्या वेळीं शिकवितांना शिक्षकांस व अभ्यासतांना विद्यार्थ्यांस ह्या पुस्तकाचा उपयोग होईल. विख्यात संस्कृत नाटकांचा परिचय करून घेण्याच्या दृष्टीनें मराठी वाचकांस हें संग्राह्य वाटेल. कथानकाच्या ओघांत येणारीं सुभाषितें मधून मधून टीपांतून दिलीं असल्यानें संदर्भ पुस्तक म्हणून कित्येकांस तें आवडेल. सांप्रतचा काळ कथावाङ्मयाचा आहे. गोष्टीवेल्हाळांची संख्या वाढत आहे. अशा वेळीं संस्कृत नाट्य-संपत्तीची भर मराठी कथा-वाङ्मयांत पडलेली पाहून कथाप्रिय वाचकांस आनंदच होईल. सारांश, माझ्या पूर्वोक्त पुस्तकांप्रमाणें हें पुस्तकही रसिक-मान्य होऊन त्याचा उपयोग पाठ्य-पुस्तकाप्रमाणें केला जाईल असा मला दृढ विश्वास वाटत आहे.

नीळकंठ शंकर नवरे

'योगायोग', ६३०/३० सदाशिव, पुणें २

# कविपरिचय

## भास ( क्रिस्तपूर्व सुमारें दुसरें शतक )

ह्या कवीनें लहान मोठीं मिळून एकंदर तेरा नाटकें लिहिलीं आहेत. सुमारें चाळीस वर्षांपूर्वींच त्रावणकोर संस्थानांत त्याच्या नाटकांचा शोध लागला. तत्पूर्वी त्याचें नांवच काय तें संस्कृतज्ञांस माहीत होतें. शूद्रक, कालिदास, भवभूति, भट्टनारायण, विशाखदत्त, इत्यादि नाटककारांवर त्याची थोडीबहुत छाप पडलेली दिसते. कालिदासानें आपल्या 'मालविकाग्निमित्र' नाटकाच्या प्रस्तावनेंत भासाचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे, ह्यावरून त्याची योग्यता प्रतीत होते. कालदृष्ट्या 'पहिला संस्कृत नाटककार' हा मान भासालाच दिला पाहिजे. 'स्वप्नवासवदत्त', 'प्रतिमा', 'चारुदत्त', 'प्रतिज्ञायौगंधरायण', 'अविमारक', इत्यादि नाटकांमध्यें 'स्वप्नवासदत्त', 'प्रतिमा' व 'चारुदत्त' ह्या भासाच्या नाट्यकृति नितान्त रमणीय आहेत. त्याची लेखनशैली अत्यंत सोपी, सरळ व ओघवती आहे.

## कालिदास

रघुवंश आणि कुमारसंभव हीं महाकाव्यें, मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय आणि शाकुन्तल हीं नाटकें, मेघदूत आणि ऋतुसंहार हीं खण्डकाव्यें ह्यांचा कर्ता महाकवि कालिदास हा चौथ्या शतकांत होऊन गेला. संस्कृत कवींमध्यें कविसम्राट्, कविकुलगुरु म्हणून त्याची कीर्ति त्रिखंडांत पसरली आहे. जर्मन महाकवि गटे हा कालिदासाचें शाकुंतल वाचतांच आनंदानें वेडावून जाऊन नाचूं लागला ! कविच कवीला ओळखतो.

'उपमा कालिदासस्य' म्हणजे उपमा द्यावी तर कालिदासानेंच ! महाकवि बाण हा कालिदासाच्या सरस काव्याला मधुर रसानें थवथवलेल्या मंजरीची उपमा देतो !

कालिदास माळव्यांत उज्जयिनी येथें राहत असे. तो राजकवि होता. त्यानें भरतखंडांत प्रवास करून ठिकठिकाणच्या चालीरीतींचें, लोकस्थितीचें व निसर्गाचें सूक्ष्म अवलोकन केलें होतें असें त्याच्या ग्रंथांवरून दिसतें.

## श्रीहर्ष किंवा हर्षवर्धन ( इ. स. ६०६ ते ६४७ )

ह्या सम्राट् असूनही विद्वान होता. त्याची राजधानी ठाणेश्वर. तीस वर्षेंपर्यंत युद्धें करून त्यानें काश्मीरपासून आसामपर्यंत आणि नेपाळपासून नर्मदेपर्यंतचा प्रान्त आपल्या स्वामित्वाखालीं आणला. त्यानंतर त्यानें धर्मप्रचार केला. रस्त्या-रस्त्यावर त्यानें धर्मशाळा बांधून अन्नपाणी व औषधोपचार ह्यांची व्यवस्था केली. पांच पांच वर्षांनीं ह्या ' मोक्षमहापरिषद् ' भरवीत असे आणि आपला सर्व खजिना दान करून टाकी.

ह्या जसा विद्येचा भोक्ता तसा कवींचा आश्रयदाता होता. ' रत्नावलि ', ' प्रियदर्शिका ' व ' नागानंद ' हीं तीन नाटकें त्यानें लिहिलीं तीं त्याच्या विद्वत्तेची व कवित्वाची साक्ष देतात.

' श्रीहर्षो निपुणः कविः ' असा उल्लेख आढळतो. बाणभट्ट कवीला त्यानें उदार आश्रय देऊन विपुल संपत्ति दान दिली होती. बाणभट्टानें हर्षचरित्र लिहून स्वतःचें व आश्रयदात्याचें नांव अमर केलें आहे. दोघेही धन्य !!

## भवभूति

ह्या कालिदासाच्या तोडीचा कवि आठव्या शतकांत विदर्भ प्रांतांत म्हणजे वऱ्हाडांत होऊन गेला. त्याच्या वडिलांचें नांव नीलकण्ठ, मातेचें नांव जातुकर्णी आणि गुरूचें नांव ज्ञाननिधि ! ही माहिती त्यानें स्वतःच आपल्या नाटकांच्या प्रस्तावनेंत दिली आहे. त्याच्यासारखा स्वतःविषयीं आपल्या नाटकांत उल्लेख करणारा अन्य संस्कृत कवि विरळा ! त्यानें तीनच नाटकें लिहिलीं. ' मालती-माधव', ' महावीरचरित ' आणि ' उत्तररामचरित.' त्यांपैकीं ' मालतीमाधव ' हें नाटक कल्पित कथेवर रचलेलें असून त्यांत तत्कालीन समाजाचें थोडेंबहुत प्रतिबिंब पडलेलें दिसतें ! महावीरचरित आणि उत्तररामचरित ह्या दोनही नाटकांत मिळून समग्र रामचरित्र वर्णिलें आहे. करुणरस रंगविण्यांत भवभूतीचा हातखंडा ! राम आणि सीता यांचें निर्व्याज आणि उदात्त प्रेम उत्तरराम-चरितांत रंगविलें असल्यानें संस्कृतज्ञ वाचक उत्तररामचरितावर प्रसन्न होतात, तथापि भवभूतीला आपल्या आयुष्यांत योग्य तो मान मिळाला नसावा असें त्यानें केलेल्या उल्लेखावरून अनुमान निघतें.

# संस्कृत कवींचीं नाट्यकथानकें

अनुक्रमणिका


भासकृत

प्रतिमा ... ... १७

कालिदासकृत

मालविकाग्निमित्र ... ४१

श्रीहर्षकृत

नागानंद ... ... ७५

श्रीहर्षकृत

रत्नावलि ... ... ९७

भवभूतिकृत

मालतीमाधव ... ११९


भा स कृ त

# प्र ति मा

पात्रें

| | |
|---|---|
| दशरथ | अयोध्येचा राजा |
| राम<br>लक्ष्मण<br>भरत<br>शत्रुघ्न | दशरथाचे पुत्र |
| सुमंत्र | दशरथाचा वृद्ध सल्लागार व सारथि |
| देवकुलिक | प्रतिमागृहांतील एक गुरव |
| रावण | लंकेचा राजा |
| कौसल्या | रामाची माता |
| सुमित्रा | लक्ष्मण व शत्रुघ्न ह्यांची माता |
| कैकेयी | भरताची माता |
| सीता | रामाची पत्नी |
| अवदातिका | एक दासी |

" तो पाहा हेममृग ! हिमालयानें तुझी मनीषा पुरविण्या-साठींच त्याला इकडे पाठविलें आहे असें मला वाटतें."



भा स कृ त

# प्र ति मा

* भरतानें मामाच्या गांवाहून परत आल्यावर अयोध्या नगरीच्या बाहेर बाप, आजा, इत्यादि पूर्वजांच्या प्रतिमा पाहिल्या. त्यावरूनच भरताला पित्याच्या निधनाची वार्ता कळली. हा कथाभाग प्रस्तुत नाटकांत आला असल्यानें त्यास भासानें ' प्रतिमा ' हें नांव दिलें आहे.

" काय ग अवदातिके, हीं वल्कलें मीं परिधान केलीं तर मला कशीं काय दिसतील बरें ? " सीतादेवीनें वल्कलें नेसतां नेसतां आपल्या अवदातिका दासीला विचारलें.

" देवी, रूप चांगलें असलें म्हणजे त्याला सर्व कांहीं शोभतें. आपल्या अंगकांतीनें हीं वल्कलें जशीं कांहीं सोन्याचीं झालीं आहेत. "

" कोठून आणलींस तूं हीं ? "

" ऐकावें देवींनीं; आपली रंगसाहित्याची राखणदारीण आहे ना आर्यरेवा, तिच्याकडे मीं एक-दोन अशोकपल्लव मागितले. मेली अशोकपल्लवांची गोष्ट ती काय ? पण एवढीशी लहान गोष्टसुद्धा ती मला

देईना. तेव्हां म्हटलें काढावें तिचें उट्टें ! म्हणून मीं नेपथ्यगृहांतलीं हीं वल्कलें थट्टेनें उचलून आणलीं इथें. ”

सीतादेवीनें कौतुकानें वल्कलें धारण केलीं. वल्कलें धारण करतांना तिनें अवदातिकेस वरील प्रश्न विचारला आणि आरसा घेऊन येण्यास चेटीला सांगितलें. तों दुसरी एक दासी कुमार रामचंद्रांना राज्याभिषेक करण्याचें ठरलें असल्याची आनंदाची वार्ता घेऊन तेथें आली. ती वार्ता ऐकून सीतादेवीनें हर्षभरित होऊन आपल्या अंगावरील अलंकार उतरून ते वार्ता आणणाऱ्या दासीला देऊन टाकले.

राजमंदिरांत दुंदुभि वाजूं लागल्या पण त्या थोड्याच वेळांत थांबल्या. हा काय प्रकार आहे हें सीतादेवीस समजेना. इतक्यांत कुमार रामचंद्र सीतादेवीच्या मंदिरांत आले. तेव्हां सीतादेवी रामचंद्रांना म्हणाली,

“ ही चेटी ‘ अभिषेक अभिषेक ’ असें कांहीं म्हणत आहे ....”

“ हं, आलें लक्षांत. हो, तो अभिषेकच होता.’ तातांनीं आपल्या मांडीवर मला बसवून घेतलें आणि उपाध्याय, अमात्य व प्रजाजन ह्यांच्या समक्ष मला राज्याचा स्वीकार करण्यास सांगितलें. तेव्हां मीं तातांच्या पायांवर मस्तक ठेविलें. त्या वेळीं तातांच्या अश्रूंनीं माझें मस्तक भिजलें आणि माझ्या अश्रूंनीं तातांचे पाय भिजले. ”

सीतेची उत्सुकता वाढली, तेव्हां रामचंद्र म्हणाले.

“ मला राज्यावर बसवून तातांनीं तपोवनांत जाण्याचा आपला मनोदय मला सांगितला, तेव्हां राज्यभार शिरावर घेण्यास मी राजी होत नाहीं असें पाहून तातांनीं मला प्राणांची शपथ घातली. स्वत: तातांनीं माझ्या मस्तकावर छत्र धरलें. लक्ष्मण हातांत अभिषेकपात्र घेऊन उभा राहिला आणि तो माझ्या मस्तकावर अभिषेक करणार तों मंथरा हळूच येऊन तातांच्या कानांत कांहीं कुजबुजली आणि तेथेंच अभिषेक बंद पडला. सीते, तातांचें तपोवनांत जाण्याचें थांबलें म्हणून मला एक परीनें आनंद झाला. ”

तें ऐकून सीतादेवी म्हणाली, " मलासुद्धा आनंदच वाटतो आहे कीं आर्यपुत्र हे आर्यपुत्रच आहेत आणि महाराज हे महाराजच आहेत."

रामचंद्र म्हणाले, " बरं, पण आज तुझ्या अंगावर दागिने दिसत नाहींत ?"

" मीं मुळीं घातलेच नाहींत."

" छे ! हें खोटें आहे ! तूं अलंकार उतरून ठेवल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत !"

" नाहीं तरी इकडे खऱ्याचें खोटें करण्याचें कौशल्य मोठें विलक्षणच दिसत आहे !"

" बरें बुवा ? तें कांहीं कां असेना ! पुन्हा ते अलंकार घाल कसे ! मी धरतों आरसा. पण सगळेंच मुसळ केरांत. तूं आज वल्कलेंशीं नेसलीं आहेस ? माझें प्रथम त्यांच्याकडे लक्षच गेलें नाहीं." सीतादेवीनें केवळ स्मित केलें. अवदातिका जवळच होती. तिला राहवेना. तिनें सांगितलें,

" हीं वल्कलें आपल्याला कशीं काय दिसतात तें पाहण्यासाठींच देवी वल्कलें नेसल्या आहेत."

रामचंद्र म्हणाले, " मैथिलि, इक्ष्वाकु वंशांतल्या वृद्धांचा हा अलंकार आहे. आण पाहूं तीं वल्कलें इकडे. मला तीं फार आवडतात."

" पण छे ! आज आपला राज्याभिषेक रहित झाला असतां आर्यपुत्रांनीं असली अमंगल गोष्ट करूं नये," असें म्हणून सीतेनें त्यांस तीं वल्कलें घेऊं दिलीं नाहींत.

इतक्यांत दशरथमहाराजांस मूर्च्छा आल्याचें वृत्त घेऊन कंचुकी तेथें आला आणि म्हणाला, " त्या मूर्च्छेला कारण कैकेयीदेवी ह्या आहेत. भरताला राज्याभिषेक करण्याचा हट्ट त्यांनीं धरल्यामुळें हा सारा अनर्थ ओढवला." असें सांगून कंचुकी कैकेयीची निंदा करूं लागला. रामचंद्रांना ती निंदा ऐकवेना, तेव्हां ते तिच्या कृत्याचें समर्थनच करूं लागले.

इतक्यांत लक्ष्मण तेथें क्रुद्ध होऊन आला. रागानें त्याचे नेत्र लाल झाले होते. त्याच्या हातांत धनुष्यबाण होतें. जगांतील स्त्री-जातीचा उच्छेद करण्यास तो सिद्ध झालेला दिसला. रामचंद्रांना वाटलें कीं भरताला अभिषेक होत आहे, ह्यामुळेंच लक्ष्मण क्रुद्ध झाला असावा, म्हणून ते लक्ष्मणास म्हणाले,

" तातांनीं कैकेयीस आपलें राज्य शुल्क म्हणून दिलेलें आहे. ह्याकरितां राज्यावर भरताचा अधिकार आहे. ह्या कामांत तात, मी, कैकेयी किंवा भरत ह्यांपैकीं कोणाचाही दोष नाहीं. मग तूं मारणार आहेस तरी कोणाला? मी राजा असो वा भरत राजा असो, तुला दोन्ही समान आहेत. "

आपलें म्हणणें ऐकून न घेतां रामचंद्र आपणास निष्कारण दोष देत आहेत असें पाहून लक्ष्मण अश्रुपूर्ण नयनांनीं म्हणाला,

" मला राज्यलोभ लवमात्र शिवत नाहीं. पण दादा, तुम्हांला चौदा वर्षें वनवास घडणार हें ऐकूनच मला संताप आला आहे. "

दशरथमहाराजांना मूर्च्छा येण्याचें कारण हेंच असावें असें आतां रामचंद्रांच्या ध्यानांत आलें. तेव्हां त्यांनीं सीतेजवळ तीं पूर्वींचीं वल्कलें मागितलीं. सीतेनेंही तीं तात्काळ दिलीं.

रामांनीं वनांत जाण्याचा निश्चय केला. सीतेनें त्यांच्याबरोबर जाण्याचा हट्ट धरला. रामचंद्रांनीं तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. तथापि ती ऐकेना. ती म्हणाली,

" मी आपली सहधर्मचारिणी आहें ना? मग आपण जाल तिकडे मी येणार. वन हेंच माझें राजमंदिर. "

रामचंद्र म्हणाले, " तुला सासुसासऱ्यांची सेवा केली पाहिजे. "

" त्यांच्या सेवेंत मजकडून अंतर पडतें आहे. म्हणून मी हात जोडून देवांची क्षमा मागतें. " सीता काकुळतीनें म्हणाली.

तेव्हां रामचंद्रांनीं लक्ष्मणास सीतेची समजूत घालण्यास सांगितलें. त्यावर तो म्हणाला,

" वहिनींचें म्हणणें योग्य आहे. त्यांना माझी अनुमति आहे. त्यांची समजूत घालण्यास माझें मनच घेत नाहीं. चंद्राला राहूनें ग्रासलें तरी रोहिणी कांहीं त्याला सोडून जात नाहीं. वृक्ष उन्मळून भूमीवर पडला तर लताही त्याच्याबरोबर भूमीवर पडते. "

ह्याप्रमाणें बोलून लक्ष्मणानें सीतेला आपल्या निश्चयापासून परावृत्त तर केलें नाहींच, पण उलट तोही रामासमवेत वनास जाण्यास सिद्ध झाला.

इतक्यांत एक दासी नेपथ्यशालेंतून नवीन वल्कलें घेऊन तेथें आली आणि म्हणाली, " रेवाबाईंनीं विनंती केली आहे कीं अवदातिकेनें इकडून गुपचुपपणें पळवून आणलेलीं वल्कलें जुनीं आहेत, एवढेंच नव्हे, तरी तीं दुसऱ्यांनीं वापरलेलीं आहेत. म्हणून आतां नवीन वल्कलें धाडलीं आहेत. त्यांनीं आपलें काम करून घ्यावें. "

ह्याच वेळीं अशा अकल्पित रीतीनें वल्कलें आलेलीं पाहून रामचंद्रांनीं तीं स्वतः धारण केलीं आणि त्यांतलीं कांहीं लक्ष्मणाच्या आग्रहावरून त्याला देऊन रामचंद्र म्हणाले,

" लक्ष्मणा, वल्कलें हीं तपःसंग्रामाला उपयोगी पडणारीं कवचेंच आहेत. "

" हा माझ्यावर प्रसाद झाला " असें म्हणून लक्ष्मणानें तीं वल्कलें परिधान केलीं.

तिघेंही वनवासाला जावयास निघालीं. सारे पौरजन गोळा झाले. त्यांनीं राजमार्ग अडवून धरिले. तेव्हां रामचंद्र म्हणाले,

" मैथिलि, तूं आपलें अवगुंठन दूर कर ; पौरजनांना तुला डोळे भरून पाहूं दे. यज्ञप्रसंगीं, विवाहप्रसंगीं, संकटप्रसंगीं किंवा वनांत हिंडतांना स्त्रिया लोकांच्या दृष्टीस पडल्या तरी त्यांत यत्किंचितही दोष नाहीं. "

पौरजनांनीं सीतादेवीस साश्रुनयनांनीं पाहिलें. लक्ष्मण गर्दी दूर करीत पुढें चालला. त्याच्या मागून राम व सीता चालूं लागलीं.



लक्ष्मण गर्दी दूर करीत पुढें चालला. त्याच्या मागून राम व सीता चालूं लागलीं.

'तों दशरथमहाराज इकडे येत आहेत. कुमारांनीं जाऊं नये.' असा निरोप आला. पण हा प्रसंग टळावा म्हणून तेथें न थांबतां रामलक्ष्मण सीतेसह तेथून पुढें वनाकडे तडक निघून गेले.

रामचंद्र निघून गेले!

अयोध्यानगरी शून्य दिसूं लागली. ज्या मार्गानें रामचंद्र वनाकडे गेले त्या मार्गाकडेच डोळे लावून आबालवृद्ध रडूं लागले. घोडे खिंकाळेनात! हत्तींनीं गवत खाण्याचें सोडलें! पशूंची ही अवस्था; मग दशरथ-महाराजांची काय अवस्था झाली असेल! पुत्रविरहाग्नीनें हृदय करपून जाऊन आणि मस्तक सुन्न होऊन दशरथमहाराज वेड्यासारखे बडबडूं लागले,

"सर्वजनांच्या नेत्रांना आणि हृदयांना आनंद देणारा तो राम कोठें आहे? राज्यवैभव तृणासमान मानणारा तो राम कोठें आहे? रामा, पुत्रधर्म सोडून तुला भलत्याच धर्माला चिकटून राहून काय करावयाचें आहे? वत्सा लक्ष्मणा, बाळे सीते, मला कोणीच कसें उत्तर देत नाहीं? गेलेच ते! सूर्य मावळावा तसा राम दिसेनासा झाला आहे.

सूर्याच्या मागोमाग दिवस नाहींसा व्हावा तसा रामाच्या मागोमाग लक्ष्मण नाहींसा झाला आहे. सूर्य व दिवस दोघेही गेल्यावर छाया नष्ट व्हावी तशी सीता नष्ट झाली आहे. हाय ! हाय !! "

अशा प्रकारें दशरथमहाराज शोक करूं लागले. शोकभरांत त्यांना जवळचें माणूसही ओळखूं येईनासें झालें ! "चौदा वर्षें संपलीं म्हणजे मुलें आपल्या दृष्टीस पडतील" असें बोलून कौसल्या त्यांचें सांत्वन करूं लागली. तेव्हां तिला 'तूं कोण ?' म्हणून त्यांनीं विचारलें. तेव्हां तिनें "पोटच्या गोळ्यावरही जिचें प्रेम नाहीं ती मी अभागिनी कौसल्या !" असें उत्तर दिलें.

इतक्यांत कंचुकी दशरथमहाराजांकडे आला आणि म्हणाला, "सुमंत्र अयोध्येला परत आले आहेत." तेव्हां महाराजांनीं त्याला विचारलें, "काय ! सुमंत्र रामाला घेऊन आला ?"

"नाहीं महाराज, नुसता रथ घेऊन."

हें ऐकून दशरथमहाराज उद्गारले, "तर मग माझा मनोरथ भग्न झाला. प्रत्यक्ष कृतान्तानें मला नेण्यासाठींच हा रिकामा रथ इकडे पाठविला कीं काय ! अरे सुमंत्रा, तूं परत येत असतां रामानें तुझ्याबरोबर मला कांहीं निरोप धाडला आहे काय ?"

त्यावर सुमंत्र म्हणाला, "राम .... लक्ष्मण ...."

महाराज मध्येंच म्हणाले,

"काय राम ? हे राम ! तुझें नांव ऐकल्याबरोबर मला तुझा साक्षात् स्पर्श झाल्यासारखा वाटतें. ते वनांतले वायु धन्य आहेत ! त्यांना रामाचें स्पर्शसुख घडत आहे."

सुमंत्र पुढें म्हणाला, "त्यांनीं अयोध्येकडे तोंड करून आणि महाराजांना प्रणाम करून विज्ञापना करण्यास प्रारंभ केला पण त्यांचे डोळे भरून आल्यामुळें आणि कंठ दाटून आल्यामुळें त्यांना मुळींच बोलवेना."

हे सुमंत्राचे शब्द ऐकून महाराजांना मूर्च्छा आली.

अंमळशानें सावध झाल्यावर ते म्हणाले, "रामाला राज्याभिषेक करावा, प्रजेला उत्तम राजाची जोड करून द्यावी, तुम्हां सर्व बंधूंना सारखें वैभवशाली करावें नि मग आपण वनाला जावें, अशा माझ्या आकांक्षा होत्या. पण एका क्षणांत कैकेयीनें त्या सर्व ढासळून पाडल्या! मी किती पापी! सुमंत्रा, कैकेयीला जाऊन सांग कीं राम गेला, तुझा हेतु पूर्ण झाला. मीही चाललों. ते माझे स्वर्गीय पितर आपल्या समवेत स्वर्गांत वास करण्यासाठीं अंतरिक्षांतून मला बोलावीत आहेत."

एवढें बोलून महाराजांनीं पाणी मागितलें. कंचुकीनें पाणी दिल्यावर महाराजांनीं आचमन केलें आणि दिलीप, रघु, अज ह्यांचा उच्चार करून ते म्हणाले, "मला तुमचा सहवास घडो. हा मी आलोंच." शेवटीं "हा रामा, हा लक्ष्मणा, हे सीते" अशा हाका मारतां मारतां महाराजांना जी मूर्च्छा आली ती अखेरचीच ठरली!!

दशरथमहाराजांनीं देह ठेवला त्या वेळीं भरत केकय देशांत मातुलगृहीं होता. त्याला अयोध्येस आणण्यासाठीं सारथी रथ घेऊन तिकडे गेला. तेव्हां भरत मामाचा निरोप घेऊन तांतडीनें निघाला. 'महाराज फार अत्यवस्थ आहेत' एवढेंच सारथ्यानें भरताला सांगितलें होतें. कारण सर्व वृत्त सांगण्याचा त्याला धीरच झाला नाहीं.

भरताचा रथ अयोध्येच्या समीप येऊन ठेपला. वडिलांना भेटण्यास भरत समुत्सुक झाला होता. त्याचें मन रथापेक्षां द्रुतगतीनें पुढें धाव घेत होतें. पण त्याला वाटेंत अटकाव करण्यासाठींच कीं काय, राजोपाध्यायांकडून निरोप आला कीं आणखी एका घटकेनें अमंगल कृत्तिका नक्षत्र संपतें आहे. तें संपून मंगल रोहिणी नक्षत्र लागल्यावर महाराजांनीं अयोध्येंत प्रवेश करावा. तो चांगला मुहूर्त आहे.

'गुरुजनांची आज्ञा' म्हणून भरतानें तेथेंच विश्रांति घेण्याचें योजिलें. नगरांत जाण्यापूर्वीं बाहेर थोडा वेळ थांबावें असा शिष्टसांप्रदाय आहे.

त्या स्थळीं भरत सभोवतीं निरखून पाहूं लागला. जवळच्या झाडींत त्याला एक मंदिर दिसलें. तो लगेच देवदर्शनाला तिकडे गेला. देवतांवर लाह्या व फुलें वाहिलेलीं पाहून त्यांची नुकतीच पूजाअर्चा झाली असावी असें त्याला वाटलें. एका भव्य चौथऱ्यावर चार रम्य प्रतिमा उभ्या होत्या. पाषाणाच्या मूर्तींत मानवी भाव उत्कृष्टपणें उमटलेले पाहून भरत त्या मूर्ति आश्चर्यानें न्याहाळूं लागला. त्या मंदिराचा गुरव देवकुलिक तेथेंच होता. त्यानें इक्ष्वाकु वंशांतील राजांच्या ह्या प्रतिमा आहेत असें भरताला सांगितलें. तेव्हां त्याची उत्कंठा वाढली आणि एकेका प्रतिमेकडे बोट करून 'ही कोणाची प्रतिमा? ही कोणाची प्रतिमा?' असें तो देवकुलिकाला विचारूं लागला.

"ही प्रतिमा दिलीपाची."

"ही प्रतिमा रघूची."

"ही प्रतिमा अजाची."

ह्या तीन प्रतिमांचीं नांवें देवकुलिकानें भरताला सांगितलीं.

पुढें भरत चौथ्या प्रतिमेजवळ आला व थांबला. "ही प्रतिमा कोणाची?" असें विचारण्याचा त्याला धीर होईना. तो म्हणाला, "हे माझे मृत पूर्वज आहेत. पण काय हो, ह्या मंदिरांत जिवंत असलेल्यांच्यासुद्धा प्रतिमा बसवितात काय?"

"नाहीं. केवळ मृतांच्याच."

हे तापलेल्या तेलासारखे देवकुलिकाचे शब्द भरताच्या कानांवर पडले आणि त्याबरोबर त्याचें शरीर मूर्च्छित होऊन खालीं पडलें.

थोड्या वेळानें भरत सावध झाला आणि 'देवकुलिकानें त्याला दशरथमहाराजांच्या मृत्यूचें कारण सांगितलें. तो म्हणाला, "कैकेयीच्या राज्यलोभामुळेंच हा प्रसंग ओढवला. रामांना वनवास घडला. ह्या सर्व अनर्थाचें मूळ कैकेयीचा राज्यलोभ."

'हा तात,' असे उद्गार काढून भरत पुनः मूर्च्छित झाला. इतक्यांत तिघीही राण्यांना घेऊन सुमंत्र तेथें आला. भरताला पाहतांच 'हा वत्सा भरता' अशा त्याला हाका मारून तिघीही माता आक्रोश करूं लागल्या.

भरत सावध झाला. कौसल्येस व सुमित्रेस त्यानें अभिवादन केलें आणि कैकेयीस पाहून तो संतापून म्हणाला,

"हे पापिणी, ह्या दोघींमध्यें तूं शोभत नाहींस. गंगा आणि यमुना ह्यांच्यामध्यें तूं कुनदीसारखी दिसतेस! तूंच ह्या अनर्थाला कारण झालीस."

"बाळा, महाराजांचें वचन पाळलें जावें म्हणून .... मी,........"

कैकेयीनें शांतपणानें उत्तर दिलें. तेव्हां भरत रागानें म्हणाला, "तूं आपल्या तोंडाला तर काळोखी फासलीसच; पण माझ्या तोंडालाही काळोखी लावलीस." कैकेयी म्हणाली, "मी तुला योग्य वेळीं व योग्य स्थळीं सर्व खरा प्रकार सांगणार आहें."

भरताचा राग वाढत चालला. तो शांत व्हावा ह्या हेतूनें सुमंत्र त्याला म्हणाला, "वसिष्ठ–वामदेव आपणांस सामोरे येत आहेत. आपल्या अभिषेकाची सिद्धता झाली आहे. गोपाल नसला म्हणजे जशी गायींची स्थिति होते तशी राजा नसला म्हणजे प्रजेची होते."

ह्यावर भरत म्हणाला, "काय? मला राज्याभिषेक! तो आतां ह्या आमच्या मातुःश्रींना करा. जिकडे राम असेल तिकडे मी निघालों; जेथें राम नाहीं ती अयोध्याच नव्हे!" असें बोलून भरत तेथून तडक वनाकडे निघाला.

भरतानें तपोवनाची वाट धरली. तो रामाच्या आश्रमाकडे चालला. सुमंत्रानें रामचंद्र राहत असलेल्या आश्रमासन्निध रथ आणून उभा केला. भरत रथांतून खालीं उतरला. त्याला इतका अनुताप झाला होता कीं आपण आल्याचें रामाला कळविण्याविषयीं त्यानें सुमंत्राला सांगितलें तें असें:

"राज्यलोभी कैकेयीचा पुत्र भरत आला आहे."

"वडील माणसांसंबंधीं असें बोलणें बरें नाहीं" सुमंत्र म्हणाला.

" खरेंच ; दुसऱ्याच्या दोषाचा आपण उच्चार कशाला करा ? तर मग असें सांग कीं इक्ष्वाकुकुलाला कलंक लावणारा भरत आला आहे. "

सुमंत्राला हेंही सांगवेना. तेव्हां भरत म्हणाला, " मी स्वतःच मी आल्याचें कळवितों. कारण ब्रह्मज्ञानें स्वतःच स्वतःच्या नांवाचा उच्चार करावयाचा असतो. " असें म्हणून तो स्वतः पुढें होऊन मोठ्यानें म्हणाला, " एक कृतघ्न व निर्दय असा रामाचा भक्त दर्शनासाठीं आला आहे. त्यानें आंत यावें काय ? "

आश्रमाच्या आंत राम, लक्ष्मण व सीता हीं तिघेंही बसलीं होतीं. भरताचे शब्द त्यांना स्पष्ट ऐकूं आले. तेव्हां राम हर्षानें म्हणाले, " हा आवाज तातांच्या आवाजासारखा दिसतो. हा आपल्याच कुळांतल्या कोणाचा तरी असेल काय ? लक्ष्मणा, जा, पाहून ये. "

बाहेर जाऊन लक्ष्मणानें भरताला पाहिलें आणि विस्मित मुद्रेनें आंत जाऊन भरत आल्याचें रामचंद्रांना सांगितलें. त्यावर " जा, त्याला आंत घेऊन ये " असें रामचंद्रांनीं लक्ष्मणाला उतावीळपणानें सांगितलें. पण लगेच त्यांचें त्यांना काय वाटलें कोणास ठाऊक !

" ह्या देवीला आनंदाश्रु आले आहेत. तिलाच जाऊन कुमाराला आंत आणूं दे. " असें रामचंद्रांनीं सीतेकडे पाहून म्हटलें. तेव्हां सीता बाहेर आली. भरताला पाहिल्यावर ' हा दुसरा रामच आहे ' असें तिला वाटलें. " वत्सा, दीर्घायु हो. ये आंत. " असें बोलून सीतेनें भरताला आंत बोलाविलें.

रामचंद्रांची व भरताची भेट झाली. त्यांनीं परस्परांस आलिंगन दिलें.

भरताच्या पाठोपाठ सुमंत्र आंत आला. त्यानें आपल्याबरोबर अभिषेकोदक आणलेलें होतें. तिकडे अंगुलिनिर्देश करून भरत रामांना म्हणाला, " आपण अभिषेक करवून घेऊन अयोध्येला यावें. " तेव्हां रामचंद्रांनीं उत्तर दिलें, " आपल्या कुलाचें सत्य हेंच धन आहे. पितृवचन पाळण्यासाठीं मीं अरण्यवास अंगीकारिला आहे, भयानें किंवा मोहानें नव्हे. "

ह्यावर भरत म्हणाला, " आपलें व्रत शेवटास जाईपर्यंत मी येथें राहून आपली सेवा करीन. मी आपला कनिष्ठ भ्राता. म्हणून सेवा करण्याचा अधिकार माझाच आहे.

रामचंद्र म्हणाले, " भरता, तूं अयोध्येंत राहूनच माझी सेवा कर म्हणजे झालें. मी तुझ्यावर राज्यभार सोंपवितों. तूं तो धारण कर. माझ्या गळ्याची तुला शपथ आहे."

" माझें एक मागणें आहे; चौदा वर्षें संपलीं म्हणजे आपण परत येऊन राज्य करावें. तोंवर आपल्या पादुका मला द्याव्या. त्यांची मी सेवा करीन." अशी भरतानें कळवळून विनंती केली. तदनुसार रामचंद्रांनीं आपल्या पादुका भरताला दिल्या आणि सुमंत्रानें भरताच्या इच्छेवरून पादुकांनाच अभिषेक केला.

भरतानें कांहीं काळ तरी तेथेंच राहावें असें सीतादेवीच्या मनांतून होतें. पण पादुकाभिषेक होतांच रामचंद्र भरताला म्हणाले,

" भरता, मोहांत गुंतून राहण्याची ही वेळ नव्हे. राज्य म्हटलें, म्हणजे क्षणभरही त्याची उपेक्षा होतां कामा नये, तेव्हां तूं आजच परत जा कसा."

भरत व सुमंत्र रथावर आरूढ झाले. रथ अयोध्येच्या मार्गाला लागला.

भरत तेथून अयोध्येला परत गेल्याला जवळ जवळ बारा वर्षें लोटलीं. त्या वेळीं राम पंचवटीला येऊन आश्रम बांधून राहिलेले होते. तेथें एके दिवशीं लक्ष्मण आश्रमांतून कोठें बाहेर गेल्यावर राम एकटेच सचिंत बसलेले पाहून सीतेनें त्यांना चिंतेचें कारण काय म्हणून विचारलें. तेव्हां रामचंद्र म्हणाले,

" उदईक तातांचें श्राद्ध आहे. तें कसें काय पार पाडावयाचें ह्या विवंचनेंत मी आहें." तेव्हां सीतादेवी म्हणाली, " आर्यपुत्रांनीं फलोदकानेंच श्राद्ध करावें. तिकडे भरतभावोजी यथासांग श्राद्धविधि करतीलच."

इतक्यांत संन्यासवेषधारी रावण विमानांतून उतरून रामांच्या अश्रमांत शिरला. ‘ अतिथींचें स्वागत असो ’ असें म्हणून रामचंद्रांनीं त्याचें स्वागत केलें आणि सीतेला संन्यासीमहाराजांचें पादप्रक्षालन करण्यास सांगितलें. पण आपलें कपट उघडकीला येईल ह्या भीतीनें रावण म्हणाला,

“ रामा, मला सीतेची सेवा नको आणि तुझीही नको. मी वृक्षांची छायासुद्धा टाळतों, मग तुझी सेवा कशास घेऊं ? तुझ्या मधुर भाषणानेंच माझा सत्कार झाला आहे. माझें गोत्र काश्यप; मीं सांग वेदाध्ययन केलें आहे. धर्मशास्त्र, योगशास्त्र, अर्थशास्त्र, न्यायशास्त्र, श्राद्धकल्प........”

“ काय, श्राद्धकल्प आपण जाणतां ? ” रामचंद्रांनीं मध्येंच विचारलें.

“ मला येत असलेले वेद अथवा शास्त्रें सोडून तूं श्राद्धकल्पासंबंधींचा विशेष प्रश्न कां केलास ? ”

“ अहो, मला आज त्याचेंच महत्त्व. तोच वेद होऊन बसला आहे मला. उद्यां माझ्या वडिलांचें श्राद्ध आहे. पितरांचें तर्पण कशानें करावें हें आपण मला सांगावें. ”

“ श्रद्धेनें दिलेलें कोणतेंही श्राद्धच. ” संन्याश्यानें उत्तर दिलें.

“ तें मला माहीत आहे. पण श्रद्धेनेंच द्यावयाच्या दानांत देखील विशेष कोणते पदार्थ द्यावे ? ” रामचंद्रांनीं विचारलें.

“ ऐक. तृणांत दर्भ, धान्यांत तिल, मत्स्यांत शफर, पशूंत गाय, बैल, गेंडा, अथवा ........”

“ अहो, तुम्हांस आणखी कांहीं पदार्थ सांगावयाचे दिसतात. ते सांगा ना ? ”

“ होय. मला आणखी एक पदार्थ सांगावयाचा आहे. पण तो असा तसा मिळत नाहीं. तो मिळवायला पराक्रम लागतो. ”

“ होय का ? मग मी तो पदार्थ मिळवीनच. कारण, तप आणि धनुष्य हीं माझीं साधनें आहेत. ”

" तर मग ऐक. मी सांगतों तो पदार्थ हिमालयावर मिळतो. प्रत्यक्ष शंकराच्या मस्तकांतून पाझरणाऱ्या गंगेचें पाणी पिणारे, वैदूर्य मण्याच्या रंगाची ज्यांची पाठ आहे असे आणि ज्यांचा वेग वाऱ्यासारखा आहे असे कांचनपार्श्व मृग हिमालयाच्या सातव्या शिखरावर सापडतात. वालखिल्यादि ऋषि आपल्या तपःसामर्थ्यानें त्या मृगांना प्राप्त करून घेऊन श्राद्धविधि पार पाडतात. " संन्यासी म्हणाला.

" आपण मला तसला हेममृग दाखवा. मी त्याला पकडतों. " रामचंद्रांनीं विनविलें.

" तो पाहा हेममृग ! हिमालयानें तुझी मनीषा पुरविण्यासाठींच त्याला इकडे पाठविलें आहे असें मला वाटतें. " एवढें बोलून रावणानें रामचंद्रांना एक हेममृग दाखविला.

" केवढें माझें भाग्य ! " असें म्हणून रामचंद्र तिकडे धावले.

लक्ष्मण अद्याप बाहेरून परत आला नव्हता. कुलपति तपश्चर्या संपवून त्या दिवशीं आश्रमांत येणार होते म्हणून तो त्यांना सामोरा गेला होता.

आतां रावणानें आपलें खरें स्वरूप धारण केलें आणि तो एकट्या राहिलेल्या सीतेला म्हणाला, " सीते, इंद्रादिकांना जिंकणारा आणि खरदूषणादिकांचा वध झालेला ऐकून संताप झालेला हा मी रावण तुझें हरण करण्यास आलों आहें. "

सीता अत्यंत भयाकुल होऊन " आर्यपुत्र, रक्षण करा, लक्ष्मण भावोजी धावा हो धावा " असा आक्रोश करूं लागली.

रावण म्हणाला, " मृगनयने, तुझें ओरडणें व्यर्थ आहे. मृगशावकें काय व्याघ्राचा वध करतील ? "

" थांब, तुला शापून टाकतें तर ? " सीतेनें क्रुद्ध होऊन उत्तर दिलें.

पतिव्रतेच्या तेजानें रावण दिपून गेला आणि सीतेला उचलून घेतांना विस्मयानें उद्गारला,

" मीं नभोमार्गानें उड्डाण केलें तेव्हां सूर्याच्या किरणांनीसुद्धा मला जितकें भाजलें नाहीं तितकें हिच्या ' शापून टाकलें तर ' ह्या शब्दांनीं मला भाजलें आहे. "

तसेंच जनस्थानांतील तपस्व्यांना उद्देशून मोठ्यानें ओरडला, " हा दशानन सीतेला उचलून नेत आहे. रामाच्या ठायीं क्षात्रतेज असेल तर त्यानें आपल्या पत्नीला सोडवून न्यावें."

हा प्रकार पाहून जवळच्याच वृक्षावर बसलेला प्रचंड पक्ष्यांचा जटायू रावणावर त्वेषानें तुटून पडला. इंद्रानें आपल्या वज्रानें पर्वतावर प्रहार करावा त्याप्रमाणें जटायूनें आपल्या नखांनीं रावणावर प्रहार केले. पण रावणानें आपल्या खड्गानें त्याचे पंख छाटून त्याला रक्तबंबाळ करून सोडलें आणि सीतेला घेऊन तो पुढें चालता झाला.

एखाद्या हरिणीला व्याघ्रानें उचलून न्यावें त्याप्रमाणें रावण सीतेला उचलून घेऊन चालला. त्या वेळीं नागिणीनें धडपड करावी तशी तिनें धडपड केली. पुष्पित लता कंपायमान व्हावी तशी ती कंपायमान झाली होती. त्या वेळीं दोघा वृद्ध तपस्व्यांनीं तिला पाहिलें.

रावणाचे दर्पोद्गार ऐकून त्यांचें तिकडे लक्ष गेलें होतें. मुनिजनांची प्रत्यक्ष सिद्धीच रावण नेत आहे असें त्यांच्या मनांत आलें. तसेंच सीतेला सोडविण्यासाठीं रावणावर धावून जाणारा जटायू हत्तीच्या सोंडेनें वृक्ष उन्मळून पडावा त्याप्रमाणें भूमीवर पडल्याचें दृश्य त्यांनीं अवलोकिलें आणि हें वृत्त रामांस सांगण्यासाठीं ते निघून गेले.

इकडे भरतानें अयोध्येहून रामादिकांच्या समाचाराकरितां सुमंत्राला तपोवनांत पाठविलें होतें. सुमंत्र तिकडून परत येऊन भरतापुढें सचिंत उभा राहिला. तेव्हां भरतानें त्यास विचारलें,

" दादाचें आपणास दर्शन झालें नाहीं काय ? "

" मी तपोवनांत गेलों होतों. पण रामचंद्र तेथून किष्किंधेला गेल्याचें समजलें. किष्किंधा म्हणून वानरांचें एक स्थान आहे. "



जटायू रावणावर त्वेषानें तुटून पडला.

" अरेरे, दादांना वानरांमध्यें राहून अत्यंत दु:ख होत असेल. वानरांना माणसाचे गुण काय कळणार ? " असे भरतानें उद्गार काढले.

" असें नाहीं. हे वानर तिर्यक् योनींतले असले तरी त्यांना कृतज्ञताबुद्धि आहे. सुग्रीवाचें राज्य त्याच्या ज्येष्ठ बंधूनें म्हणजे वालीनें बळकाविलें आणि त्याची पत्नीही ! रामचंद्र समदु:खी ! त्यांनीं त्याला राज्यादि परत मिळविण्यास साहाय्य केलें. "

" दोघेही समदु:खी कसे ? " भरतानें शंका काढली.

" दोघे राज्यभ्रष्ट म्हणून आणि ........ " सुमंत्र चाचरत बोलूं लागला.

" सुमंत्र, तुम्ही माझ्यापासून कांहीं तरी लपवून ठेवीत आहांत. तुम्हांला शपथ आहे. " भरतानें म्हटलें.

" रामांनीं तपस्विजनांचें रक्षण केलें आणि राक्षसांचा वध केला म्हणून रावणाशीं त्यांचें वैर जुंपलें. म्हणून रावणानें कपट करून सीतेचें हरण केलें. " सुमंत्राचें बोलणें पुरें होण्यापूर्वीच ' हाय ! हाय ! ' असें उद्गारून भरत मूर्च्छित पडला !

कांहीं वेळानें शुद्धीवर येतांच भरत सुमंत्रासह तडक कैकेयीच्या महालाकडे गेला आणि तिला म्हणाला, " देवीकरितां रामाकडून आनंदाची वार्ता आली आहे. "

भरताच्या बोलण्याची खोच लक्षांत न आल्यानें कैकेयी म्हणाली, " तर मग मी कौसल्या व सुमित्रा ह्यांना बोलावणें पाठवितें. "

भरत म्हणाला, " त्या दोघींना ऐकण्याजोगी गोष्ट नाहीं ही. तूंच एकटी ऐक. राज्य सोडून तुझ्या आज्ञेनें दादा जो वनाला गेला, त्याची भार्या रावण घेऊन गेला. आतां तरी तुझे मनोरथ सफल झाले ? तुझ्यासारख्या स्त्रियांमुळेंच इक्ष्वाकु कुलांतील स्त्रियांच्यावर हा प्रसंग आला आहे. इक्ष्वाकु कुलांतील राजांनीं तुझ्यासारखी सून घरांत आणली म्हणून सीतेसारख्या सुनेला आज परक्यांनीं हिरावून नेली आहे. "

आतां खरा प्रकार कथन करण्याचा हा योग्य प्रसंग आहे हें ओळखून कैकेयी म्हणाली,

“बाळा, महाराजांना शाप झाला होता ही गोष्ट तुला ठाऊक नाहीं म्हणून तूं मला असें लावून बोलतोस. सुमंत्रांना तें सगळें ठाऊक आहे. तेच तुला काय तें सांगतील.”

“देवींची आज्ञा” म्हणून सुमंत्रानें दशरथमहाराज मृगयेला गेले असतां त्यांच्या हातून कुमार श्रावणाचा कसा न कळत वध झाला आणि श्रावणाच्या अंध व वृद्ध पित्यानें ‘पुत्रशोकानें तुलाही माझ्यासारखाच मृत्यु येईल’ असा शाप महाराजांना कसा दिला, इत्यादि वृत्त साद्यन्त कथन केलें.

पुढें कैकेयी म्हणाली, “भरता, महर्षींचा शाप टाळणें शक्य नाहीं. तो जर खरा व्हावयाचा तर निदान पुत्रांना तरी दूर कोठें पाठविणें अवश्य होतें. म्हणून माझ्या शिरावर पाप घेऊन मीं रामाला वनांत पाठविलें. राज्यलोभासाठीं नव्हे.”

हें ऐकून भरत म्हणाला, “पुत्रवियोगच हवा होता, तर मलाच कां नाहीं वनाला पाठविलें?”

कैकेयीनें उत्तर दिलें, “अरे, तूं बाळपणापासूनच मामांच्या घरीं राहत असल्यामुळें तुझा वियोग महाराजांच्या अंगवळणीं पडलेला होता.”

“बरें, पण हीं चौदा वर्षें तूं काय म्हणून ठरविलींस?” भरतानें उत्सुकतेनें विचारलें.

“बाळ, मला चौदा वासर (दिवस) म्हणून म्हणायचें होतें पण शोकविव्हल झाल्यामुळें माझ्या तोंडून चुकून चौदा वत्सर (वर्षें) असे शब्द बाहेर पडले.” कैकेयीनें उत्तर दिलें. हें ऐकून भरत म्हणाला, “ह्यांत तुझी मोठी चतुराई दिसते.” त्याला वाटलें कीं कैकेयीनें मोठ्या कौशल्यानें हें सगळें जुळवून आणलें आहे. म्हणून त्यानें अशी शंका काढली कीं “ही गोष्ट वसिष्ठांना विदित होती काय?”

" होय. त्यांना विदित होती एवढेंच नव्हे, त्यांची मला अनुमतिही होती. " कैकेयीनें भरताचें समाधान केलें.

आपल्या मातेकडे कांहीं दोष नाहीं अशी भरताला आतां मनोमन साक्ष पटली आणि तो म्हणाला, " रामाविषयीं माझा आदर मोठा. त्या आदरामुळें मीं तुझा अपमान केला. ह्या अपराधाबद्दल मला तूं क्षमा कर. " असें म्हणून भरतानें कैकेयीच्या पायांवर मस्तक ठेविलें.

" कोणती माता पुत्राचे अपराध पोटांत घालणार नाहीं? " असें बोलून कैकेयीनें पुत्राला हातांनीं उठवून पोटाशीं धरलें.

" मातु:श्रीची माझ्यावर कृपा आहे. मातु:श्रीनें क्षमा केल्यानें मी कृतार्थ झालों. " असें म्हणून कैकेयीची आज्ञा घेऊन भरत रामाच्या साहाय्यार्थ निघाला. तो म्हणाला, " मी अपार सैन्य घेऊन समुद्राच्या पार जाईन आणि त्या रावणाला जर्जर करून टाकीन. "

इतक्यांत सीताहरणाच्या वृत्तानें कौसल्यादेवी मूर्च्छित झाल्या आहेत असें प्रतिहारी तेथें सांगत आला म्हणून सर्वजण कौसल्येच्या मंदिराकडे त्वरित निघून गेलीं.

तिकडे रामचंद्र किष्किंधेंत असतां त्यांना हनुमानादि वानरवीरांचें साहाय्य लाभलें आणि त्या बलावर त्यांनीं लंकेंत जाऊन रावणाचा लीलेनें वध केला. सीतादेवीची मुक्तता केली आणि लंकेच्या राज्यावर बिभीषणाची स्थापना करून ते अयोध्येला परत येण्याकरितां निघाले. वाटेंत मुनिजनांचें दर्शन घेण्याकरितां ते जनस्थानांत उतरले. तेव्हां रामचंद्र सीतेला म्हणाले,

" मैथिलि, येथल्या वृक्षांची ओळख तुला पटली का? तूं त्यांना पुत्राप्रमाणें मानीत होतीस. "

सीता आठवल्यासारखें करून म्हणाली,

" हो हो! न ओळखायला काय झालें! अगबाई! हे वृक्ष किती उंच वाढले आहेत! पूर्वीं ह्यांच्याकडे पाहातांना मला आपली मान खालीं

वाकवावी लागत असे. आतां त्यांच्याकडे पाहतांना मला मान वर करावी लागत आहे. ”

त्यावर रामचंद्र म्हणाले, “ बरोबर आहे सीते. काल हा सर्वांना लहानाचे मोठे करितो. सीते, आपण ह्या सप्तपर्ण वृक्षाच्या छायेला बसलों असतां भरत आपल्या भेटीस आला होता. त्या वेळीं भरताचा शुभ्र वेष पाहून येथलीं हरिणें घाबरून पळूं लागलीं तें तुला आठवतें का? तो पाहा नांदुरकीचा विस्तीर्ण वृक्ष ! त्याच्या मुळाशीं बसून मी तातांच्या श्राद्धाविषयीं विचारमग्न असतां कांचनपार्श्व हरीण माझ्या दृष्टीस पडला. ”

“ नका नका, आर्यपुत्र, ती गोष्ट काढूं नका. मला बाई भीति वाटते. ” सीता कांपत कांपत उद्गारली.

“ अग, आतां त्याला भिण्याचें काय कारण? ती वेळ केव्हांच निघून गेली ” रामचंद्रांनीं आश्वासन दिलें.

इतक्यांत चारी दिशांना धुळीचे लोट उधळतांना त्यांना दिसले. दुंदुभि-निनादानें तर तें सारें वन भरून गेलें ! चतुरंग सेना घेऊन भरत तेथें आकस्मिक आला. त्याच्या समवेत तिघी माता, शत्रुघ्न, पुरोहित व अमात्यही होते. भरतानें रामचंद्रांना दुरून पाहिलें. मेघपटल दूर झाल्यावर चंद्रमा दिसावा तसे रामचंद्र त्याला दिसले. सर्वजण रामांसन्निध आलीं. रामचंद्रांनीं प्रथम मातांना अभिवादन केलें. “ तूं आपली प्रतिज्ञा पुरी करून परत आलास; आमचें भाग्य उदयाला आलें ” असें म्हणून त्यांनीं “ चिरंजीव हो ” असा रामचंद्रांना आशीर्वाद दिला. देवी सीता आणि लक्ष्मण ह्यांनींही साऱ्या गुरुजनांना वंदन केलें. त्यांनींही त्यांना मंगलप्रद आशीर्वाद दिले.

रामभरतांनीं परस्परांस गाढ आलिंगन दिलें. ह्याप्रमाणें सर्वांच्या भेटी-गांठी झाल्यावर भरतानें रामचंद्रांना राज्यभार स्वीकारण्याची विनंती केली. आपली फार दिवसांची हीच इच्छा आहे असें बोलून कैकेयीनेंही रामचंद्रांस तसाच आग्रह केला. रामचंद्रांनीं कैकेयीची आज्ञा शिरसामान्य केली. इतक्यांत वसिष्ठ-वामदेवादि महर्षी तीर्थोदक घेऊन तेथेंच प्राप्त झाले.

मग अभिषेकाला विलंब कसला ? ' राजाधिराज रामचंद्रांचा विजय असो ' म्हणून जयजयकार सुरू झाला आणि त्या जयघोषांत रामचंद्रांना अभिषेक करण्यांत आला. त्या वेळीं विभीषण, सुग्रीव, हनुमान, नील, इत्यादि रामचंद्रांचे सर्व सहाय्यक त्या स्थळीं येऊन पोचले आणि त्यांचा विजयघोष त्या जयजयकारांत मिसळून सर्व अरण्य आनंदानें निनादून गेलें.

पण, एवढ्या अभिषेकानें कैकेयीची तृप्ति झाली नाहीं. हा उत्सव पुनरपि अयोध्येंत व्हावा अशी तिनें इच्छा दर्शविली. रामचंद्रांनीं तिला होकार दिला आणि पुष्पक विमानाचें स्मरण केलें.

त्या क्षणींच रावणाचें पुष्पक विमान तेथें येऊन उतरलें. सर्वजण त्यांत जाऊन बसलीं आणि अयोध्येच्या मार्गानें विमान चालू झालें. नक्षत्रपरिवारानें चंद्रमा शोभावा त्याप्रमाणें आपल्या परिवारानें रामचंद्र शोभूं लागले.

## स्वा ध्या य

१. संदर्भ सांगून स्पष्टीकरण करा —

(अ) त्याचें मन रथापेक्षां द्रुतगतीनें पुढें धाव घेत होतें.

(आ) मी तुला योग्य वेळीं व योग्य स्थळीं सर्व प्रकार सांगणार आहें.

(इ) ब्रह्मघ्नानें स्वतःच स्वतःच्या नांवाचा उच्चार करावयाचा असतो.

(ई) श्रद्धेनें दिलेलें कोणतेंही श्राद्धच.

(उ) वल्कलें हीं तपःसंग्रामाला उपयोगीं पडणारीं शस्त्रेंच आहेत.

२. भासानें या नाटकाला प्रतिमा असें नांव कां दिलें आहे ?

३. रामायणांतील कथेपेक्षां या नाटकांत भास कवीनें कोणता बदल केला आहे ?

४. ' मला हीं वल्कलें कशीं दिसतील ? ' असें सीतेनें दासीला विचारलें. ह्या उद्गारांत कवीला काय सूचित करावयाचें आहे ?

५. अर्थ सांगा — अवगुंठन, नेपथ्यशाला, जनस्थान, श्राद्धकल्प.

६. राम, लक्ष्मण, सीता ह्यांच्यासंबंधीं कवीनें योजलेल्या उपमा सांगा.

७. कैकेयीनें स्वतःवर आलेल्या दोषाचें कसें निरसन केलें ?

का लि दा स कृ त

# मालविकाग्निमित्र

पात्रें

| | |
|---|---|
| अग्निमित्र | नायक<br>विदिशा देशाचा राजा |
| वसुमित्र | अग्निमित्राचा पुत्र |
| धारिणी | अग्निमित्राची पहिली राणी |
| इरावती | अग्निमित्राची दुसरी राणी |
| गौतम | विदूषक<br>अग्निमित्राचा स्नेही |
| गणदास | मालविकेचा संगीत-शिक्षक |
| हरदत्त | संगीत-शिक्षक |
| यज्ञसेन | विदर्भ देशाचा राजा |
| माधवसेन | यज्ञसेनाचा चुलतभाऊ<br>व प्रतिस्पर्धी |
| सुमति | माधवसेनाचा प्रधान |
| वीरसेन | अग्निमित्राचा सेनापति |
| पंडिता कौशिकी | सुमतीची विधवा बहीण |
| मालविका | नायिका<br>माधवसेनाची बहीण |
| वसुलक्ष्मी | धारिणीची धाकटी बहीण |
| निपुणिका | इरावतीची दासी |
| बकुलावलिका | धारिणीची दासी<br>मालविकेची मैत्रीण |



...चीज म्हणत असतांना योग्य ते हावभाव करून मालविकेनें नृत्य केलें.

का लि दा स कृ त

# मा ल वि का ग्नि मि त्र

* अग्निमित्र राजास मालविकेची प्राप्ति झाल्याचें वर्णन ह्यांत आलें असल्यानें ह्या नाटकास कालिदासानें मालविकाग्निमित्र असें नांव दिलें आहे.

" ही कोण ? "

अग्निमित्र राजानें धारिणी राणीला विचारलें.

" ह्या चित्रांतली ही तरुणी कोण ? " पुनः विचारलें.

धारिणीनें ऐकलें न ऐकलेंसें केलें.

" तुला खेटून मागें उभी राहिलेली ही कोण ? "

पुनः तोच प्रश्न.

राणी पुनः स्तब्धच.

तेंव्हां राणीची छोटी बहीण वसुलक्ष्मी बालस्वभावानें म्हणाली,

" कोण ? हिच्याबद्दल विचारतां होय ? अहो, ही तर मालविका ! सेनापतींनीं ही कुठूनशी इकडे पाठविली आहे. "

पोराच्या जातीला काय सांगावें आणि काय सांगूं नये ह्याचा कांहीं पोंच नसतो.

उत्तर हिंदुस्थानांतील माळवा प्रांतांत विदिशा नांवाचें एक नगर होतें. तेथें सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी अग्निमित्र म्हणून एक राजा राज्य करीत होता. त्याच्या राज्याच्या जवळच असलेल्या विदर्भ प्रांतावर यज्ञसेनाचें राज्य होतें. अग्निमित्र व यज्ञसेन ह्यांचें त्यांच्या वडिलांच्या वेळेपासून वितुष्ट आलें होतें. कांहीं ना कांहीं निमित्तानें उभयतांच्या नेहमीं चकमकी झडत. शेवटीं एका लढाईंत अग्निमित्राचा सेनापति वीरसेन ह्यानें यज्ञसेनाच्या मुख्य प्रधानाला बंदिवान करून आणून प्रतिबंधांत ठेविलें.

आपल्या मुख्य मंत्र्याला अग्निमित्रानें बंदींत ठेविलें ही गोष्ट यज्ञसेनाला फार लागली. शिवाय तो मंत्री पडला त्याचा मेहुणा. म्हणून त्याची मुक्तता करण्याचा यज्ञसेनानें आटोकाट प्रयत्न चालविला. पण अग्निमित्रा-पुढें कांहींच उपाय न चालल्यानें बरेच दिवस यज्ञसेनाला जागच्या जागींच दांतओठ खात बसावें लागलें.

पुढें एके दिवशीं अग्निमित्राचें उसनें फेडून घेण्याची संधि यज्ञसेनाला अनायासें चालून आली.

यज्ञसेनाचा चुलतभाऊ माधवसेन ह्याचेंही लहानसें राज्य होतें. माधवसेनानें आपल्या तंत्रानें वागावें अशी यज्ञसेनाची इच्छा होती. कारण, यज्ञसेन वयानें व मानानें मोठा होता. पण माधवसेन त्याच्या तंत्रानें मुळींच वागत नसे. म्हणून त्याच्यावर यज्ञसेनाचा मोठा राग झाला होता. शिवाय, माधवसेन ह्याचा ओढा अग्निमित्राकडे होता आणि वचनबद्ध झाल्यामुळें आपली भगिनी मालविका अग्निमित्राला द्यावी असें त्यानें ठरविलें होतें. त्याचा विचार अग्निमित्रास तत्काळ पसंत पडला. पण यज्ञसेनास तो रुचला नाहीं हें सांगावयास नकोच. ह्यामुळें अग्निमित्राचा सूड केव्हां घ्यावयास मिळेल ह्याची यज्ञसेन सारखी वाट

पाहत होता. तेव्हां माधवसेनाचा बेत येन केन प्रकारेण हाणून पाडावयाचा यज्ञसेनानें बेत केला.

इकडे माधवसेन मालविकेला बरोबर घेऊन विदिशेला यावयास निघाला. आपला चुलतभाऊ लग्नांत कांहीं तरी विघ्न आणणार ही गोष्ट आधींच त्याच्या लक्षांत आली होती. त्यामुळें त्यानें आपणाबरोबर कांहीं लोक घेतले होते. पण वाटेंत यज्ञसेनाच्या एका दुर्गपालानें माधवसेनावर छापा घालून त्याला वंदिवान केलें. ह्या गडबडींत माधवसेनाचा सचीव सुमति ह्यानें मालविकेला मोठ्या युक्तीनें एकीकडे काढून गुप्तपणें विदिशेची वाट धरली. सुमतीबरोबर त्याची विधवा भगिनी कौशिकी, मालविकेच्या मैत्रिणी आणि थोडेसे सैनिक होते. संकटें येऊं लागलीं म्हणजे तीं चोहोंकडून येतात. सुमति, मालविका व कौशिका, विंध्यारण्यांतून कसा तरी मार्ग क्रमीत असतां त्यांच्यावर एकाएकीं लुटारूच्या टोळीची धाड पडली. तेव्हां मालविकेच्या रक्षणार्थ सुमति चोरांशीं शौर्यानें लढला, पण अखेरीस तो मारला गेला आणि सर्वांची पांगापांग झाली. मालविका हें स्त्रीरत्न चोरांच्या हातीं पडलें. आणखी इतरही लूट घेऊन ते चोर पळाले.

बंधूला मृत्युमुखीं पडलेला पाहून कौशिकी बेशुद्ध होऊन पडली. कांहीं वेळानें ती शुद्धीवर येऊन पाहते तों तिला मालविका कोठें दिसेना. तेव्हां संसाराचा वीट येऊन तिनें संन्यासदीक्षा घेतली आणि फिरत फिरत ती विदिशा प्रांतांत गेली.

इकडे माधवसेन विदिशेला येत असतां मार्गांत यज्ञसेनानें त्यास पकडून कारागृहांत ठेवल्याचें वर्तमान जेव्हां अग्निमित्राच्या कानीं आलें तेव्हां त्याला संताप येऊन त्यानें यज्ञसेनास तांतडीचें पत्र लिहिलें कीं " बऱ्या बोलानें माधवसेनाची मुक्तता करा." त्यावर " ही आमची भाऊबंदकी अशीच चालावयाची ! तींत अग्निमित्रमहाराजांनीं न पडणें बरें. पण आपला आग्रहच असेल तर आमच्या मेहुण्याची मुक्तता केल्यास

आम्हीही माधवसेनास सोडून देऊं." असा देवघेवीचा पेंच यज्ञसेनानें अग्निमित्रास घातला. त्यामुळें अग्निमित्र चिडला आणि केवळ सामोपचाराचें पत्र पाठवून काम भागत नाहीं, आतां सेनाच पाठविली पाहिजे, असा विचार करून त्यानें आपला मेहुणा वीरसेन ह्यास यज्ञसेनावर चालून जाण्यास आज्ञा केली. वीरसेन हा विदिशा प्रांताच्या सीमेवर नर्मदातीरीं दुर्गपाल होता. त्यानें एक चोरांची टोळी पाहिली. ती मालविकेसह पळून जात असतां वीरसेनाच्या तावडींत सापडली. तेव्हां चोरांचें पारिपत्य करून वीरसेनानें प्रथम मालविकेला म्हणजे माधवसेनाच्या बहिणीला सोडविलें आणि नंतर यज्ञसेनाचा मोड करून माधवसेनाचीही बंदींतून सुटका केली.

यज्ञसेनावर विजय मिळविल्यानंतर वीरसेनानें त्याच्या हातीं लागलेल्या मालविकेला आपल्या भगिनीजवळ राजवाड्यांत राहण्यास ही योग्य आहे असें पाहून तिच्याकडे पाठवून दिलें. त्याची भगिनी म्हणजे अग्निमित्राची पट्टराणी धारिणी हीच होय. अग्निमित्राला त्यानें दुसरा एक नजराणा पाठविला. तो काय? तर विदर्भ देशाकडून नजर म्हणून आलेल्या दोन गानकुशल चेटी!

ह्याप्रमाणें राजा अग्निमित्राला देऊं केलेली मालविका संकटें भोगीत भोगीत त्याच्याच वाड्यांत अगदीं अकल्पित रीतीनें येऊन पोचली. पण ती कोणाची कोण हें मात्र कोणालाच माहीत नव्हतें!

इकडे भगवीं वस्त्रें परिधान करून सुमतीची वृद्ध बहीण कौशिकी ही विदिशा नगरीस आली आणि जोगीण होऊन एका मठांत जाऊन राहिली. ती विदुषी असून अत्यंत व्यवहारचतुर होती. हळुहळू तिची कीर्ति राजवाड्यांत धारिणीच्या कानांपर्यंत जाऊन पोचली. तेव्हां अशा पोक्त विदुषीचा सहवास आपणांस घडावा म्हणून तिनें कौशिकीला सन्मानपूर्वक बोलावून आणून आपल्याजवळ ठेवून घेतलें आणि सर्वजण तिला 'पंडिता कौशिकी' असें म्हणूं लागले.

पंडिता कौशिकी राजवाड्यांत राहूं लागली तेव्हां मालविकेची आणि तिची भेट होऊन तिनें मालविकेला ओळखिलें, पण मालविकेला मात्र कौशिकीची ओळख पटली नव्हती. कौशिकीनें मालविकेला ओळख पटल्याचें दर्शविलें नाहीं. कांहीं कारणासाठीं बुद्ध्याच मौन धारण करण्याचें तिनें ठरविलें होतें.

मालविका ही राजवाड्यांत आल्यापासून धारिणीची दासी म्हणून जरी राहूं लागली तरी मालविकेच्या गुणांमुळें धारिणीची तिच्यावर मर्जी बसून धारिणी तिला अत्यंत ममतेनें वागवूं लागली. एवढेंच नव्हे, पण गायन, वादन आणि नर्तन ह्या कलांचें शिक्षण तिनें संपादावें ह्या हेतूनें धारिणीनें तिला संगीत-शाळेंत घातलें.

ह्या शाळेंत गणदास आणि हरदत्त नांवाचे दोन मुख्य गुरुजी होते. ते दोघे संगीत-विद्येंत सारखेच प्रवीण होते, तथापि गणदासाची शिकविण्याची हातोटी विशेष वाखाणण्यासारखी होती.

राजा अग्निमित्र ह्याला गाण्याबजावण्याचा नाद होता. त्या दोन शिक्षकांविषयीं म्हणायचें, तर राजाचा कल हरदत्ताकडे होता आणि धारिणी राणीचा कल गणदासाकडे होता. म्हणून धारिणीनें मालविकेस गणदासाच्या हाताखालीं शिकायला ठेविलें. दुसरी राणी इरावती हरदत्ता-पाशीं शिक्षण घेत होती. हरदत्त आणि गणदास ह्या दोघा नाट्याचार्यांत श्रेष्ठ कोण ह्याविषयीं उभयतां पतिपत्नींत नेहमीं वाद होत असे. तेव्हां मालविका ही सच्छिष्या गणदासाकरवीं चांगली तयार करवून राजाला वादांत हरवावें असें धारिणीच्या मनांत होतें. गणदासालाही चतुर व बुद्धिमान शिष्या मिळाल्यानें कृतार्थता वाटूं लागली. स्वातीचा पाऊस चोहोंकडे सारखाच पडत असतो, पण तोच समुद्राच्या शिंपल्यांत पडला तर त्याचीं मोत्यें बनतात ! §

---

§ पात्रविशेषे न्यस्तं गुणान्तरं व्रजति शिल्पमाधातुः ।
जलमिव समुद्रशुक्तौ मुक्ताफलतां पयोदस्य ॥

मालविकेला जे जे हावभाव गणदास शिकवी ते ते शिकविलेल्यापेक्षांही विशेष चांगल्या तऱ्हेनें ती वठवून दाखवीत असे. एवढेंच नव्हे, तर प्रसंगविशेषीं ती गुरूवरही मात करी.

राणी धारिणी हिची मालविका नांवाची एक नवीन दासी आली आहे आणि ती तिची फार लाडकी झाली आहे ह्याची गंधवार्ताही अग्निमित्राला अद्यापि नव्हती.

पण एकदा असा योग आला कीं सर्व दासींसहवर्तमान नुकतेंच काढविलेलें राणीचें एक चित्र राजाच्या सहज दृष्टीस पडलें. त्या चित्रांत मालविका ही अर्थात् धारिणीला अगदीं चिकटून उभी असलेली काढली होती. बाकीच्या सर्व दासी अग्निमित्राच्या ओळखीच्या होत्या. तेव्हां, 'ही नवी सुंदर स्त्री दिसते ती कोण?' असें त्यानें राणीला वरचेवर विचारलें. पण राणीनें ऐकलें न ऐकलेंसें करून कांहींच उत्तर दिलें नाहीं. प्रारंभीं सांगितलेला पतिपत्नीमधला प्रसंग तो हाच !

राजा अग्निमित्र ह्याचा गौतम नामक एक बालमित्र होता. त्याचा स्वभाव मोठा विनोदी असल्यानें अग्निमित्र त्याला नेहमीं आपल्याबरोबर विदूषक म्हणून बाळगीत असे. आतांच राजानें मालविकेचें चित्र पाहिलें होतें. तें त्याच्या मनांत फारच भरून मालविकेला प्रत्यक्ष पाहावें अशी त्याला उत्सुकता वाटूं लागली. पण हें कसें जमून येणार?

वरील प्रसंग घडल्यापासून मालविका ही राजाच्या दृष्टीससुद्धा पडूं नये म्हणून धारिणी विशेष जपत होती. ह्यामुळें राजानें हा 'योग' घडवून आणण्यासाठीं गौतमास सुचविलें. मोठमोठ्या सत्ताधारी माणसांनादेखील कांहीं कांहीं अडचणीच्या गोष्टी साध्य करायला मित्र भेटावा लागतो. मित्रावांचून ती गोष्ट प्राप्त होण्यासारखी नसते. डोळस मनुष्यालासुद्धा अंधारांतली वस्तु शोधण्याला दिव्याची गरज लागते. †

---

† अर्थं सप्रतिबन्धं प्रभुरधिगन्तुं सहायवानेव ।
दृश्यं तमसि न पश्यति दीपेन विना सचक्षुरपि ॥

गौतम हा नुसता विदूषक नसून चांगला बुद्धिमान, चतुर, हिकमती आणि कारस्थानी होता. त्यानें प्रथम हरदत्त आणि गणदास ह्या दोघा नाट्याचार्यांत दिली कलागत लावून. त्या उभयतांची आपापसांत स्पर्धा होती हें त्यास पक्कें ठाऊक होतें. म्हणून त्यानें गणदासाला खोटेंच सांगितलें कीं "गणदासाला काय येतें आहे? माझ्यापुढें त्याची काय प्राज्ञा आहे? त्याला माझ्या पायांच्या धुळीचीसुद्धा सर नाहीं." अशा प्रकारें हरदत्त तुझी निंदा करीत असतो. बरें, हरदत्ताला त्यानें सांगितलें कीं "माझ्यांत आणि हरदत्तांत समुद्र आणि डबकें ह्यांच्याइतका फरक आहे" असें गणदास म्हणत होता. ह्याप्रमाणें दोघांना चिडवून गौतमानें त्यांना अशी भर दिली कीं त्यांनीं राजासमोर आपापल्या शिष्यांकडून नृत्य-प्रयोग करवावा आणि त्यांत ज्याच्या शिष्याचा विजय होईल तो श्रेष्ठ असा निर्णय परीक्षकांकडून घ्यावा.

गौतमानें योजल्याप्रमाणें हा नृत्याचा प्रयोग झाला म्हणजे त्यांत आपोआपच मालविका राजाच्या दृष्टीस पडेल आणि त्याचे मनोरथ पूर्ण होतील असा गौतमाचा डाव होता हें उघड आहे.

एके दिवशीं हरदत्त आणि गणदास ह्या उभयतांची बोलाचाली होऊन खूपच जुंपली. आपलें भांडण तोडावें असा निश्चय करून ते राजाकडे गेले. तेथें सर्वानुमतें असें ठरलें कीं आपापल्या शिष्यांकडून प्रत्यक्ष नृत्य-प्रयोग करवून ह्या आचार्यांची योग्यता ठरवावी. कळीचा नारद गौतम हा त्या वेळीं तेथेंच होता. राजा हा हरदत्ताचा पक्षपाती होता आणि धारिणी ही गणदासाची पक्षपाती होती. म्हणून पंडिता कौशिकीला 'न्यायाधीश' नेमण्याचें ठरलें.

ह्यानंतर चोपदारांनीं जनानखान्यांत जाऊन धारिणीसह पंडिता कौशिकीला बोलावून आणलें.

आपणांस राजासमोर न्यायाधीशाचें काम करावें लागणार आहे असें समजल्यावर पंडिता कौशिकी अग्निमित्रास म्हणते, " महाराज, शहर जवळ असतां रत्नाची परीक्षा करण्यासाठीं खेड्यांत कशाला जावें ? " §

राजा म्हणाला, " छे छे ! तसें नाहीं. तुम्ही पंडिता आहांत. तुम्हीच ह्यांचा निर्णय करावा. आम्ही पक्षपाती आहोंत. "

हें सर्व नाटक घडवून आणण्यांत राजाचा काय हेतु आहे हें कौशिकीला समजलें होतें. ती म्हणाली, " कांहीं शिक्षक असे असतात कीं त्यांचें विषयज्ञान चांगलें असतें ; दुसरे कांहीं असे असतात कीं त्यांना चांगलें शिकवितां येतें. ज्यांना दोन्ही गोष्टी चांगल्या येतात तेच उत्तम शिक्षक होत † आणि त्यांनाच शिक्षकांचे अग्रणी मानलें पाहिजे. हरदत्त व गणदास हे दोघेही सारखेच तज्ज्ञ आहेत हें मला अवगत आहे. आतां त्यांनीं आपल्या शिष्यांकडून नृत्यप्रयोग करून दाखवावा म्हणजे झालें. "

हा चाललेला प्रकार धारिणीला मुळींच मान्य नव्हता. मालविका राजाच्या दृष्टीस पडण्याचा प्रयोग घडून न यावा असें मनांत येऊन ती म्हणाली,

" शिष्याच्या प्रयोगावरून जर गुरूची योग्यता ठरवावयाची तर मग एखाद्या मंदबुद्धि शिष्याला त्या गुरूनें शिकविलेलें ज्ञान जर त्या शिष्याला चांगलें वठवून दाखवितां आलें नाहीं तर तो त्याच्या गुरूचाच दोष होईल काय ? "

हें ऐकून राजा म्हणाला, " होय. हें खरें आहे. " गणदासानेंही राजाच्या म्हणण्यास अनुमोदन दिलें. पण, त्याच्या डोक्यांत राणीच्या बोलण्याची खोंच आली नाहीं. गणदासानें उगीचच्या उगीच वादाच्या भरीस पडूं नये म्हणून राणी त्याच्याकडे वळून म्हणाली,

---

§ पत्तने विद्यमाने ग्रामे किं रत्नपरीक्षा ।

† श्लिष्टा क्रिया कस्यचिदात्मसंस्था । संक्रान्तिरन्यस्य विशेषयुक्ता ।
यस्योभयं साधु स शिक्षकाणां । धुरि प्रतिष्ठापयितव्य एव ।

"तुमची शिष्या नुकतीच तुमच्याजवळ शिकायला लागली आहे. तेव्हां कच्च्या शिष्याला परीक्षेसाठीं पुढें करणें योग्य नव्हे." ह्यावर गणदास हात जोडून म्हणाला, "मिळालेली चांगली जागा जाईल म्हणून वादाला भिऊन जो दुसऱ्याची निंदा सोसतो त्याची विद्या केवळ पोट भरण्यापुरतीच! तो विद्येचा व्यापार करणारा वाणीच होय असें म्हणतात. § इतक्या अल्पावकाशांतसुद्धा मीं आपली शिष्या किती उत्तम पढविली आहे तें पाहावें. माझी शिकविण्याची शैली दाखविण्याची ही असलेली संधि आपण जर मला देत नसाल, तर हा मी चाललों!" असें म्हणून तो आसनावरून उठून चालूं लागला. धारिणीला हें दृश्य कसें पाहवणार? कारण गणदासावर तिचा विशेष लोभ होता. म्हणून निरुपायास्तव ती त्याला म्हणाली, "शिष्यावर गुरूची सत्ता असते.† तेव्हां तुम्ही वाटेल तसें करा."

नृत्यप्रयोगाचा दिवस उजाडला! राजघराण्यांतली सर्व मंडळी आपापल्या योग्यतेप्रमाणें आसनावर अधिष्ठित झाली. गणदास हा हरदत्तापेक्षां वयानें ज्येष्ठ असल्यामुळें त्याला मान देण्यासाठीं प्रथम त्याचाच प्रयोग व्हावा असें पंडिता कौशिकीनें ठरविलें. तसेंच, छलित नांवाच्या नृत्याचा प्रयोग करून दाखविण्यांत यावा असें तिनें सुचविलें. कारण, हा प्रयोग वठवून दाखविणें फार कठीण असतें.

राजा अग्निमित्र मालविकेला पाहण्याला इतका अधीर झाला होता कीं त्याचे नेत्र जणूं काय पडदा बाजूला सारून तिला पाहण्याचा प्रयत्न करूं लागले. इतक्यांत सुंदर वेष धारण केलेली मालविका गणदासासह बाहेर आली. तिला पाहून गौतम राजाला हळूच म्हणतो,

---

§ लब्धास्पदोऽस्मीति विवादभीरोः। तितिक्षमाणस्य परेण निन्दाम् ॥
यस्यागमः केवलजीविकायै। तं ज्ञानपण्यं वणिजं वदन्ति ॥

† प्रभवति आचार्यः शिष्यजनस्य।



८०.९.५

“ मित्रा, त्या चित्रांत हिचें लावण्य जसें तूं पाहिलें होतेंस अगदीं तसेंच आहे ! लेशमात्रही कमी नाहीं. ” राजा म्हणाला, “ मला वाटत होतें कीं कुशल चित्रकार कुरूपालादेखील सुरूप बनवितात. पण हिला पाहिल्यावर मला असें वाटतें कीं चित्रकाराला हिच्या सौंदर्याच्या सर्व छटान्‌छटा रेखाटतांच आल्या नाहींत. हें बघ, हिचें मुख शरत्कालीन चंद्रासारखें आहे ! हिचे डोळे हरिणीसारखे आहेत ! हिचा कटिभाग तर इतका बारीक आहे कीं तो जणूं एका हाताच्या मुठींत मावेल. ”

मालविकेनें राजाला आज प्रथमच पाहिलें होतें. तशांत इतक्या समाजापुढें नृत्य करण्याचा आजचा तिचा पहिलाच प्रसंग. त्यामुळें लज्जेनें ती अगदीं घामाघूम होऊन गेली होती. प्रारंभीं, तान व आलाप घेऊन तिनें गाण्यास आरंभ केला.

“ हे हृदया, हा प्रियजन तुला दुर्लभ आहे. त्याची आशा सोड. हाय ! हाय ! माझा डावा डोळा कां बरें लवतो ? ” ह्या आशयाची तिनें एक चीज म्हटली आणि ती म्हणत असतांना योग्य ते हावभाव करून नृत्य केलें. तें पाहून कौशिकी म्हणाली, “ हिचें नृत्य यथाशास्त्र असून तें सर्वस्वीं निर्दोष आहे. ” राजानेंही गणदासाकडे पाहून म्हटलें, “ आमच्या पक्षाचा म्हणजे हरदत्ताचा आम्हीं आजपासून अभिमान सोडला. गणदासा, तूं श्रेष्ठ आहेस. ” हें ऐकून गणदास म्हणाला, “ आज मी खऱ्या अर्थानें संगीत-शिक्षक ठरलों. माझें शिक्षण आपल्यासारख्या मार्मिकांना मान्य झालें ! मी भाग्यवान ! ! ” असें बोलून तो मालविकेला घेऊन पडद्याच्या आंत गेला. इतक्यांत हरदत्त राजाजवळ येऊन म्हणाला, “ महाराज, माझा प्रयोग पाहण्याची आतां कृपा करावी ! ” राजाला आतां उरलेला प्रयोग पाहण्याची इच्छा मनांतून नव्हतीच. त्यांतून दोन प्रहरची वेळ झालेली. तेव्हां तो हरदत्तास म्हणाला, “ तुमचा प्रयोग उदईक स्वस्थपणें पाहूं. ” गौतमालाही तेंच हवें होतें. तो घाबरा झाल्यासारखा होऊन म्हणाला,

"अरे हो! भोजनाची वेळ झाली!! वैद्य लोक असें सांगतात कीं भोजनाची वेळ टळली तर प्रकृति बिघडते." §

मालविकेला पाहण्याचा अग्निमित्राचा मनोरथ पूर्ण झाला खरा, पण त्या दिवसापासून त्याचें मन अस्वस्थ झालें. मालविकेची नुसती तसबीर त्यानें पाहिली, तेंव्हां तिला प्रत्यक्ष पाहावें अशी त्याला इच्छा झाली. आतां तिला प्रत्यक्ष पाहिल्यानंतर ती आपणांस कशी प्राप्त होईल हा एकच ध्यास त्याला लागला. पण धारिणीचें मन न दुखवितां त्याला ही गोष्ट साध्य करावयाची होती.

इकडे मालविकेची तशीच अवस्था झाली होती. सुकलेल्या मालतीच्या लतेप्रमाणें ती म्लान झाली होती. एकदा धारिणी राणीनें तिला एक नाजूक काम सांगितलें. तें असें कीं प्रमदवनांत जायचें आणि अशोकवृक्षाचे डोहाळे पुरवायचे. अशोकवृक्षाला अशी खोड असते कीं सुंदर स्त्रियांनीं त्या बेट्याला चरणस्पर्श केल्याखेरीज त्याला लवकर फुलेंच येत नाहींत. भलत्या सलत्या स्त्रियांनीं लाथा मारल्या तर त्यांचे पाय मात्र मोडतात. हा अशोकवृक्ष धारिणीचा अत्यंत लाडका होता आणि तीच त्याचे डोहाळे पुरविण्यास जात असे. पण आज तिचा पाय अंमळ दुखावला होता. कारण गौतमानें कांहीं खोडी केल्यामुळें धारिणी हिंदोळ्यावरून खालीं पडली होती. ह्यामुळें तिला अशोकाला लत्ताप्रहार करतां येण्यासारखा नव्हता. म्हणून तिनें आपलें काम आपल्या आवडत्या दासीवर सोपविलें आणि तसें करतांना तिला लाळूच दाखवून ती म्हणाली कीं "मालविके, तूं माझ्या अशोकाचे डोहाळे पूर्ण केल्यापासून जर पांच दिवसांत अशोकाला फुलें आलीं तर तुझी मनीषा मी पूर्ण करीन." असें सांगून तिनें मालविकेला आपले थोडेच पण निवडक असे दागिने अंगावर घालावयास दिले. ह्याप्रमाणें धारिणीनें दिलेले अलंकार अंगावर घालून मालविका नटून सजून प्रमदवनाकडे जावयास निघाली. पण

§ भोजनवेलातिक्रमे चिकित्सका दोषमुदाहरन्ति ।

ती विचाराच्या तंद्रींत असल्यामुळें वाट चुकली. तथापि, लगेच भानावर येऊन ती धारिणीच्या अशोकवृक्षाखालीं जाऊन उभी राहिली.

ह्याच वेळीं कर्मधर्मसंयोगानें अग्निमित्र व गौतम त्याच उद्यानांतून सहल करीत चालले होते. वसंतोत्सव सुरू झाल्यामुळें इरावती राणीनें अग्निमित्रास विनंती केली होती कीं महाराजांनीं प्रमदवनांत येऊन माझ्यासह हिंदोळ्यावर बसून जावें म्हणजे मला आनंद होईल.

अग्निमित्र राजा विमनस्क स्थितींत छांदिष्टासारखा शून्य दृष्टीनें इकडे तिकडे पाहत होता. पण गौतमानें मालविकेला तेव्हांच ओळखिलें आणि आपल्याशींच म्हटलें, "झिंगलेल्या माणसाला काकवी दिसावी तशी आमच्या महाराजांना ही मालविका इथें दिसली आहे." नंतर राजाकडे वळून तो मोठ्यानें म्हणतो, "अहो राव, आपणांला जें पाहिजे होतें तेंच इकडे आलें." हें ऐकून राजा मालविकेकडे पाहून हर्षानें म्हणतो, "काय मालविका? ही इथें कशी आली?" गौतमानें उत्तर दिलें, "तुझ्या सुदैवानें तिला इकडे आणलें. दैव अनुकूल असलें म्हणजे सर्व योगायोग असेच घडून येतात! राणीचा पाय दुखावला तो राजाच्या पथ्यावर पडला म्हणावयाचा!" राजा म्हणाला, "वृक्षाआड असलेली नदी जवळ आली आहे, असें सागराच्या आवाजावरून तान्हेलेल्या वाटसरूला वाटावें आणि त्याला आनंद व्हावा, तद्वत् तुझ्या तोंडून मालविका इथें जवळच आली आहे, असें कळल्यानें माझ्या आसुसलेल्या मनाला आनंद झाला आहे. पण ती कुठेंशी आहे?"

कांहीं वेळानें राजानें मालविकेला प्रत्यक्ष पाहिलें तेव्हां तो हर्षानें उद्गारला, "मालविकेच्या रूपानें माझा प्राण इकडे आला आहे; हा पाहा."

मालविका शिळेवर बसली. तें पाहून अग्निमित्र व गौतम जवळच वेलीच्या कुंजांत दडून बसून ती काय काय करते तें पाहूं लागले. मालविका स्वतःशीं म्हणाली, "हे हृदया, आशा सोड, मला कां उगीच त्रास देतोस?

कारण, ज्याचें मन आपणास अद्याप कळलें नाहीं, अशा प्रियकरावर प्रेम करावयास लावून तूं मला कां छळीत आहेस ? "

अनुक्रम १५५८
दि. १-७-६१

इतक्यांत तिची मैत्रीण बकुलावलिका तेथें आली. तिच्या एका हातांत अळिताचा पेला आणि दुसऱ्या हातांत धारिणीचें पैंजण होते. ती मालविकेला म्हणाली, "मालविके, गडे, ऐकलेंस कां ? तुझा एक पाय इकडे कर पाहूं. मी त्याला अळिता लावून हीं पैंजण घालत्यें. " मालविका एकाएकीं दचकल्यासारखी झाली. तिनें आपला डावा पाय पुढें केला. त्याच्यावर बकुलावलिकेनें अळित्याची वेलबुट्टी काढली आणि ती म्हणाली,

"गडे माळ, तुझा पाय लाल कमलासारखा शोभतो आहे. ह्यावरून तूं महाराजांची लाडकी होणार असें मला वाटतें. "

"तुझी माझ्यावर प्रीति आहे. म्हणून तुला तसें वाटतें." मालविका म्हणाली.

"अग, तूं फार गुणी आहेस, म्हणून महाराजांना तूं फार प्रिय वाटत आहेस. मी कांहींतरीच बोलतें आहें असें मात्र तूं समजूं नकोस. माझ्या तोंडचीं हीं अक्षरें महाराजांच्याच तोंडून निघालीं आहेत असेंच समज. " मालविकेला आश्वासन देऊन बकुलावलिका म्हणाली.

"गडे, तूं मात्र मला ह्या कामांत मदत कर." मालविकेनें कळवळून उत्तर दिलें.

"जितकी चुरावी तितकी अधिकाधिक सुगंध देणारी मी बकुलावलिका आहें, समजलीस ?" बकुलावलिका हसून म्हणाली.

ह्याप्रमाणें मालविका आणि बकुलावलिका ह्यांचा विनोद-संवाद चाललेला ऐकून राजाला आनंदाच्या उकळ्या येत होत्या. राजावर प्रेम करण्यांत मालविकेला बकुलावलिकेनें प्रोत्साहन द्यावें, असें तिला गौतमानें आगाऊच पढवून ठेविलें होतें आणि त्याच अनुरोधानें त्या दोघींचें

चाललेलें संभाषण ऐकून राजास आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. पण बिचाऱ्यास काय माहीत कीं ह्या आनंदावर विरजण घालणारी एक व्यक्ति कपाळाला आठ्या घालून हेंच संभाषण ऐकत होती.

ह्याच वेळीं राजाची दुसरी राणी इरावती आपल्या निपुणिका नामक दासीसह ह्याच उद्यानांतील दोलागृहांत झोके घेण्याकरितां आली होती. राजाला आपण विनंती केल्यावरून तो इकडे आला आहे असें तिला समजलें होतें. पण तो कोठें दिसेना. राजाला इरावती व निपुणिका ह्यांनीं तेथें हुडक हुडक हुडकलें. मग आपली थट्टा करण्याकरितां राजा कोठें तरी लपून बसला असावा, असें समजून इरावती व निपुणिका ह्या वेलीच्या आड लपून बसल्या आणि तेथून पाहतात तों मालविका आणि बकुलावलिका ह्यांचा वरील संवाद त्यांच्या कानांवर पडला. तो ऐकून एका बाजूला राजाच्या अंगावर रोमांच उठत होते, तर दुसऱ्या बाजूला इरावतीच्या अंगाचा तिळपापड होत चालला होता. राजाविषयीं तिच्या मनांत पूर्वीच अशा प्रकारची आशंका येऊन चुकली होती.

मालविकेच्या पायांवर वेलबुट्टी काढून बकुलावलिकेनें तिला पैंजण घातले. आतां मालविका सज्ज झाली. तिनें अशोकाचा कोमल पल्लव आपल्या वेणींत खोवला आणि मग अशोकाला चरणप्रहार केला. आपणांस पुढें सरकण्यास ही संधि नामी आहे असें पाहून विदूषक हा राजाच्या हाताला धरून मालविकेच्या पुढें होऊन उभा राहिला आणि तोऱ्यानें म्हणाला, "माझ्या मित्राचा हा अशोक! तो मित्र येथें समीप असतांना तूं ह्याला लाथ मारिलीस, हें चांगलें काय?"

राजाला पाहतांच मालविका आणि बकुलावलिका दोघीही दचकल्या. तेव्हां बकुलावलिका गौतमाकडे वळून म्हणाली, "बाईसाहेबांच्या सांगण्यावरून हिनें असें केलें. क्षमा करावी." बकुलावलिकेनें ऐवढें बोलून स्वतः राजाला प्रणिपात केला आणि मालविकेकरवींही प्रणिपात करविला.



मालविका सज्ज झाली ... आणि तिनें अशोकाला चरणप्रहार केला.

राजानें हसत हसत म्हटलें, "टणक झाडाला तूं आतां पाय लावलास म्हणून किसलयासारखा तुझा कोमल पाय दुखावला तर नाहीं ना?" असें म्हणत असतांनाच राजानें आपल्या हातांनीं मालविकेस उठविलें. हें पाहून इरावती मत्सरानें पुटपुटते, "वाहवा! स्वारीचें हृदय कसें लोण्यासारखें मृदु दिसतें!"

ह्या प्रकारानें सहजच लाजून मालविका मुरडत मुरडत तेथून जावयास निघाली. तेव्हां तिला अडवून राजा म्हणाला, "तूं चरणस्पर्श करून अशोकाचे मनोरथ जसे पूर्ण केलेस तसे तुझ्या अमृततुल्य स्पर्शानें माझे मनोरथ पूर्ण करून जा." हें बोलणें ऐकून इरावतीला धीर धरवेना. ती कपाळाला आठ्या चढवून संतापानें फणफणत, नागिणीसारखी फूत्कार सोडीत पुढें आली आणि हातवारे करीत म्हणाली, "पुरव बाई, अवश्य पुरव. अशोक हा तुझ्या आल्हादकारक स्पर्शानें केवळ फुलें देईल, पण हा मात्र फुलें देऊन वरतीं फळेंही देईल!!"

हें ऐकून राजा इरावतीला म्हणाला, "सुंदरी, तूं रागावूं नकोस. तुला यावयास वेळ लागला, म्हणून मी इथें कांहीं तरी करमणूक करीत होतों, इतकेंच."

ह्यासारखीं उडवाउडवीचीं उत्तरें देऊन आपल्या वर्तनावर सारवासारव करण्याचा राजानें प्रयत्न केला खरा, पण इरावती पडली मोठी तापट. तिचें तेवढ्यानें थोडेंच समाधान होणार? ती खोंचून म्हणाली, "वाहवा! असली करमणुकीची वस्तु आपणांस केव्हां मिळाली? आपण विश्वास ठेवण्याला फारच योग्य आहांत हें मला माहीत नव्हतें. पुरुष मेले विश्वासघातकी!!" इतक्यांत काय झालें कीं इरावतीचा कंबरपट्टा गळून पडला. तोच हातांत घेऊन ती राजाला ताडण करण्यास धावली. आतां राजा काय बरें करणार? तो तिच्या सपशेल पायां पडला. पण राणीनें त्याच्याकडे पाहिलें तरी का? छे! नांव नको! त्याच्याकडे ढुंकूनही न पाहतां ती



" वाहवा ! असली करमणुकीची वस्तु आपणास केव्हां मिळाली ? "

निपुणिकेसह फणकाऱ्यानें निघूनही गेली. तिच्या पाठोपाठ राजाही फजित होऊन गौतमासह आपल्या महालाकडे गेला आणि मालविका व बकुलावलिका अशोकाचे डोहाळे पुरविल्याचें वृत्त सांगण्यासाठीं राणी धारिणीकडे भीत भीत निघून गेल्या.

इरावती राणीनें पुढें काय केलें? ती हातपाय आपटीत आणि दांतओठ खात आपल्या महालांत परत आली आणि मालविका व तिला मदत करणारी बकुलावलिका ह्यांना काय शिक्षा करावी ह्याचें चिंतन करूं लागली. राणी धारिणी ही पट्टराणी असल्यामुळें तिचा अधिकार मोठा. तेव्हां तिला सांगून ह्या दोघींचें कांडात काढावें असें इरावतीनें मनाशीं ठरविलें. धारिणीचा पाय दुखावला होता. तेव्हां तिचा समाचार घेण्याच्या निमित्तानें इरावती तिच्याकडे गेली आणि धारिणीच्या आवडत्या दासीविरुद्ध गाऱ्हाणें इरावतीनें तिला सांगितलें. तें ऐकून

धारिणीनें रागावून मालविका आणि बकुलावलिका ह्यांची चांगलीच खरडपट्टी काढली. दोघींना अंधाऱ्या कोठडींत कोंडून ठेवून त्यांच्या पायांत शृंखला घातल्या, कोठडीला कुलूप लाविलें. तसेंच, माधविका नांवाच्या दासीला त्यांच्यावर सक्त पहारा ठेवण्यास सांगितलें आणि "माझ्या अंगठीची मोहोर पाहिल्याशिवाय ह्या दोघींची मुक्तता करूं नकोस," असेंही तिला बजावलें.

इकडे अग्निमित्र राजा त्या दिवसापासून फारच अस्वस्थ झाला. त्याचें तोंड उतरून गेलें. इरावतीच्या रागानें मालविकेवर कांहीं तरी संकट ओढवणार असें त्याच्या मनांत येऊं लागलें. म्हणून मालविकेची काय अवस्था झाली आहे ह्याची बातमी काढण्यासाठीं त्यानें गौतमाला तिकडे पाठविलें.

कांहीं वेळानें गौतम येऊन सांगूं लागला कीं मांजरीनें धरलेल्या कोकिळेची जशी अवस्था होते तशीच मालविकेची अवस्था झाली आहे.

"म्हणजे काय?" राजानें अधीरतेनें विचारलें. "म्हणजे असें कीं त्या विचारीला पिंगट डोळ्यांच्या राणीनें तळघरांत, नव्हे मृत्युमुखांतच डांबून ठेविलें आहे. तिथें तिला सूर्यदर्शनसुद्धा होत नाहीं हो! जणूं पाताळांत आहे ती!"

हें ऐकून राजा अत्यंत खिन्न झाला. तो दीर्घ उसासा टाकून म्हणाला, "अरेरे! एखादी भ्रमरी उमललेल्या आम्रमंजरीवर जाऊन बसावी आणि लगेच वावटळ सुटून झाडाच्या कोटरांत ती कोंडली जावी तशीच मालविकेची अवस्था झाली आहे!! मित्रा गौतमा, काढ रे कांहीं उपाय शोधून." गौतमानें अंमळ डोकें खाजवून डोळे मिचकावीत म्हटलें, "सापडला रे मला एक नामी उपाय! तो सिद्धीस मात्र गेला पाहिजे." असें बोलून त्यानें राजाच्या कानाला तोंड लावून आपली सगळी मसलत त्याला सांगितली. ती ऐकून राजा हर्षभरित झाला आणि म्हणाला, "शाबास मित्रा! छान युक्ति काढलीस! आतां वेळ मात्र मुळींच गमावूं नकोस."

ह्या दोघा मित्रांचें बोलणें चाललें आहे तों राजानें धारिणी राणीच्या समाचाराला पाठविलेली चोपदारीण राजाकडे येऊन सांगूं लागली कीं " बाईसाहेब हवेशीर जागेंत पडून आहेत. त्यांच्या पायाला रक्तचंदनाचा लेप लावला आहे आणि परिचारिका तो पाय हळुहळू चेपीत आहेत. पंडिता कौशिकी त्यांच्याजवळ बसून इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगून त्यांचें मन रिझवीत आहेत."

हें ऐकून राजा गौतमाला म्हणाला, "आपणांला तिच्या समाचारास जाण्याला ही वेळ चांगली आहे."

गौतम म्हणाला, " बरें तर, तूं हो पुढें. मीही राणीच्या भेटीकरितां कांहीं फुलें, फळें प्रमोदवनांतून घेऊन येतो. रिक्तहस्तानें जाणें बरें नव्हे."

गौतम फुलें आणण्याच्या मिषानें मागें राहिला आणि राजा जयसेना चोपदारिणीला पुढें करून धारिणीच्या महालांत आला. तेव्हां राजास उत्थापन देण्यासाठीं धारिणी उठून उभें राहण्याचा प्रयत्न करूं लागली. तें पाहून राजा म्हणाला, "नको नको, उठण्याचे श्रम करून आपल्या पायाला आणि माझ्या मनाला दुखवूं नकोस. कसें काय आहे पायाचें ?" राणीनें उत्तर दिलें, "आतां आपलें दर्शन झाल्यामुळें माझा पाय अंमळ बरा आहे."

ह्याप्रमाणें बोलत बोलत राजा आसनावर बसतो न बसतो तोंच "देवा देवा ! मेलों मेलों ! !" असें ओरडत ओरडत गौतम घाबऱ्या घाबऱ्या तेथें आला. त्याच्या उजव्या हाताचा आंगठा जानव्यानें घट्ट बांधलेला होता. आपला आंगठा दाखवून तो म्हणाला, "राणीसाहेबांस रिकाम्या हातानें भेटायला कसें यावें म्हणून मी फुलें आणण्यासाठीं प्रमदवनांत गेलों होतों. तिथें अशोकाचीं फुलें खुडण्यासाठीं मीं उजवा हात पुढें केला तोंच ढोलींतून एक साप निघून, साप कसला काळच, माझ्या हातालाच डसला हो. आई ! आई !" हें ऐकून राणी कळवळ्यानें

म्हणाली, "अरेरे, ह्या ब्राह्मणाला साप चावायला मीच मेली कारण झालें! माझ्या भेटीकरितांच हा फुलें आणायला गेला होता!"

कौशिकी म्हणाली, "आधीं कांहीं उपाय करा ह्याच्या हाताला. असें ऐकतें कीं साप चावलेला भाग छाटून तरी टाकतात किंवा त्याला डाग तरी देतात किंवा तिथलें रक्त तरी काढून टाकतात."

राजा मित्राला धीर देत म्हणाला, "गौतमा, तूं भिऊं नकोस. अगदीं भिऊं नकोस. अरे, तो साप कांहीं विषारी नसेल."

विदूषक काकुळतीनें म्हणाला, "अरे, असें कसें म्हणतोस? विष नाहीं असें कसें? हें पाहा विष माझ्या अंगांत भिनून माझीं सर्व गात्रें झिणझिणत आहेत! मी चाललों! आतां माझ्या पुत्रहीन आईला नीट सांभाळ बरें!"

"मित्रा, सर्पदंशावर उपाय करणें हें विषवैद्याचें काम. तेव्हां तुला ध्रुवसिद्धि विषवैद्याकडे मी पाठवितों. तो कांहीं असातसा वैद्य नाहीं. ध्रुवसिद्धि हें त्याचें नांव अगदीं सार्थ आहे. तो तुला खात्रीनें बरा करील."

राजाच्या आज्ञेवरून गौतमाला उचलून ध्रुवसिद्धीकडे नेण्यांत आलें. त्याचें घर जवळच होतें. तेथून ध्रुवसिद्धीचा तांतडीनें निरोप आला कीं, सर्पाची मुद्रा असलेली एखादी वस्तु पाठवा. ती घेऊन पाणी मंत्रावयाचें आहे. धारिणीजवळ सर्पमुद्रांकित आंगठी होती. ती बोटांतून चटकन् काढून देऊन धारिणीनें जयसेना चोपदारिणीला असें बजाविलें कीं काम झाल्याबरोबर आंगठी लगेच मजकडे परत आणून दे.

जयसेना आंगठी घेऊन गेली. गौतमानें ती हर्षानें हातांत घेतली आणि ध्रुवसिद्धीचा निरोप घेऊन ज्या ठिकाणीं मालविका व बकुलावलिका ह्यांना कोंडून ठेवण्यांत आलें होतें त्या ठिकाणीं तो गेला. गौतमानें दाखविलेली राणीची आंगठी जयसेनेनें पाहिली, म्हणून तत्काळ मालविका आणि बकुलावलिका ह्यांना तिनें बंधमुक्त केलें.

अशा रीतीनें गौतमानें रचलेला व्यूह सिद्धीस गेला. ह्या व्यूहांत त्यानें राजा, ध्रुवसिद्धि व जयसेना ह्यांना सामील करून घेतलें होतें, म्हणून त्याचें कार्य सुकर झालें. बाकी कोणासही ह्या कटाचा सुगावा लागला नाहीं.

आतां राजाची व मालविकेची भेट करवावी म्हणून विदूषकानें त्या दोघांसह लगेच गुप्तपणें प्रमदवनाची वाट धरली आणि तिकडे येण्याविषयीं राजाला जयसेनेबरोबर निरोप पाठविला.

जयसेना मोठी चतुर दासी होती. ती राजाकडे येऊन म्हणाली कीं "महाराज, गौतमाचें विष उतरलें आहे. आतां तो आराम करण्यासाठीं प्रमदवनाकडे गेला आहे." हें ऐकून राणीला हायसें वाटलें. ती उद्गारली, "जगदंबेनें मोठी कृपा केली ! बरें झालें बाई ! नाहीं तर माझ्यावर नसता आळ आला असता ! माझ्यावर व्यर्थ बोल येता तो टळला ! !"

राजाला आतां तेथून निसटण्याला कांहीं तरी निमित्त पाहिजे होतें. म्हणून जयसेना म्हणाली, "महाराज, कांहीं राजकीय कामासाठीं प्रधानजींना आपलें दर्शन घ्यावयाचें आहे," हें ऐकून धारिणीनें राजास निरोप दिला. पण राजाचें मन अगोदरच गौतमाबरोबर प्रमदवनाकडे गेलें होतें. शरीरच काय तें तेथें उरलें होतें.

जयसेनेला पुढें करून राजा कोणाला न कळेल अशा मार्गानें प्रमदवनाकडे चालला.

वाटेंत जयसेनेनें राजाचें इष्ट कार्य सिद्धीस गेल्याचें त्याला कितीदा तरी सांगितलें, तरी राजाला त्याविषयीं शंकाच होती. केव्हां एकदा गौतम भेटेल असें त्याला झालें होतें. म्हणून प्रमदवनाच्या वाटेवर गौतमाला पाहतांच राजानें त्याला विचारलें, "अरे, त्यांना सोडतांना त्या खुळ्या माधविकेनें कांहीं शंका बिंका नाहीं काढली कीं ह्यांना आजच सोडून देण्याचें कारण काय आणि सर्व चाकर लोकांना सोडून तुझीच ह्या कामावर कां योजना केली आहे ?"

गौतम म्हणाला, " होय. तिनें काढली तर! पण माझी समयसूचकता आहे ना! ती माझ्या उपयोगी पडली. मीं म्हटलें, 'आपल्या स्वतःच्या आज्ञेनें मालविकेला सोडावें तर इरावती राणीला वाईट वाटेल, म्हणून धारिणी राणीनें अशी बतावणी केली कीं राजेसाहेबच बंदिवानांस मुक्त करीत आहेत. ह्याचें कारण, राजेसाहेबांना कांहीं वाईट ग्रह आले असल्याचें ज्योतिष्यांनीं सांगितलें आहे आणि त्या ग्रहांच्या निराकरणार्थ सर्व बंदिवानांस मुक्त करावयाचें आहे, म्हणून तूंच जा असें धारिणी राणीसाहेब मला म्हणाल्या,' हें जेव्हां मीं माधविकेला सांगितलें तेव्हां तिचें समाधान झालें आणि हें योग्यच आहे असें म्हणून तिनें ह्या दोघींना सोडून दिलें. केवढी माझी समयज्ञता!"

राजा म्हणाला, " शाबास मित्रा शाबास! छान केलेंस!! तुझें माझ्यावर खरें प्रेम आहे." असें म्हणून राजानें त्याला मिठी मारली. " केवळ बुद्धीच्या बलानेंच मित्राचें काम करतां येतें असें नव्हे, तर अवघड काम प्रेमाच्या बलावरही होऊं शकतें. स्नेह हा कार्यसिद्धीचा अचूक मार्गदर्शक असतो."§ गौतम म्हणाला, " तें असूं दे रे. चल लवकर आपण जलमंदिराकडे जाऊं या. मालविका आणि बकुलावलिका ह्यांना तिकडे पोचवून तुला न्यायला मी इकडे आलों आहें." असें बोलत बोलत ते जलमंदिरापाशीं आले आणि भिंतीआड उभे राहून मालविका आणि बकुलावलिका ह्यांचा संवाद कान देऊन ऐकूं लागले.

जलमंदिरांत राजा, राणी, इत्यादिकांचीं चित्रें लाविलेलीं होतीं. तीं पाहत पाहत बकुलावलिका आणि मालविका इकडे तिकडे फिरत होत्या. राजाचें चित्र पाहून बकुलावलिका मालविकेस म्हणते, " सखे, हे पाहा महाराज, कर ह्यांना प्रणाम." मालविकेला वाटलें कीं खरोखरच राजा आला आहे. म्हणून ती दाराकडे वळून, " ही मी प्रणाम

§ नहि बुद्धिगुणेनैव सुहृदामर्थदर्शनम्। कार्यसिद्धिपथः सूक्ष्मः स्नेहेनाप्युपलभ्यते।

करतें" असें लाजत मुरकत म्हणाली. पण पाहते तों राजा नाहीं कीं कोऽणी नाहीं. तेव्हां ती बकुलावलिकेस म्हणाली, "गडे, तूं बाई मला चांगलेंच फसविलेंस. तूं माझी थट्टा करीत आहेस!"

बकुलावलिकेनें गोडसें हसून उत्तर दिलें, "अग, तूं काय समजलीस? मीं तुला त्यांचें नुसतें चित्र दाखविलें."

जलमंदिरांतला हा संवाद ऐकून राजा आनंदसमुद्रांत पोहूं लागला. त्याला आंत जावयाला कांहीं तरी निमित्त हवें होतें. मालविकेची फसगत झालेली ऐकून तो एकदम जलमंदिरांत शिरून तिला म्हणतो, "हा पाहा, मी तुझा दास इथें उभा आहें." राजाला पाहून मालविका आणि बकुलावलिका चकित झाल्या आणि त्यांनीं उभें राहून राजाला वंदन केलें.

अशा रीतीनें राजाची आणि मालविकेची भेट होण्याचा सुयोग आला खरा, पण दुसरेंच एक विघ्न उपस्थित झालें. राणी इरावती आणि तिची दासी निपुणिका ह्या गौतमाची प्रकृति कशी काय आहे हें पाहण्यासाठीं तेथेंच जलमंदिराच्या दारापाशींच आल्या. पाहतात तों बाहेरील देवडीवर गौतमाला बसल्या ठिकाणींच झोप लागली आहे आणि स्वप्नांत "मालविके! इरावतीला फार गर्व झाला आहे. तूं तिलाही मागें टाक. तिच्याहून वरचढ हो!" असें तो बरळत आहे. तें ऐकून इरावतीला त्याचा मनस्वी राग आला आणि तिनें खांबाच्या आड उभें राहून गौतमाला भिवविण्यासाठीं तेथें पडलेली एक सापासारखी वाकडीतिकडी काठी त्याच्या अंगावर भिरकावून दिली! विचारा गौतम घाबरून "ओय् ओय्! साप चावला! मेलों मेलों" असें ओरडत उठला आणि काय झालें हें पाहण्यासाठीं राजा, मालविका आणि बकुलावलिका एकदम बाहेर आलीं.

आतां मात्र इरावतीचा क्रोध अनावर झाला! ज्या चोरांना तिला पकडावयाचें होतें ते सगळे एका ठिकाणींच सापडले. तेव्हां ती उसळून पुढें येऊन त्वेषानें म्हणाली, "आपला दिवसाढवळ्या ठरलेला संकेत

निर्विघ्नपणें पार पडला ना?" इरावतीला पाहतांच सर्व मंडळी जागच्या जागींच थरमल्यासारखी झाली! पुढें काय करावें, काय बोलावें हें कोणालाच सुचेना. गौतम हळूच पुटपुटला, "पारवा पिंजऱ्यांतून सुटावा नि मांजरीच्या दृष्टीस पडावा, तसें हें झालें आहे." राजा धैर्य धरून इरावतीला म्हणाला, "प्रिये, हा विनाकारण तुझा माझ्यावर राग आहे. मी ह्या दोघींना—मालविका व बकुलावलिका ह्यांना—वसंतोत्सवामध्यें तरी बंदींत ठेवूं नये म्हणून मुक्त केलें. कारण, नोकराचाकरांनीं अपराध केले तरी ते आपण पोटांत घातले पाहिजेत. मीं त्यांना सोडून दिल्यामुळें त्या दोघी इथें माझ्या पायां पडण्यास आल्या होत्या, इतकेंच!"

राजाचें हें कपटी भाषण इरावतीला खरें वाटलें. ती म्हणाली, "हा मेला भट ह्या कामांतला महाराजांचा मंत्री. ह्या भटुरग्याची ही सगळी मसलत! ह्याची ही नीति!"

आतां हें प्रकरण आपल्याच अंगाशीं आलेलें पाहून गौतम हसत हसत इरावतीकडे पाहून म्हणाला, "बाईसाहेब, माझ्यावर भलतें सलतेंच बालंट घेऊं नका. मला मसलत कीं नीति, कांहीं समजत नाहीं. एवढेंच काय, पण त्या शास्त्रांतलें एक अवाक्षरही येत नाहीं. मी त्या शास्त्राचें यत्किंचितही अध्ययन केलें तर मला गायत्रीमंत्र विसरावा लागेल. कारण माझ्या डोक्यांत जास्त कांहीं राहत नाहीं!"

आतां ह्या कचाट्यांतून आपल्याला कसें मोकळें करून घ्यावें हें कांहीं राजाला समजेना. पण त्याचें दैव जोरावर! त्याच वेळीं एक अचानक घटना घडून आली. चोपदारीण जयसेना ही धावऱ्या धावऱ्या येऊन राजाला म्हणाली, "महाराज, कुमारी वसुलक्ष्मी ही चेंडूनें खेळत असतां तिला पिंगल वानरानें खूप भेडसावलें. ह्यामुळें ती सारखी थरथर कांपते आहे आणि किंचाळते आहे. धारिणीबाईसाहेब तिला मांडीवर घेऊन बसल्या आहेत. तरी कांहीं केल्या तिचें भय जात नाहीं आणि ती उगी राहत नाहीं."

ह्या वृत्तान्त ऐकून इरावती राजाला म्हणाली, "आर्यपुत्र, आपण चलावं तिकडे. मीही येत्यें." असें बोलून इरावती निघाली आणि राजाही तिकडेच चालला.

ही सगळी गंमत उडालेली पाहून गौतम आपल्याशींच पुटपुटला, "वा: शाबास! पिंगला, बहार केलीस रे बाबा ह्या वेळीं! आमची कंबक्ती भरली होती. तूं आपल्या जातीचा पाठीराखा झालास. कारण, मी तुझ्या जातीचा आहें. तूं माझा भाऊबंद! आमची बाजू राखलीस तूं. नाहीं तर ह्या वाघिणीच्या तडाख्यांतून वांचणें कठीण होतें आम्हांला!"

अशा रीतीनें गौतमानें मालविकेची व राजाची कसेंही करून भेट करून दिली खरी, पण राजा तेथून निघून गेल्यावर मालविका अतिशय उदास व खिन्न झाली आणि बकुलावलिकेला म्हणाली, "सखे, राणीसाहेबांची आठवण झाली म्हणजे माझ्या हृदयाचा बाई थरकांप होतो. आपणाला आणखी काय काय भोगावें लागणार आहे न कळे! ह्या गौतमानें आपल्याला एका संकटांतून सोडविलें पण त्यामुळें आपणां दोघींवर राणीसाहेबांचा केवढा राग होईल हें कांहीं मला समजत नाहीं. ह्या दुसऱ्या संकटाची फार भीति वाटते बाई मला."

ह्या वेळीं प्रमदवनाची मुख्य अधिकारीण मधुकरिका बागेंतून जात असतां स्वतःशींच आनंदानें उद्गारली, "काय बाई आश्चर्य! पांच रात्रींत अशोकाला फुलांचा केवढा तरी मोठा बहर आला आहे!! राणीसाहेबां-कडे जाऊन त्यांना सांगूं द्या मला हें वर्तमान."

मधुकरिकेचे हे मधुर बोल मालविकेच्या कानीं पडले आणि तिच्या मुखावर आनंदाची छटा दिसूं लागली. ती बकुलावलिकेला म्हणाली, "आपण ह्या मधुकरिकेच्या मागोमाग हळूच जाऊं या."

ह्यानंतर त्या दोघीही मधुकरिकेच्या पाठोपाठ तिला न कळत चालूं लागल्या.

राजा त्यांच्या पुढेंच गेला होता. त्यानें वसुलक्ष्मीला शांत करविलें आणि तो आपल्या कामासाठीं न्यायालयांत निघून गेला.

मधुकरिकाही राणीच्या महालांत येऊन पोचली आणि राणीला पाहतांच साश्चर्य मुद्रेनें म्हणाली, "बाईसाहेब, मालविकेकरवीं ज्याचे दोहद आपण पुरविले त्या अशोकाला इतका कांहीं फुलांचा बहर आला आहे कीं कांहीं पुसूं नका. अशी फांदी नाहीं कीं जिला कळ्या धरल्या नाहींत. केवळ पांच दिवसांच्या आंतच हा चमत्कार घडून आला बाईसाहेब. आजचा चौथा दिवस."

राणीनें हें वृत्त ऐकतांच आपल्या हातांतली सोन्याची बांगडी काढून ती मधुकरिकेला दिली. ती घेऊन मधुकरिका आनंदानें आपल्या कामाला निघून गेली. तिच्या मागोमाग चोरासारख्या भीत भीत येऊन मालविका आणि बकुलावलिका एका खांबाच्या आड उभ्या राहिल्या होत्या. त्यांची नुकतीच सुटका झाल्याचें वृत्त इरावतीनें धारिणी राणीला सांगितलें होतें आणि त्यामुळें तिला त्यांचा भारी राग आला होता. पण अशोक प्रफुल्ल झाल्याचें ऐकून तिचीही मुद्रा आतां प्रफुल्ल झाली. म्हणून त्या दोघींना आपल्याकडे घेऊन येण्यास तिनें चोपदारणीस सांगितलें. हें ऐकून मालविका आणि बकुलावलिका कांपत कांपत पुढें सरकल्या. तेव्हां राणीनें मालविकेला जवळ घेऊन आणि कुरवाळून म्हटलें, "तो मेला गौतम तसाच लबाड आहे! तुझ्याकडे कांहीं दोष नाहीं आँ!" ह्या गोड शब्दांनीं धारिणीनें दोघींना भयमुक्त केलें.

राजा अग्निमित्र हा मालविकेवर खरोखरीच अनुरक्त झाला आहे, असें जेव्हां धारिणीच्या ध्यानांत आलें, तेव्हां राजाचे मनोरथ आपण पूर्ण करावेत, असा तिनें मनाशीं निश्चय केला. तिच्या मनांत मालविकेविषयीं मत्सर नव्हताच. तिनें पंडिता कौशिकीला सांगून मालविकेला नव्या नवरी-सारखी सजविली आणि तिला, बकुलावलिकेला व परिव्राजिकेला सांगातीं घेऊन धारिणी ही अशोक वृक्षाची शोभा पाहण्यास निघाली. निघतांना

तिनें राजाकडे असा निरोप पाठविला कीं अशोकाला फुलें आलीं आहेत तीं पाहण्यासाठीं आपण क्षणभर प्रमदवनांत येऊन माझी इच्छा पुरवावी.

हा निरोप ऐकून अग्निमित्र राजा अतिशय हर्षभरित झाला. त्याच वेळीं आपल्या सेनेनें विदर्भ राजाला जिंकल्याचें वृत्त त्याच्या कानीं आलें होतें. आतां राजसभेचें कामकाज संपलेंच होतें. म्हणून तो गौतमाला बरोबर घेऊन प्रमदवनाकडे हळुहळू निघाला. मार्गांतील वृक्षराजीकडे पाहून तो गौतमाला म्हणाला, "मित्रा, वसंत ऋतूचें यौवन आतां उतारास लागल्यासारखें दिसतें. हे पाहा पक्व झालेले आंबे पटापट खालीं पडत आहेत!"

बोलत बोलत ते दोघेजण अशोकाजवळ आले. तेव्हां अशोकाकडे पाहून गौतम म्हणतो, "खरोखरच ह्याची शोभा अप्रतिम दिसते. जणूं काय सर्वांग अलंकारांनीं सजवावें, त्याप्रमाणें हा फुलांनीं सजला आहे." हें ऐकून राजा म्हणतो, "ह्याचे दोहद पुरविल्यामुळें सर्व अशोकांचीं फुलें ह्याला एकट्यालाच आलीं आहेत असें वाटतें."

राजा जवळ आलेला पाहून धारिणी परिवारासह उभी राहिली. मालविकेला तर अत्यानंद झाला होता. ती मनांत म्हणते, 'माझ्या अंगावर इतके कौतुकालंकार कां घातले आहेत हें मला समजलें. तथापि, कमल-पत्रावरील जलबिंदूप्रमाणें माझें हृदय थरथरत आहे. पण, माझा डावाच डोळा लवत असल्यामुळें कांहीं अमंगळ होणार नाहीं खास!'

राणी धारिणीनें 'आर्यपुत्राचा जयजयकार असो' असें बोलून राजाला नमस्कार केला आणि सर्व मंडळी अशोकाखालीं बसलीं. इतक्यांत कंचुकी हा राजाजवळ येऊन मुजरा करून म्हणाला कीं "विदर्भ राजावर वीरसेनानें स्वारी करून त्याला वश केलें आहे. आतां आपणाशीं सख्य करण्याच्या हेतूनें विदर्भ राजानें ह्या दोन मुली

आपणाला नजर म्हणून पाठविल्या आहेत." त्या मुलींकडे पाहून राजानें विचारलें, "तुम्हां दोघींना कोणकोणत्या कला येतात ?"

"संगीत कला." त्या मुलींनीं उत्तर दिलें. हें ऐकून राजा राणीला म्हणतो, "देवि, ह्या दोघी मुलींतून तुला पसंत असेल ती तूं घे."

राणीनें त्या मुलींतून निवड करण्याचें काम मालविकेवर सोपविलें.

मालविका आणि परिव्राजिका त्या मुलींकडे टक लावून पाहत होत्याच. त्या दोघी मुलींनीं मालविकेला तत्काळ ओळखलें. मालविकेच्या बाळपणच्या मैत्रिणी होत्या त्या ! एकीचें नांव होतें मदनिका आणि दुसरीचें ज्योत्स्निका. मालविकेला पाहिल्याबरोबर त्या एकदम उद्गारल्या, "अय्या ! ही तर आमची भर्तृदारिका – धन्याची मुलगी !"

असें बोलून त्या उभयता मालविकेच्या पायां पडल्या आणि त्याबरोबर त्यांच्या डोळ्यांना आलेलें पाणीही मालविकेच्या पायांवर पडलें. तिघीही गहिंवरून गेल्या ! ह्याचा अर्थ भोवतालच्या मंडळीस कांहींच उमगेना. ती सर्व मंडळी त्यांच्याकडे टकमक पाहूं लागली.

"बरें ! तुम्ही कोण आहां ?" राजानें त्या मुलींना विचारलें.

त्या दोघींनीं उत्तर दिलें, "ऐकावें महाराज ! आपल्या शूर सरदारानें विदर्भराजाला जिंकून ज्याला प्रतिबंधांतून मुक्त केलें, त्या कुमार माधवसेनाची ही धाकटी बहीण. हिचें नांव मालविका."

मालविका ही राजकन्या आहे हें समजल्यावर राणीच्या मनाला फार चटका लागून ती उद्गारली,

"अरेरे ! माझ्या हातून अजाणतेपणीं मोठीच चूक झाली. मालविका ही राजकन्या असून देवी म्हणवून घेण्यास योग्य असतां तिला मीं नकळत आपली दासी केलें. सुवासिक चंदनाचा खडावा करण्याच्या कामीं मीं उपयोग केला."

राजा म्हणाला, "मालविकेची अशी अवस्था कां झाली ?"

परिव्राजिका कौशिकीला पुढचें सारें वृत्त अवगत होतें. तें उघड करण्यास हीच संधि उचित होय असें ओळखून ती म्हणाली, " ह्यापुढें काय झालें तें सगळें सांगतें मी कपाळकरंटी."

पंडिता कौशिकीचा स्वर ऐकल्यावर त्या मुली म्हणाल्या, " भर्तृदारिके, आर्या कौशिकीच्या स्वरासारखा हिचा स्वर ऐकूं येतो; तेव्हां ही कोण?"

मालविकेनें उत्तर दिलें, " अग तीच ही."

त्या मुली म्हणाल्या, " संन्यासिनीचा वेष धारण केल्यामुळें आम्हांला ह्या ओळखायला देखील आल्या नाहींत. पण ह्याच त्या."

राजाला ह्या गोष्टीचा भारीच अचंबा वाटला. गौतमाला तर मालविकेचा पुढचा वृत्तान्त श्रवण करण्याची उत्कंठा लागून तो पंडिता कौशिकीला म्हणाला, " भगवति, मालविकेचा पुढचा वृत्तान्त तुम्ही काय सांगणार होतां तो सांगा ना."

परिव्राजिका कौशिकीनें प्रदीर्घ उसासा टाकून सर्व वृत्त सांगण्यास प्रारंभ केला. माधवसेन हा मालविकेला बरोबर घेऊन विदिशेला येत असतां कोणता प्रसंग ओढवला, माधवसेनाचा प्रधान म्हणजे आपला भाऊ सुमति हा चोरट्यांशीं शौर्यानें लढत असतां कसा कामास आला, पुढें आपण येथें गुप्तपणें कशा आलों, मालविका येथें कशी आली, इत्यादि सर्व वृत्तान्त सद्गदित होऊन तिनें कथन केला. कौशिकीनें केलेलें चोरांचें वर्णन चालू असतां मालविकेच्या पोटांत एकदम धस्स होऊन ती भ्याल्यासारखी दिसली.

तेव्हां गौतम म्हणाला, " बाई, भिऊं नकोस. त्या चोरांचें आतां तुला कांहीं भय नाहीं. भगवती कौशिकी ह्यापूर्वी झालेली गोष्ट आतां सांगत आहेत." शेवटीं कौशिकी म्हणाली, " मालविकेकरितां माझा भाऊ सुमति हा आपले प्राण खर्ची घालून धन्याच्या ऋणांतून मुक्त झाला," हे शब्द उच्चारतांना दुःखाचा उमाळा आल्यानें कौशिकीला एक शब्द देखील पुढें बोलवेना. तिच्या नेत्रांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. तें पाहून

राजा म्हणाला, " ह्या जगांत शरीर धारण करणाऱ्यांची अशीच स्थिति असते! सुमतीनें ज्याचें अन्न खाल्लें, त्याच्यासाठीं सुमतीनें आपलें जीवित वेंचलें. तो कृतार्थ झाला! त्याला सद्गति मिळणारच!!"

धारिणी म्हणाली, "भगवति, तुमच्यावर आणि मालविकेवर असे अघोर प्रसंग ओढवले त्याला उपाय नाहीं. पण आज इतके दिवस तुम्ही येथें असून मालविका ही एक राजकन्या आहे ही गोष्ट तुम्हीं आम्हांस कशी सांगितली नाहीं? तुमच्या हातून हें अनुचित घडलें."

परिव्राजिका म्हणाली, "मालविकेच्या लहानपणीं एका साधूनें असें भविष्य वर्तविलें होतें कीं मालविका ही एक वर्षभर दासीपणाचा अनुभव घेईल. पण नंतर तिला अनुरूप पतीची प्राप्ति होईल. हें त्या साधूचें बोलणें खरें होणार असें समजून मीं ही गोष्ट तुम्हां सर्वांपासून गुप्त ठेविली. तेव्हां मीं गौप्यस्फोट न करणें हें योग्य नव्हतें का?" ह्यावर राजा म्हणाला, "तसें असेल तर भगवतीचें करणें योग्यच आहे."

ह्या वेळीं एक द्वारपाल तेथें येऊन सांगूं लागला, "विदर्भ देशाची काय व्यवस्था करावयाची असेल तशी आज्ञा व्हावी अशी प्रधानजींची आपणांस विनंती आहे." राजा अंमळ विचार करून म्हणाला, "माझ्या मनांत असें आहे कीं यज्ञसेन आणि माधवसेन ह्या उभयतांमध्यें विदर्भ देश सारखा वांटून द्यावा. सूर्य आणि चंद्र जसे दिवस व रात्र ह्या कालविभागांवर आपला अधिकार चालवितात तसा त्या बंधूंनीं वरदा नदीचें उत्तर तीर व दक्षिण तीर ह्या प्रदेशांवर अनुक्रमें राज्याधिकार चालवावा."

ही राजाची आज्ञा ऐकतांच ज्योत्स्निका हळूच मालविकेला म्हणाली, "माधवसेनाला विदर्भाचें अर्धें राज्य मिळणार हें फार उत्तम झालें बाई!" मालविका उद्गारली, "अग, तो जिवानिशीं सुटला हेंच भाग्य समज!"

मंत्रिमंडळाचा राजासारखाच अभिप्राय पडला आणि त्यांनीं यज्ञसेन आणि माधवसेन ह्यांमध्यें विदर्भ देशाची वांटणी करून त्यांना अग्निमित्र राजाचे मांडलिक होऊन राहण्यास सांगितलें.

इकडे अग्निमित्र राजाच्या वडिलांनीं गंगातीरीं अश्वमेध यज्ञ आरंभला होता. त्यांनीं अग्निमित्राचा पुत्र वसुमित्र ह्यास यज्ञीय अश्वाच्या रक्षणार्थ पाठविलें होतें. वसुमित्र अश्वाला पृथ्वीवर फिरवून आणि शत्रूंचा पाडाव करून यज्ञमंडपांत ह्याच सुमारास परत आला. हें पुत्रविजयाचें वृत्त अग्निमित्राच्या कानीं आल्यानें त्यास आणि इतरांस आनंदाचें भरतें आलें. ह्या आनंदाच्या प्रसंगीं यज्ञसेनाच्या मेहुण्यासुद्धा सर्व बंदिवानांस तत्काळ बंधमुक्त करण्याची त्यानें आज्ञा केली.

धारिणीच्याही मनांत राजाचें प्रिय करावें असें आलें. 'अशोकाला फुलें आलीं तर तुझे मनोरथ मी पुरे करीन' असें तिनें मालविकेला पूर्वींच आश्वासन दिलें होतें. पुत्रविजयाचा हर्ष व्यक्त करण्याच्या निमित्तानें ही संधि साधून घ्यावी असें तिनें ठरविलें. मालविका ही अशा तशाची मुलगी नसून ती राजकन्या आहे अशी धारिणीची आतांच खात्री पटली होती. ती मालविकेचा हात आपल्या हातांत घेऊन राजाला म्हणाली,

"आर्यपुत्र, आपण मला आनंदाचें वृत्त सांगितलें म्हणून त्याबद्दल आपणांस कांहींतरी पारितोषिक दिलें पाहिजे. तरी ही मालविका आपण पारितोषिक म्हणून घ्यावी." असें बोलून ती मालविकेचा हात राजाच्या हातांत देऊं लागली.

राजाला ही गोष्ट अत्यंत प्रिय होती हें सांगावयास नकोच. तथापि तो थोडा लाजल्यासारखा होऊन स्तब्ध उभा राहिला. तेव्हां धारिणी राणी मधुर हास्य करून म्हणाली, "काय? आपण माझी अवज्ञा करायची?"

हें ऐकून गौतम थट्टेनें म्हणाला, "अहो, तुम्हांला ठाऊक नाहीं काय? नवा नवरा म्हटला म्हणजे तो असाच लाजत असतो. §

राजानें गौतमाकडे डोळे वटारून पाहिलें. पण राणीकडे वळून तो म्हणाला, "तुझ्यापुढें आमचें काय चालणार! तुझ्या आज्ञेबाहेर कांहींच बोलण्याची आमची प्राज्ञा नाहीं."

§ सर्वो नववरो लज्जातुरो भवति।

हें ऐकून परिव्राजिका संतुष्ट होऊन म्हणाली, "तर मग ह्यावरून महाराजांनीं मालविकेचा स्वीकार केला असें झालें."

गौतम म्हणाला, "बाईसाहेबांचें मन फार उदार आहे."

धारिणीच्या पाठीमागें तिच्या दासी उभ्या होत्या. त्यांनीं पुढें होऊन मालविकेला प्रणाम केला आणि त्या म्हणाल्या,

"छोट्या बाईसाहेबांचा जयजयकार असो."

ह्याप्रमाणें राजाला मालविका समर्पण करून राणीनें त्याचे मनोरथ पूर्ण केले आणि विचारलें, "आर्यपुत्र, आपलें आणखी काय प्रिय करावें?"

ह्यावर राजानें उत्तर दिलें, "तूं माझ्यावर सदैव प्रसन्न राहत जा म्हणजे झालें! यापरतें माझें आणखी काय प्रिय करावयाचें आहे? तसेंच मी राज्य करीत असतां माझ्या प्रजा सर्वकाळ सुखांत, आनंदांत आणि समाधानांत राहोत एवढीच माझी इच्छा आहे!"

## स्वाध्याय

१. "शहर जवळ असतां, रत्नाची परीक्षा करण्यासाठीं खेड्यांत कशाला जावें?" हे उद्गार कोणीं, कोणत्या प्रसंगीं काढले आहेत? त्यांना काय सुचवावयाचें आहे?
२. श्रेष्ठ प्रतीच्या शिक्षकाच्या अंगीं कोणते गुण असणें आवश्यक आहे?
३. अशोक वृक्षाला फुलें येण्याविषयीं कोणता कविसंकेत आहे?
४. इरावती व धारिणी ह्यांच्या स्वभाव-विशेषाची तुलना करा.
५. मालविकेची सुटका करण्यासाठीं विदूषकानें कोणती युक्ति योजिली?
६. पंडिता कौशिकी राजवाड्यांत येऊन राहिली होती, ती कोणत्या हेतूनें?
७. केवळ बुद्धीनें काम होत नाहीं, ह्या अर्थाचें कोणतें सुभाषित आहे?
८. विदूषकानें आपल्या जानव्याचा काय उपयोग केला? इतर नाट्यकथेंत जानव्याचा उपयोग केल्याचें तुम्हांस माहीत आहे काय? कोठें?
९. विदूषकाचा खादाडपणा कोणत्या उद्गारांवरून दिसतो?
१०. कालिदासाच्या दोन सुंदर उपमा सांगा.

श्री हर्षकृत

# नागानंद

## पात्रें

| | |
|---|---|
| जीमूतवाहन | नायक, विद्याधरांचा राजा |
| आत्रेय | विदूषक<br>जीमूतवाहनाचा मित्र |
| जीमूतकेतु | जीमूतवाहनाचा पिता |
| विश्वावसु | सिद्धांचा राजा |
| मित्रावसु | विश्वावसूचा पुत्र |
| शंखचूड | एक नाग |
| गरुड | पक्ष्यांचा राजा |
| मलयवती | नायिका<br>विश्वावसूची कन्या |
| चतुरिका | मलयवतीची दासी |



मलयवती व चतुरिका अशोकवृक्षाच्या आडून सर्व संवाद ऐकत होत्या.

अनुक्रम १५५
विभाग ग्रा॰ वा
क्रमांक २०३८
नों. दि. ९-४-
वाचनालय

श्री ह र्ष कृ त

# ना गा नं द

★ नागांना आनंद झाल्याचें कथानक ह्या नाटकांत वर्णिलें असल्यानें श्रीहर्षानें ह्या नाटकास नागानंद असें नांव दिलें आहे.

"आई! तूं कशाला शोक करतेस? परदुःखानें दुःखित होणारे महात्मे आतां राहिले आहेत कोठें? परहिताला स्वहित मानणारे सज्जन आतां कोठें दिसत नाहींत!" शंखचूड आपल्या मातेचें सांत्वन करीत होता.

"बाळा, तुझा कोणीच का रे त्राता उरला नाहीं? मी आतां कोणाच्या तोंडाकडे पाहूं?" आई कळवळून म्हणाली.

हें करुणाजनक संभाषण कानांवर पडल्यानें जीमूतवाहन त्वरेनें पुढें होऊन म्हणाला, "हा मी त्याचें संरक्षण करण्यास सिद्ध आहें."

देवांपेक्षां कनिष्ठ व मनुष्यांपेक्षां श्रेष्ठ अशा कांहीं योनि आहेत. त्या म्हणजे यक्ष, गंधर्व, किन्नर, सिद्ध व विद्याधर ह्या होत. त्यांपैकीं विद्याधरांचा जीमूतकेतु नांवाचा एक राजा होता. तो वृद्ध झाल्यावर तपश्चर्या करण्या-करितां अरण्यांत निघून गेला. तेव्हां त्याचा पुत्र जीमूतवाहन ह्याच्यावर

अर्थातच राज्याचा सर्व भार पडला. जीमूतवाहन मोठा पराक्रमी व न्यायी होता. अल्पावधींतच त्यानें प्रजेला न्याय्यमार्गाला लाविलें, सज्जनांचें कल्याण केलें, आप्तांचा परामर्श घेतला, कल्पवृक्षाप्रमाणें याचकांना त्यांनीं मागितल्या-पेक्षांही अधिक दान देऊन संतुष्ट केलें आणि आतां आपलें कांहींएक कर्तव्य राहिलें नाहीं, आपणही अरण्यांत जाऊन माता-पितरांची सेवा करावी असे विचार अल्पवयांतच त्याच्या मनांत येऊं लागले. त्यानें आतांपावेतों राज्य केलें, तें केवळ वडिलांच्या इच्छेनुसार. स्वतःच्या महत्त्वाकांक्षेनें नव्हे.

जीमूतवाहनाचा आत्रेय म्हणून एक विदूषक मित्र होता. त्याला बरोबर घेऊन जीमूतवाहन एके दिवशीं वनांत जावयास निघाला. जातां जातां वाटेंत विदूषक त्याला म्हणाला, “मित्रा, राज्यसुखाचा त्याग करून तूं वनवासाचा अंगीकार करीत आहेस ह्याला काय म्हणावें?”

“वडिलांची सेवा केल्यानें मला जें सुख होईल तें त्रिभुवनाचें राज्य केल्यानेंही होणार नाहीं. आजवर सहस्रावधि राजांनीं जिचा उपभोग घेतला आहे त्या पृथ्वीचा उपभोग घेणें म्हणजे उच्छिष्ट पदार्थ सेवन करण्यासारखेंच आहे. म्हणून आपला देह परोपकारार्थ वेंचावा असा मीं संकल्प केला आहे.” जीमूतवाहनानें उत्तर दिलें.

“अरे, तुझा शत्रु मतंग तुझें राज्य घशांत घालण्यासाठीं टपून बसला आहे. ह्या वेळीं पित्याची शुश्रूषा करणें हें योग्य होणार नाहीं, असें मला वाटतें.” विदूषक म्हणाला.

ह्यावर जीमूतवाहनानें उत्तर केलें, “त्यानें राज्य घेतलें, तरी मला त्याची क्षिति नाहीं. आपल्या देहासकट हें सर्व परार्थासाठीं आहे असें मी मानतों.”

ह्याप्रमाणें ते दोघे बोलत बोलत जीमूतवाहनाच्या वडिलांचा आश्रम जेथें होता तेथें येऊन पोचले आणि तेथेंच राहिले.

पुढें एके दिवशीं जीमूतवाहनाचे वडील जीमूतकेतु ह्यांनीं जीमूतवाहन आणि विदूषक ह्या दोघांना अशी आज्ञा केली कीं " दर्भ, समिधा, कंद, मुळें व फळें संपलीं आहेत, तीं घेऊन या आणि मलयपर्वतावर जाऊन आश्रम बांधण्यास सोयीस्कर असें स्थान शोधून काढा."

वडिलांच्या आज्ञेप्रमाणें जीमूतवाहन आणि विदूषक मलयपर्वतावरील अरण्यांत संचार करूं लागले. त्या वेळीं पर्वताच्या कड्यांवरून पडणाऱ्या जलप्रपातावरून वाहणारा थंडगार वारा त्यांचे श्रम दूर करूं लागला. चंदनवृक्षांच्या शाखांना मदोन्मत्त हत्ती आपलीं गंडस्थळें घाशीत असल्यामुळें त्यांतून सुवासिक रस बाहेर ओघळत होता. समुद्राच्या लाटा तीरावर आदळत असल्यामुळें त्यांचा प्रतिध्वनि गिरिकंदरांतून निनादत होता.

फिरतां फिरतां जीमूतवाहन आणि विदूषक एका प्रशान्त, रमणीय स्थळीं येऊन थबकले. तेथें वृक्षांच्या शाखांवर बसलेले पोपटांचे थवेच्या थवे सामवेदांतील ऋचा सुरावर गात होते. त्या गोड ऋचा त्यांच्या कानांवर येऊं लागल्या. तें सामगीत श्रवण करीत तेथेंच बसावें, तेथून हलूं नये, असें त्यांना वाटूं लागलें. लांबून येणारा होमद्रव्यांचा सुगंध त्यांच्या नासिका तृप्त करूं लागला. हें तपोवन असावें असें त्यांना आतां निश्चित वाटलें. थोडे पुढें जातात तों पुष्कळ ऋषिकुमारिका हातांत लहान लहान कलश घेऊन लहान लहान झाडांचीं आळीं पाण्यानें भरीत असलेल्या त्यांना दिसल्या.

ज्यांचीं वल्कलें बनवितात अशा झाडांच्या साली ठिकठिकाणीं वाळत पडलेल्या होत्या.

एक झरा झुळ झुळ वाहत होता. त्याचें निर्मळ उदक नभासारखें चमकत होतें. झऱ्याजवळ फुटलेले कमंडलु आणि तुटलेल्या माळांचे दोरे पडलेले होते. हिंस्र श्वापदांचे समुदाय निर्भयपणें वृक्षांच्या छायेंत बसले होते. ऋषिकुमार मुखानें वेदपठण करीत होते आणि हातांनीं समिधा काढीत होते.

अहाहा! काय ती तपोवनाची रम्यता! तेथील वृक्षांनाही अतिथि-सत्कार कसा करावा हें शिकविलें असावें असें दिसलें! कारण, वृक्षांनीं भृंगांचा मधुर गुंजारव करून स्वागतपर गीत गाइलें, पुष्पांची वृष्टि करून अर्घ्यप्रदान केलें आणि फलभारांनीं नम्र झालेलीं आपलीं मस्तकें लववून अभिवादन केलें.

समोरच एक देवालय होतें. त्याच्या आंत कोणी देवांगना वीणेच्या तारा आपल्या कोमल अंगुलींनीं छेडीत गात बसली होती. बाहेरच्या बाजूस वाकड्या माना करून निश्चल उभे राहिलेले हरिणांचे समूह देहभान विसरून तें मधुर गायन ऐकण्यांत तल्लीन झालेले त्यांना दिसले. हरिणांच्या तोंडांत अर्धवट चर्वण केलेले दर्भाचे घास जसेच्या तसेच होते. त्यांचे कान एका बाजूला टवकारलेले होते आणि त्यांचे डोळे अर्धवट मिटलेले होते.

"आपण देवालयांत जाऊन कोण गात आहे तें पाहूं या." असें विदूषक म्हणाला. पण तसें करणें मर्यादा सोडून होईल असें जीमूत-वाहनास वाटलें. ते दोघेजण तमालवृक्षाच्या आड उभे राहून देवदर्शनाच्या वेळेची वाट पाहत राहिले.

हें देवालय गौरीचें होतें. त्यांत विश्वावसु नामक एका विद्याधराची कन्या मलयवती ही गौरीची आराधना करीत बसली होती. तिच्या सांगातीं चतुरिका दासी होती. 'हे गौरी, तुझ्या कृपेनें माझे मनोरथ सिद्धीस जावोत', अशी प्रार्थना करून मलयवती गात होती आणि मधून मधून चतुरिका तिला म्हणत होती, "ह्या निर्दय देवीपुढें तूं इतकी प्रार्थना करीत असूनही ती तुला प्रसन्न होत नाहीं, तर मग तूं विनाकारण कशाला आपली काया कष्टवितेस?"

त्यावर मलयवती म्हणाली,

"अग चतुरिके, तूं या देवीची विनाकारण निंदा करूं नकोस. कालच रात्रीं तिनें माझ्या स्वप्नांत येऊन मला सांगितलें, 'तुझी भक्ति पाहून

मी प्रसन्न झालें आहें. चक्रवर्ती असणारा विद्याधर स्वतः येऊन तुझें पाणीग्रहण करील'."

हें संभाषण ऐकतांच विदूषक जीमूतवाहनास म्हणाला, "मंदिरांत जाऊन देवीचें दर्शन घेण्यास आपणांला ह्याच समय योग्य आहे." ते दोघेजण मंदिरांत गेले. मलयवतीच्या गायनवादन-कौशल्यानें त्यांच्या कानांस अगोदरच सुख झालें होतें; आतां त्यांच्या नेत्रांस सुख होऊं लागलें.

जीमूतवाहनाच्या मनांत कल्पनातरंग येऊं लागले. ही देवकन्या असेल तर इंद्राच्या सहस्र नेत्रांचें पारणें फिटलें म्हणावयाचें! ही नागकन्या असेल तर पाताळांत 'चंद्र' नाहीं असें आतां पाताळवासी लोकांना म्हणतां यावयाचें नाहीं! ही विद्याधर कुलांत जन्मली असेल तर आमच्या कुलाला अभिमान वाटला पाहिजे.

जीमूतवाहनाला पुढें करून विदूषक मलयवतीला म्हणाला,

"अग मुली, देवीनें तुला जो वर दिला तो पाहा येथेंच उभा आहे."

मलयवती प्रथम दचकून उभी राहिली आणि लज्जेनें व उत्कंठेनें त्याजकडे पाहूं लागली. क्षणभरानें ती चतुरिकेस म्हणाली, "चल बाई, आपण घरीं जाऊं." ती जाऊं लागली. तेव्हां कांहीं क्लृप्ति लढवून तिला खोळंबवून धरावें म्हणून विदूषक म्हणाला, "अग मुली, ह्या तुमच्या तपोवनांत अशीच रीत आहे कीं काय, कोणी पाहुणा आला तर त्याच्याशीं दोन शब्दही बोलूं नयेत?"

हें ऐकून चतुरिका मलयवतीस म्हणाली, "हा ब्राह्मण म्हणतो तें खरें आहे. आपण आलेल्या अतिथींचा सत्कार केलाच पाहिजे." असें बोलून जीमूतवाहनाकडे वळून ती म्हणाली, "महाराज, आपलें स्वागत असो. ह्या आसनावर बसून आपण तें अलंकृत करावें."

जीमूतवाहन त्या आसनावर बसला. ह्याच वेळीं कुलगुरु कौशिक ह्यांचा शिष्य शांडिल्य तेथें आला. त्यालासुद्धा जीमूतवाहनाकडे पाहून

आश्चर्य आणि आनंद वाटला. कारण भूमीवर जीमूतवाहनाची चक्रवर्ति-चिन्हांकित पंक्ति त्यानें पाहिली आणि तो मनांत म्हणाला, 'ह्या दोघांचा जर विवाह होईल तर सोन्याहून पिवळें. पुष्कळ दिवसांनीं, रूपानें आणि वयानें अनुरूप अशा वधूवरांची गांठ ब्रह्मदेवानें बांधिली असें होईल.'

मलयवतीकडे वळून शांडिल्य म्हणाला, "दुपार टळून गेली आहे, म्हणून लवकर घरीं चलावें अशी कुलगुरूंची आपणांस आज्ञा आहे."

घरचें बोलावणें आलेलें पाहून मलयवतीचें मन द्विधा झालें. एकीकडे घरीं जाण्याविषयीं कुलगुरूंची आज्ञा आणि दुसरीकडे ह्या पुरुषाच्या दर्शनाची ओढ. काय करावें? क्षणभर तिच्या मनाचा निर्धार होईना. तिचें हृदय हेलकावे खाऊं लागलें. शेवटीं, जीमूतवाहनाकडे लज्जेनें आणि प्रेमानें पाहत पाहत ती चतुरिकेसह निघून गेली.

ती दृष्टिआड होईपर्यंत तिच्याकडे दृष्टि टाकीत टाकीत जीमूतवाहन मनांत म्हणाला, "ही येथून घरीं चालली आहे खरी; तथापि माझ्या हृदयांत तिनें वस्ति केली आहे असें मला वाटतें."

मलयवतीचे वडील विश्वावसु ह्यांच्या मनांत जीमूतवाहनालाच मलयवती द्यावी असें होतें. म्हणून त्यानें आपला मुलगा मित्रावसु ह्याला त्याचा शोध करण्यास पाठविलें होतें. मित्रावसु फिरत फिरत आला तों त्याला जीमूतवाहन आणि विदूषक एका चंदनलतागृहांत बसलेले दिसले.

मित्रावसूला दुरून येतांना पाहून जीमूतवाहनानें केळीच्या पानाखालीं एक वस्तु घाईघाईनें लपवून ठेविली. ती वस्तु म्हणजे त्यानें एका चंद्रकांत शिलातलावर काढलेलें आपल्या हृदयवल्लभेचें चित्र होतें. मित्रावसु त्यांच्या सन्निध आला आणि म्हणाला, "तात विश्वावसूंची आपणांस अशी विनंती आहे कीं आमची कन्या मलयवती हिचा आपण स्वीकार करावा." पण जीमूतवाहनाला गौरीच्या मंदिरांत जी कन्या दृष्टीस पडली होती तीच मलयवती होय हें अवगत नव्हतें, म्हणून तो म्हणाला,

" विश्वावसूशीं अशी सोयरीक करणें कोणास बरें आवडणार नाहीं ? पण एकीकडचें चित्त काढून तें दुसरीकडे लावणें मला शक्य नाहीं, म्हणून आपण म्हणतां तें मला मान्य करवत नाहीं. "

विदूषक म्हणाला, " माझा मित्र पराधीन आहे. ह्याचे वडील जीमूतकेतु ह्यांच्याकडे जा आणि त्यांना विनंती करा, म्हणजे तुमचें कार्य होईल. "

तेव्हां मित्रावसू जीमूतकेतूला भेटण्यासाठीं तेथून निघून गेला.

गंमत अशी कीं मलयवती व चतुरिका त्याच चंदनलतागृहाच्या बाहेर अशोकवृक्षाच्या आडून हा सर्व संवाद ऐकत होत्या.

आपल्या वडिलांचा निश्चय मित्रावसूच्या तोंडानें ऐकून मलयवतीला प्रथम हर्ष झाला, पण जीमूतवाहनाच्या तोंडचे उद्गार ऐकून तिची चर्या एकाएकीं पालटली. तिचें अंत:करण निराशेनें भरून गेलें. तिनें आपल्या मनाशीं एक बेत रचला. मित्रावसु दूर गेला कीं नाहीं हें पाहण्यास तिनें चतुरिकेस पाठविलें आणि म्हटलें, " मी देखील आतां येथून परत जाईन. "

चतुरिकेस मलयवतीनें दूर जावयास सांगितलें खरें, पण मलयवतीच्या संशयास्पद हालचालींवरून ती आपल्या जिवाचें कांहीं बरें-वाईट करून घेईल अशी आशंका चतुरिकेच्या मनांत आली. ती झाडाआड उभी राहून मलयवती काय करते आहे हें पाहत राहिली.

आतां आपण एकट्याच आहोंत असें पाहून मलयवतीनें आत्महत्येचा उद्योग आरंभिला. अशा असह्य दु:खांत शरीर ठेवून तरी काय करावयाचें असा विचार करून तिनें वेलीचा फास आपल्या गळ्यास लावला व ती मनांत म्हणाली, " हे गौरी, पुढच्या जन्मीं तरी तूं मला प्रसन्न हो. "

हा प्रकार पाहून चतुरिका घाबऱ्या घाबऱ्या ओरडली, " कोणी धावा हो धावा ! ही राजकन्या गळफास लावून जीव देत आहे. "

जीमूतवाहन आणि विदूषक झटदिशीं लतागृहाच्या बाहेर आले.

" अग वेडे मुली, तूं कशाकरितां एवढें साहस करितेस ? ज्या कोमल हातानें ह्या लतेवरील फूलसुद्धा तोडण्यास तुझ्या जिवावर यावें, ती वेल



" हे गौरी, पुढच्या जन्मीं तरी तूं मला प्रसन्न हो."

अघोर कृत्य करण्यासाठीं तूं तोडून काढलीस हें काय ? थांब. हार घालण्यास योग्य अशा ह्या तुझ्या कंठांत ज्यानें फास घातला त्या अपराधी हाताला मी धरून ठेवतों." असें म्हणून जीमूतवाहनानें मलयवतीचा हात धरिला. मलयवती गोंधळली आणि हात सोडवून घेऊं लागली.

चतुरिका म्हणाली, "महाराज, आपणच अपराधी आहांत ! मित्रावसूनें ही आपली भगिनी आपणांस देऊं केली असतां आपणच हिचा स्वीकार केला नाहीं, म्हणूनच ही आत्महत्येस प्रवृत्त झाली."

जीमूतवाहनास जितका खेद झाला तितकाच हर्षही झाला. तो म्हणाला, "काय ! हीच का तर मग त्या विश्वावसूची कन्या मलयवती ! हो ! ही त्याचीच असावी. कारण, रत्नाकरावांचून चंद्रकलेची उत्पत्ति कोठून होणार ?" §

नंतर सर्वजण लतागृहांत गेले. तेथें काढलेलें चित्र पाहून मलयवती हसत हसत चतुरिकेस म्हणाली, "गडे, हें चित्र बघ हुबेहूब माझ्यासारखें दिसतें आहे !"

चतुरिका म्हणाली, "माझ्यासारखें कशाला म्हणतेस ? माझेंच कां म्हणत नाहींस ? तुझें जणूं हें प्रतिबिंबच पडलें आहे !"

विदूषक म्हणाला, "तुम्हां उभयतांचे हेतु सिद्धीस गेले ! हाच तुमचा गांधर्वविवाह झाला."

इतक्यांत मलयवतीला आपली सून करून घेण्याचें मान्य केल्याविषयीं जीमूतकेतूला निरोप आला आणि म्हणून सर्व मंडळी जीमूतकेतूच्या आश्रमाकडे निघून गेली.

जीमूतवाहन आणि मलयवती ह्यांचें लग्न झालें. सहस्रावधि पाहुणे जमले होते. जिकडे तिकडे नाचरंग सुरू झाले. खा, प्या आणि चैन करा, हें सर्वत्र चाललें होतें. विद्याधर तरुण आपापल्या प्रियांसमवेत

---

§ रत्नाकरादृते कुतश्चन्द्रलेखायाः प्रसूतिः ।

मदिरासेवनांत गढून गेलेले दिसूं लागले. विदूषकाची चंगळ झाली. लग्नांत भोळसट व कुरूप ब्राह्मणाची जी थट्टा होते तशी विदूषकाची झाली. ओढाताणींत त्याचें यज्ञोपवीत तुटलें !

जीमूतवाहन मलयवतीच्या संगतींत दंग झाला होता. इतक्यांत मित्रावसु आल्याची वार्ता चेटीनें जीमूतवाहनास सांगितली. जीमूतवाहन एकाएकीं राज्यांतून निघून गेल्याचें कळल्यामुळें मतंगानें जीमूतवाहनाच्या राज्यावर खरोखरच स्वारी केली होती. ही वार्ता मित्रावसूला कळतां-क्षणींच तो जीमूतवाहनाकडे आला होता. तो जीमूतवाहनास म्हणाला, " मतंगाला ठार मारून मगच तुमच्याकडे मीं यावयास पाहिजे होतें. पण तिकडे जाण्यापूर्वीं तुम्हांस कळवून जावें म्हणून मी इकडे आलों आहें. "

हें ऐकून जीमूतवाहनास विषादाऐवजीं हर्षच झाला. तो म्हणाला,

" अरे मित्रावसो, तूं काय मतंगाला ठार मारावें असें म्हणतोस ? छे ! छे ! तुझें हें कृत्य अत्यंत दारुण होय ! अरे, दुसऱ्याचा जीव वांचविण्यासाठीं माझा देहसुद्धा देण्यास मी सदैव सिद्ध असतों. मग केवळ राज्यासाठीं शेकडों प्राण्यांचा वध करण्यास मी तुला अनुज्ञा कशी देईन ? शरिरांत असलेल्या षड्रिपूवांचून दुसऱ्या कोणाशींही हा जीमूतवाहन वैर धरीत नाहीं. केवळ राज्यलोभामुळें मला ह्या षड्रिपूंच्याच आहारीं जावें लागलें आहे. हें राज्य जाऊं द्या एकदाचें. म्हणजे माझ्या मनांतील रागलोभादि पापें तरी जळून खाक होतील. "

मित्रावसूला अर्थातच ही गोष्ट पसंत पडणें शक्य नव्हतें. पण नवीनच नातें जडलेल्या आपल्या मेहुण्यापुढें त्याचें कांहीं चालेना. जीमूतवाहनानेंही त्याचें मन ओळखिलें. आतां हा आवेशांत दिसतो ; कांहीं वेळानें त्यास बोध करून त्याचें मन वळवावें ह्या विचारानें जीमूतवाहन मित्रावसूला घेऊन समुद्रकांठीं फिरावयास गेला.

फिरतां फिरतां जीमूतवाहन मित्रावसूला म्हणाला,

" मित्रा, ह्या अरण्यवासांत आपणांस सर्व कांहीं आयतें मिळत आहे. राहण्यास वृक्षांची छाया, बसण्यास स्वच्छ शिलातल, खाण्यास कंदमुळें, पिण्यास झऱ्याचें थंड पाणी, सहवासास मृग, झोपण्यास कोमल तृणाची शय्या, सर्व कांहीं आहे. तथापि, येथें राहणें व्यर्थ आहे असें मला वाटतें. कारण येथें एका गोष्टीची मोठी उणीव भासते. ती म्हणजे येथें आपल्या हातून परोपकार घडण्यास अवसर नाहीं. "

असें बोलतां बोलतां जीमूतवाहनाचें मलयाद्रीच्या शिखराकडे लक्ष गेलें. तो कौतुकानें म्हणाला, " हिमालयाच्या शिखरांप्रमाणें हीं मलया-चलाचीं शिखरेंसुद्धा कशीं शुभ्र दिसत आहेत पाहा ! "

मित्रावसु म्हणाला, " अरे, हीं शिखरें हिमानें आच्छादलेलीं नाहींत. नागांच्या हाडांचे ते ढीग आहेत ! पूर्वीं पक्षिनायक गरुड सर्व पातालवासी नागकुलांचा संहार करण्यास प्रवृत्त झाला, तेव्हां नागराज वासुकी ह्यानें नागकुलाचा समूळ उच्छेद टळावा म्हणून गरुडाशीं असा संकेत केला कीं प्रत्यहीं गरुडाला एकेक नाग आणून देण्यांत यावा. त्याप्रमाणें ह्या ठिकाणीं पक्षिराज गरुड प्रतिदिवशीं एकेक नाग मारून नागाचें केवळ रक्तमांस भक्षण करतो आणि हाडें फेकून देतो. तींच हीं हाडें ! हीं हाडें पांढरीं शुभ्र असल्यामुळें दुरून हिमालयाच्या शिखरांचा तेथें भास होत आहे इतकेंच. "

ही गोष्ट ऐकून जीमूतवाहनाला अत्यंत खेद झाला. तो उद्गारला, " ह्या नश्वर देहाचें पोषण करण्यासाठीं मूर्ख लोक केवढें पाप करतात पाहा ! § ह्या निर्दय गरुडाच्या तडाख्यांतून नागांची मुक्तता करणारा एकही मायेचा पूत आजवर निर्माण झाला नाहीं ? माझें शरीर देऊन ह्या एका तरी नागाचे प्राण वांचविण्याची मला संधि मिळेल काय ? "

---

§ सर्वाशुचिनिधानस्य जरत् तृणलघीयसः । शरीरकस्यापिकृते मूढाः पापानि कुर्वते ।

इतक्यांत विश्वावसूचा द्वारपाल मित्रावसूचा शोध करीत करीत तेथें आला आणि मित्रावसूला म्हणाला, " कांहीं महत्त्वाच्या कामासाठीं आपणांस घरीं त्वरित बोलाविलें आहे. "

तेव्हां जीमूतवाहनाचा निरोप घेऊन मित्रावसु घरीं निघून गेला. जातांना तो जीमूतवाहनास म्हणाला, " आपणही ह्या भयप्रद प्रदेशांत फार काळ राहूं नये. लवकरच परत फिरावें. "

आतां जीमूतवाहन एकटाच आपल्या विचारतंद्रींत भटकूं लागला. तों अकस्मात् " हा बाळा शंखचूडा, आज तुझा वध होणार ! आणि तोही ह्या तुझ्या हतभागी मातेच्या डोळ्यांदेखत ! " असा विलाप जीमूतवाहनाच्या कानांवर पडला. म्हणून ही स्त्री कोण, कोठली आणि तिच्या दुःखाचें कारण काय हें समजून घेण्यासाठीं, ज्या दिशेकडून तो आक्रोश ऐकूं येत होता, त्या दिशेकडे जीमूतवाहन जाऊं लागला. थोडीं पावलें गेल्यावर नाग शंखचूड आणि त्याची म्हातारी आई त्याला दिसली. शंखचूड मातेचें सांत्वन करीत होता, " आई, हें शरीर केव्हां तरी नाश पावणारच. ज्या दिवशीं तें निर्माण झालें त्याच दिवशीं त्याचा नाश होणार हें ठरलें गेलें. मग त्याच्याविषयीं शोक करण्यांत काय अर्थ आहे ? § "

म्हातारीस हा वेदान्त ह्या वेळीं कसा पटणार ! तिनें शंखचूडाच्या गळ्यास मिठी मारून हंबरडा फोडला. तेव्हां शंखचूड शांतपणें म्हणतो, " आई, तुझ्या रडण्याचा उपयोग काय ? दुसऱ्याच्या दुःखानें कळवळणारे महात्मे आतां राहिले आहेत कोठें ? परहिताला स्वहित मानणारे सज्जन सांप्रत कोठें दिसत नाहींत. " †

म्हातारी म्हणाली, " बाळा, आपणांस कोणीच का रे त्राता उरला नाहीं ? मी आतां कोणाच्या तोंडाकडे पाहूं ? "

---

§ क्रोडीकरोति प्रथमं यदा जातमनित्यता ।
धात्रीव जननी पश्चात् तदा शोकस्य कः क्रमः ॥

† ये नित्य परदुःखदुःखितधियः ते साधवोऽस्तंगताः ।

हें हृदयस्पर्शी संभाषण ऐकून जीमूतवाहन त्वरेनें पुढें होऊन म्हणाला, "बाई, हा मी येथें तुमचें संरक्षण करण्यास आलों आहें."

म्हातारीस वाटलें कीं हा गरुडच आहे. म्हणून तिनें शंखचूडास पदराखालीं झाकून घेतलें आणि "मला अगोदर खा; वासुकीनें तुझ्या आहारासाठीं आज मला पाठविलें आहे." असें ती म्हणाली. तिला सगळीकडे गरुडच दिसत होता!

मातेच्या त्या त्यागानें जीमूतवाहनाचें हृदय अधिकच कळवळलें. तो म्हणाला, "निर्दय गरुडलासुद्धा ह्या म्हातारीची दया येईल."

हा कोणी साधुपुरुष आहे, गरुड नव्हे अशी शंखचूडाची खात्री झाली आणि त्यानें आपल्या आईस तसें सांगितलें. तेव्हां तिच्या आनंदास सीमा उरली नाहीं. तिनें जीमूतवाहनाकडे पाहिलें, तेव्हां तो म्हणाला,

"बाई, तुमच्या पुत्राचा जीव वांचविण्याचा एक उपाय मी सांगतों. तुमच्याजवळ हीं जीं तांबडीं वस्त्रें आहेत, तीं मला द्या. मी तीं परिधान करून ह्या वध्यशिलेवर जाऊन बसतों. तुम्ही आपल्या मुलाला घेऊन घरीं जा. मी नाग आहें असें समजून गरुड मलाच खाऊन टाकील."

हें त्या महात्म्याचें भाषण ऐकून ती म्हातारी म्हणाली,

"शिव! शिव!! ज्या अर्थी तूं आपल्या जिवावर उदार होऊन माझ्या पुत्राचा जीव वांचविण्यास सिद्ध झालास, त्या अर्थी तूं मला पुत्रापेक्षांही प्रिय झाला आहेस. म्हणून तुझ्या म्हणण्याला मला संमति देववत नाहीं."

जीमूतवाहन शंखचूडाच्या पायां पडून रक्तवस्त्रें मागूं लागला, पण शंखचूडही कांहीं केल्या ऐकेना. तो म्हणाला,

"हे साधो, माझ्यासारखे क्षुद्र प्राणी आजपर्यंत किती जन्मले आणि किती मेले त्याची गणतीच नाहीं! पण दुसऱ्याचे प्राण वांचविण्यासाठीं स्वतःचे प्राण वेंचणारे तुझ्यासारखे उदारधी महात्मे मात्र विरळा! तूं हा आग्रह सोड आणि मी मेल्यावर माझी माता प्राणत्याग करणार नाहीं

असा कांहीं उपाय योज. तोंपर्यंत मी जवळच असलेल्या गोकर्णेश्वराला मातेसह जाऊन त्याचें दर्शन घेऊन येतों."

वध्यशिलेपाशीं आपण आतां एकटेच आहोंत, तेव्हां आपला हेतु सिद्धीस जाण्यास ही संधि चांगली आहे असें जीमूतवाहनास वाटूं लागलें. खुणेचीं लाल वस्त्रें कोठें मिळणार असा तो विचार करीत आहे, तोंच त्याच्या श्वशुराकडून तांबडीं वस्त्रें घेऊन एक दूत जीमूतवाहनाचा शोध करीत अकस्मात् तेथें आला. विद्याधर कुलांत अशी चाल आहे कीं नवीन लग्न झालेल्या पतिपत्नींना दहा दिवसपर्यंत रक्तवस्त्रें परिधान करण्यास द्यावयाचीं.

आपणांस जें पाहिजे तें अनायासें प्राप्त झालें म्हणून जीमूतवाहनाला अत्यानंद झाला. तीं वस्त्रें घेऊन त्यानें दूतास जावयास सांगितलें. तो मनांत म्हणाला, 'आज मलयवतीशीं विवाह केल्याचें खरें खरें सार्थक झालें!'

प्रचंड वारा सुटला. मलयाचलाचीं शिखरें जणूं हलूं लागलीं! गरुडाची स्वारी अंतरिक्षमार्गानें भराऱ्या मारीत येत होती. तें पाहून जीमूतवाहनानें लगबगीनें तीं लाल वस्त्रें आपल्या अंगाभोवतीं लपेटलीं आणि तो वध्यशिलेवर जाऊन बसला. तो मनांत म्हणतो, 'अहाहा! ह्या शिलातलाचा स्पर्श मला किती सुखकारक वाटत आहे! प्रत्यक्ष मातेच्या मांडीचाही स्पर्श बाळपणीं मला इतका सुखद वाटला नसेल! मलयवतीच्या हातच्या चंदनाच्या उटीनेंही मला इतका आल्हाद झाला नसता! मी धन्य आहें! माझ्या हातून जन्मोजन्मीं असाच परोपकार घडावा.'

ह्याप्रमाणें त्याच्या मनांत विचार येत आहेत तोंच गरुड त्याच्या समोर येऊन ठाकला. तो जीमूतवाहनावर झडप घालणार इतक्यांत जीमूतवाहनावर आकाशांतून पुष्पवृष्टि झाली. गरुडाला वाटलें कीं आपल्या पंखांच्या प्रबळ वायूनें स्वर्गलोकींचा पारिजात कंपायमान होऊन ही पुष्पवृष्टि झाली असावी! तेव्हां ह्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहींच नाहीं, असें म्हणून

---

। उत्पद्यन्ते म्रियन्ते च मादृशाः क्षुद्रजन्तवः। परार्थदत्तदेहानां त्वादृशां संभवः कुतः ॥

गरुड जीमूतवाहनाला नाग समजून, उचलून घेऊन मलयपर्वताच्या शिखरावर उडून गेला!

इकडे जीमूतवाहनाचा पिता जीमूतकेतु, माता वृद्धादेवी आणि पत्नी मलयवती अद्यापि जीमूतवाहन कां परत येत नाहीं म्हणून चिंतातुर होऊन बसलीं. जीमूतवाहन कदाचित् श्वशुरगृहीं गेला असेल असें समजून त्यांनीं तिकडे दूत पाठविले.

तिकडे गोकर्णेश्वराच्या दर्शनाला गेलेला शंखचूड परत येऊन पाहतो तों वध्यशिलेजवळ पुष्कळ रक्त सांडलेलें त्याच्या दृष्टीस पडलें. गरुडानें आपल्या तीक्ष्ण नखांनीं जीमूतवाहनाचें हृदय विदीर्ण केलें असलें पाहिजे असें त्याला निश्चितपणें वाटलें आणि म्हणून तो शोक करूं लागला.

" बंधो, परोपकारार्थ स्वदेहास तूं तृणतुल्य मानलेंस. तूं कोठें आहेस? जन्माला येऊन कोणावरही उपकार न करणाऱ्या शंखचूडा, तुझा धिक्कार असो!" असा आक्रोश करीत रक्ताची धार जिकडे सांडत गेली होती त्या दिशेला तो चालला. जातां जातां तो जीमूतकेतूच्या आश्रमापाशीं आला. तेव्हां जीमूतकेतूनें शंखचूडाला दुःखीकष्टी असण्याचें कारण विचारिलें.

शंखचूड आपलें सर्व वृत्त कथन करून म्हणाला, " कोणी दयाळू विद्याधरानें आपला देह गरुडास अर्पून माझा जीव वांचविला. तो विद्याधर म्हणजे जीमूतवाहनच होय." हे शब्द शंखचूडानें उच्चारतांक्षणींच मलयवतीसह सर्व मंडळी शोकाकुल झाली. त्यावर शंखचूड म्हणाला, " ह्याचा अर्थ गरुडानें जीमूतवाहनास मारलें असेलच असें नाहीं. हा नाग नव्हे असें समजून येतांच कदाचित् गरुड त्याला सोडूनही देईल.

" देव करो नि तुझा तर्क खरा ठरो." जीमूतवाहनाची आई उद्गारली.

शंखचूड म्हणाला, " मी रक्तधारेचा शोध काढीत चाललों आहें."

शंखचूडासमवेत जीमूतकेतु, त्याची पत्नी व स्नुषा हींही निघालीं.

इकडे गरुडानें जीमूतवाहनाला चोंचींत धरून मलयाद्रीच्या एका शिखरावर आणलें आणि त्याचें वक्षःस्थल फोडून तो रक्तमांस भक्षूं लागला.



जीमूतवाहन हूं कीं चूं न करितां प्रसन्न मुद्रेनें स्वस्थ
पडलेला पाहून गरुड त्याजकडे निरखून पाहूं लागला.

पण जीमूतवाहन हूं कीं चूं न करितां प्रसन्न मुद्रेनें स्वस्थ पडलेला पाहून गरुडास विस्मय वाटला. तो त्याजकडे निरखून पाहूं लागला. तेव्हां जीमूतवाहन म्हणाला, "हे पक्षिराज, अद्याप माझ्या देहांत बरेंच रक्तमांस आहे तें संपवून तूं आपली क्षुधा तृप्त कर. तुझी क्षुधा तर अद्याप शांत झालेली मला दिसत नाहीं. मग तूं एकाएकीं थांबलास कां?" हें ऐकून गरुड म्हणाला, "हे महासाधो, मीं आपल्या चंचूनें तुझ्या हृदयांतील केवळ रक्तमात्र ओढून घेतलें. पण तूं मात्र आपल्या लोकोत्तर धैर्यानें माझें सबंध हृदयच ओढून घेतलें आहेस! तूं कोण आहेस?"

इतक्यांत शंखचूड तेथें आला आणि गरुडास म्हणाला, "हे पक्षिश्रेष्ठा, हें तूं काय आरंभिलें आहेस? अरे, हा नाग नव्हे! नागाचीं लक्षणें तुला माहीत नाहींत काय? तुझ्या आहारासाठीं वासुकीनें मला येथें पाठविलें आहे. मला खाऊन टाक. ह्याला सोडून दे. हा विद्याधर कुलाला ललामभूत झालेला जीमूतवाहन होय."

त्रिभुवनकीर्ति, धीर व उदार अशा जीमूतवाहनाचें नांव ऐकतांच गरुड उद्गारला, "हर! हर! मी केवढा पातकी! ह्या महापातकाची निष्कृति अग्निकाष्ठें भक्षिल्याशिवाय होणार नाहीं."

ह्याप्रमाणें गरुड विचार करीत आहे तोंच जीमूतकेतु, वृद्धादेवी व मलयवती तेथें येऊन पोचलीं.

जीमूतवाहनाची मरणोन्मुख अवस्था पाहून सर्वजण शोकाकुल झालीं. तथापि जीमूतवाहनाला देहभानावर पाहून त्यांना दु:खांतही सुख झालें.

वृद्धादेवी आपल्या बाळाच्या अंगावरून हात फिरवीत फिरवीत गरुडास म्हणाली, "आग लागो तुझ्या पोटाला! काय माझ्या बाळाची दुर्दशा केलीस!" जीमूतकेतु पुत्रास म्हणाला, "मुला, काय हें तुझें साहस! जे परोपकारी असतात त्यांच्या ठिकाणीं आपपर भाव नसतो हें खरें. पण पुष्कळांचें अहित करून एकाचें हित साधत असेल तर तें करूं नये हें तारतम्य तूं कसें विसरलास? आपला प्राण देऊन तूं एका नागाला वांचविलें असशील, पण आम्हा त्रिवर्गांचा नाश होऊन आपलें विद्याधर कुल निर्वंश झालें असतें ह्याची काय वाट?"

गरुड जीमूतवाहनापुढें हात जोडून म्हणाला, "हे पुण्यपुरुषा, मी पातकापासून कसा मुक्त होईन तेवढें कृपा करून मला सांग."

जीमूतवाहनानें उत्तर दिलें, "तुला जर खरोखर अनुताप झाला असेल तर कोणत्याही प्राण्याची हिंसा करावयाची नाहीं असा निश्चय कर आणि तो सर्व प्राण्यांस कळीव. नित्य भूतदया आचरणांत ठेव. असा वागशील तर पाण्यांत जसें मीठ विरघळून जातें, तसें तुझें आजवरचें सर्व पातक नष्ट होऊन जाईल."

गरुड म्हणाला, "मी शपथ वाहून सांगतों कीं मी आजपासून प्राणिहिंसा करणार नाहीं."

जीमूतवाहनाला आतांपर्यंत आपल्या ह्या प्राणान्तिक वेदनांचें मुळींच भान नव्हतें. पण आपलें जीवितकार्य संपलें असें मनांत आल्याबरोबर त्याच्या देहाला असह्य वेदना होऊं लागल्या. त्यानें एकाएकीं डोळे पांढरे केले. त्याच्या चर्येवर मरणचिन्हें दिसूं लागलीं.

सर्वजण शोकाकुल झालीं.

जीमूतकेतु स्फुंदत स्फुंदत उद्गारला, "मुला, तूं माझ्याशीं कां बरें बोलत नाहींस? अरेरे! आतां धैर्य निराधार झालें! विनयानें आतां कोणाला शरण जावें? क्षमा धारण करणारा आतां कोण उरला आहे? दानशीलता आतां नष्ट झाली. सत्याचा खरोखर वध झाला. दीन झालेल्या दयेनें आतां कोणाकडे जावें? § मुला, तूं आतां परलोकास गेल्यामुळें मला सर्व जगत् शून्य झालें आहे!"

वृद्धादेवी लोकपालांची प्रार्थना करून, "माझ्या बाळाला अमृत सिंचून जिवंत करा," असें त्यांना विनवूं लागली.

अमृताचें नांव निघालेलें ऐकून गरुड स्मरण झाल्यासारखें करून म्हणाला, "मी इंद्राची प्रार्थना करून अमृतवृष्टि करवितों आणि तिच्या योगानें जीमूतवाहनासच काय पण सर्व नागांना जिवंत करतों." अशी प्रतिज्ञा करून गरुड तेथून निघून गेला.

जीमूतवाहनाच्या जीविताची आशा आपणांस उरली नाहीं असें पाहून जीमूतकेतूनें शंखचूडास चिता तयार करावयास सांगितलें आणि जीमूतवाहनासमवेत सर्वांनीं आपले देह अग्नीला अर्पण करण्याचा निश्चय केला. शंखचूडानें काष्ठें गोळा करून चिता रचली, तेव्हां मलयवती सूर्यास हात जोडून म्हणाली,

"हे सहस्रकरा, तूं सर्वसाक्षी आहेस. गौरीनें मला दिलेला वर आज मिथ्या झाला." असें बोलून ती अग्निप्रवेश करणार तों साक्षात् गौरी अकस्मात् प्रकट झाली आणि मलयवतीस म्हणाली,

---

§ निराधारं धैर्यं कमिव शरणं यातु विनयः
क्षमः क्षान्तिं वोढुं क इह विरता दानपरता।
हतं सत्यं सत्यं व्रजतु करुणा क्वाद्य कृपणा
जगज्जातं शून्यं त्वयि तनय लोकान्तरगते।

" मुली, धीर धर. माझें वचन कदापि मिथ्या होणार नाहीं. " असें म्हणून गौरीनें आपल्या कमंडलूंतील उदक जीमूतवाहनाच्या विकल देहावर शिंपडलें. झोपेंतून जागा व्हावा त्याप्रमाणें जीमूतवाहन उठून बसला आणि हात जोडून गौरीचें स्तवन करूं लागला. इतक्यांत आकाशांतून मेघ नसतांनाही अकस्मात् वृष्टि होऊं लागली. गरुडानें इंद्राकरवीं केलेली ती अमृतवृष्टिच होती. लगेच अस्थिशेष राहिलेले सहस्रावधि नाग जिवंत झाले आणि त्यांच्या मस्तकावरील मण्यांचा समंतात् प्रकाश पडूं लागला. पाताळांत आपापल्या घरीं जाण्यासाठीं ते नाग वक्रगतीनें समुद्रांत पटापट उड्या टाकूं लागले. तें दृश्य पाहून पर्वतापासून निघालेल्या नद्या सहस्र मुखांनीं सागरास जाऊन मिळत आहेत असा त्या वेळीं भास झाला.

त्यानंतर गौरीनें पवित्र जलानें भरलेला एक सुवर्णकलश निर्माण केला; जीमूतवाहनाला विद्याधरांच्या चक्रवर्तिपदावर अधिष्ठित केलें आणि स्वहस्तानें त्याला अभिषेक केला. तसेंच त्याला तिनें चार दातांचा एक शुभ्र वर्णाचा गज, एक श्यामवर्णाचा अश्व व एक सुवर्णाचें चक्र दिलें आणि ह्या सर्व रत्नांहून अत्यंत तेजस्वी, जीमूतवाहनास अत्यंत प्रिय असें मलयवतीसारखें स्त्रीरत्न त्याला अर्पण केलें.

गौरीच्या प्रेरणेनें जीमूतवाहनाचा प्रतिस्पर्धी मतंग तेथें आला. त्यानें जीमूतवाहनाच्या चरणांवर आपलें मस्तक नम्र केलें. त्या वेळीं तेथें इंद्रधनुष्य पडल्याचा भास झाला. कारण मतंगाच्या मस्तकावरील चूडामणी लकाकत होते.

" वत्सा, मी तुझें आणखी काय प्रिय करूं ? " गौरीनें विचारलें.

जीमूतवाहन गुडघे टेकून आणि हात जोडून म्हणाला, " माझें काय प्रिय करावयाचें राहिलें आहे? शंखचूड गरुडाच्या दाढेंतून वांचला, गरुड सन्मार्गावर आला, त्यानें भक्षण केलेले नाग पुनरुज्जीवित झाले, माझे प्राण परत आले, म्हणून माझ्या मातापितरांचे प्राण वाचले. मला

विद्याधरांचें चक्रवर्तिपद प्राप्त झालें, पण ह्या सर्वांपेक्षां विशेष म्हणजे हे देवि, तुझें मला प्रत्यक्ष दर्शन झालें.

" आतां एवढीच इच्छा कीं मयूरांना हर्षानें नाचावयास लावणारे मेघ यथाकालीं येवोत, वर्षोत आणि पृथ्वीला हरित तृणधान्यांनीं समृद्ध करोत; लोक सत्कृत्यें करोत, त्यांच्या विपत्ति नष्ट होवोत, त्यांच्या मनांतील मत्सर विलयास जावो आणि आप्तसुहृदांच्या संगतींत ते सदैव आनंद पावोत.

" तसेंच, सर्व जगताचें कल्याण होवो; प्राणिमात्र परहित करण्यांत रममाण असो; सर्व लोक सुखी होवोत. "

## स्वा ध्या य

१. आपला देह परोपकारार्थ वेंचावा असा संकल्प जीमूतवाहनानें कां केला?

२. वृक्षांनाहि अतिथि-सत्कार कसा करावा हें शिकविलें असावें, असें कां म्हटलें आहे?

३. मलयवतीचें मन द्विधा झालें तें कोणत्या प्रसंगीं व कां?

४. त्यानें एक वस्तु केळीच्या पानाखालीं घाईघाईनें दडवून ठेविली. कोणीं? केव्हां? हेतु काय?

५. शंखचूड हा कोण होता? त्यानें आपल्या आईचें कसें सांत्वन केलें?

६. मलयकेतूस जितका हर्ष झाला तितकाच खेदही झाला. कां?

७. चतुरिकेच्या स्वभावविशेषाचें चित्र रेखाटा.

८. ' ओढाताणींत त्याचें यज्ञोपवीत तुटलें —' त्या प्रसंगाचें वर्णन करा.

९. इतर कथांमध्यें यज्ञोपवीताचा संबंध कोठें कोठें आला आहे?

१०. गरुडाला काय पश्चात्ताप झाला? त्यानें कोणता निश्चय केला?

११. ही गोष्ट वाचून तुमच्या मनावर काय परिणाम झाला?

श्री हर्षकृत

# रत्नावली

पात्रें

| | |
|---|---|
| उदयन | वत्स देशाचा राजा |
| यौगंधरायण | उदयनाचा पंतप्रधान |
| रुमण्वान् | उदयनाचा युद्धमंत्री व सेनाधिपति |
| विजयवर्मन | रुमण्वानाचा भाचा |
| वसंतक | विदूषक; उदयनाचा मित्र |
| विक्रमबाहु | सिंहलद्वीपाचा राजा |
| वसुभूति | विक्रमबाहूचा पंतप्रधान |
| वासवदत्ता | उदयनाची राणी |
| रत्नावली | विक्रमबाहूची कन्या |
| सागरिका | रत्नावलीचें दुसरें नांव |
| सुसंगता | दासी |
| कांचनमाला | दासी |
| निपुणिका | दासी |



सुसंगतेनें ... सागरिकेची ... रत्नमाला विदूषकास देऊं केली.

अनुक्रम 7556
विभाग बा. वा.
क्रमांक 28324
नों. दि. 1-7-51

श्री हर्ष कृत

# रत्नावली

★ वादळांत हरवलेल्या रत्नावली नांवाच्या राजकन्येची ओळख तिच्या गळ्यांतील रत्नमालेवरून पटली. म्हणून श्रीहर्षानें ह्या नाटिकेस रत्नावली असें नांव दिलें.

महासागरांतून एक नौका चालली होती. प्रचंड वादळ झालें. नौका फुटली. तिच्यांत बसलेली राजकन्या बुडूं लागली. पण सुदैवानें तिला एका फळीचा आधार मिळाला. त्या आधारावर ती सुखरूप तीरास जाऊन पोचली. तिच्याबरोबर एक मंत्री होता तोही



सुदैवानें तिला एका फळीचा आधार मिळाला.

वांचला. पण तीरास लागतांच राजकन्येची व त्या मंत्र्याची चुकामूक झाली. तेव्हां त्याच नौकेंतून वांचलेल्या एका व्यापाऱ्यानें त्या राजकन्येच्या रूपावरून ही कोणा थोरामोठ्याची कन्या असावी असें अनुमान करून तिला वत्स देशाच्या यौगंधरायण प्रधानाकडे पोचतें केलें.

वत्स देशाचा उदयन नामक राजा होता. त्याचा प्रधान यौगंधरायण मोठा चतुर व स्वामिभक्त होता. त्याच्याकडे अकस्मात् आणून दिलेली मुलगी सागरांत बुडतां बुडतां वांचली म्हणून त्यानें तिचें नांव 'सागरिका' असें ठेवलें आणि तिला उदयनाची राणी वासवदत्ता हिच्या स्वाधीन केलें. वासवदत्तेनेंही सागरिकेला आपल्या परिवारांत ठेवून घेतलें.

वसंत ऋतूला आरंभ झाला. वृक्षलता नवचैतन्यानें हसूं लागल्या. दक्षिणवायु वाहूं लागला. कामदेवाचा महोत्सव सुरू झाला. वासंतिक वेष परिधान करून व नटून सजून नरनारी आनंदानें इतस्ततः संचार करूं लागल्या. वीणा-मृदंगादिकांचा आणि पैजणांचा मधुर ध्वनि कानांना सुखवूं लागला. पिचकाऱ्या भरून घेऊन पौरजन एकमेकांवर रंग उडवूं लागले. पर्जन्यकालाच्या प्रारंभीं अल्प जलवृष्टीनें राजपथ भिजून जावे तसे ह्या वेळीं सुगंधी जलानें राजपथ भिजून गेले.

राणी वासवदत्ता वसंतोत्सव साजरा करण्यासाठीं मकरंदोद्यानांत गेली. तिच्या परिवारांत सागरिका होती. तिला तेथें आलेली पाहून वासवदत्ता मत्सरानें स्वतःशींच म्हणाली, 'काय बाई ह्या दासी तरी ! हिला कशाला येथें आणली ! महाराज इकडे येणार आहेत त्यांच्या दृष्टीला ही पडूं नये असा माझा प्रयत्न. तेव्हां हिला कांहींतरी निमित्तानें येथून घालविलें पाहिजे.' असा विचार करून ती सागरिकेला म्हणाली, "अग, सगळ्या बायका आज मदनोत्सव पाहायला गेलेल्या आहेत; म्हणून मीं तुला मैनेला सांभाळायला सांगितलें होतें. तर तिला एकटीला टाकून तूं येथें कशी आलीस? जा माघारी नि सांभाळीत बस तिला."

सागरिका घरीं परत जावयास निघाली. पण कांहीं पावलें गेल्यावर तिला स्मरण झालें कीं आपण मैनेचा पिंजरा सुसंगतेच्या स्वाधीन केला आहे. म्हणून ती राजवाड्यांत न जातां तेथेंच वृक्षाच्या आड उभी राहिली. तिच्या मनांत आलें कीं सिंहलद्वीपामध्यें आपल्या वडिलांच्या प्रासादांत जसा वसंतोत्सव साजरा करतात तसाच येथें करतात कीं काय हें पाहावें.

वासवदत्ता अशोकवृक्षाखालीं उभी होती आणि उदयनाची स्वारी तेथें येतांच तिनें "महाराजांचा जयजयकार असो. ह्या आसनावर महाराजांनीं बसावें." असें म्हणून त्यांचा सत्कार केला.

राजा आसनावर बसला. वासवदत्तेनें त्याची योग्य साहित्यानें पूजा केली. नंतर संध्याकाळ झालेली पाहून सर्वजण राजवाड्यांत परत गेलीं.

सागरिका हा सर्व प्रकार आडून पाहत होती. हा प्रत्यक्ष मदनच शरीर धारण करून पूजा स्वीकारीत आहे असें प्रथम तिला वाटलें. पण मागाहून तो उदयन आहे असें कळल्यावर तिला फार हर्ष झाला. इतक्या हालअपेष्टा व अपमान सोसल्याचें तिला आज समाधान वाटलें. ती घरीं जातांना मनांत म्हणाली, "माझ्या वडिलांनीं मला ज्यांना देण्याचें ठरविलें होतें तें हेच का उदयनमहाराज? मला बाई ह्यांच्याकडे डोळे भरून पुरतें पाहावयासही मिळालें नाहीं! मला लवकर घरीं गेलें पाहिजे."

सागरिका राजवाड्यांत परत गेली, पण ती केवळ देहानेंच; कारण तिचें मन मागेंच कोठें तरी घुटमळत राहिलें होतें. आपल्या कामाकडे तिचें लक्ष लागेना. मकरंदोद्यानांत पाहिलेली राजाची मूर्ति तिच्या मनांत घोळूं लागली. तिला अन्न गोड लागेना. मैत्रिणींशीं बोलणेंही आवडेना.

सागरिका पहाटे उठली. मैनेला तिनें पुनश्च सुसंगतेच्या स्वाधीन केलें. हातांत फलक, वर्तिका, कुंचली, रंगाचा करंडा, इत्यादि साहित्य घेऊन कोणास न कळत ती कदलीवनांत गेली. एकान्तांत जाऊन शिलातलावर बसली व मनांत म्हणाली,



‘ मला कसें तरी करून त्याचें चित्र काढलें पाहिजे. ’

‘ इथें कोणी आलें नाहीं तोंपर्यंत माझ्या आवडत्या माणसाचें चित्र काढून त्याकडे मी पोटभर पाहून घेतें. प्रियकराचें दर्शन होण्यास दुसरा उपाय नाहीं. मला कसें तरी करून त्याचें चित्र काढलें पाहिजे. ’

चित्रकलेंत कुशल अशा सागरिकेनें थोड्याच वेळांत तें चित्र पुरें केलें.

तिकडे सुसंगतेनें सागरिका आतां येईल, मग येईल, म्हणून खूप वाट पाहिली. शेवटीं, सुसंगता हातांत मैनेचा पिंजरा घेऊन सागरिकेच्या शोधार्थ निघाली आणि निपुणिका दासीच्या सांगण्यावरून कदलीवनांत आली. कारण, सागरिकेला तिकडे जातांना निपुणिकेनें पाहिलें होतें.

सुसंगता सागरिकेच्या समीप आली, तरी सागरिकेच्या तें मुळींच लक्षांत आलें नाहीं, इतकी ती आपण काढलेल्या चित्राकडे एकाग्रतेनें पाहत बसली होती. तेव्हां सुसंगता चित्राकडे पाहून हर्षानें म्हणाली,

"वाहवा ! वाहवा ! सागरिके, तुझें करणें योग्यच आहे. राजहंसी कमलाचा ताटवा टाकून दुसऱ्या ठिकाणीं कशी रमेल?" †

**सागरिका :** (वर मान करून) कोण सुसंगता? ये, बैस इथें.

**सुसंगता :** सखे, कोण ग हा तूं येथें काढला आहेस?

**सागरिका :** ज्याचा उत्सव चालला आहे तो भगवान कामदेव!

**सुसंगता :** तूं हें चित्र काढलेंस खरें, पण हें डोकें ओकें दिसत आहे. म्हणून मला ह्याच्या शेजारीं रतीचें चित्र काढूं दे.

असें म्हणून सुसंगतेनें कलम घेऊन त्या चित्राजवळ सागरिकेचें चित्र झटदिशीं काढलें.

**सागरिका :** (चित्र पाहून, रागानें) इथें माझें चित्र ग कशाला?

**सुसंगता :** (हसून) उगीच कां मजवर रागावतेस? तूं जसा मदन काढलास, तशी मीं त्याच्या शेजारीं ही रति काढली. खरी गोष्ट माझ्यापासून कां चोरून ठेवतेस? मी का तुझी गोष्ट फोडीन?

आतां मात्र सागरिकेनें आपलें हृदय सुसंगतेपाशीं उघडें केलें आणि तिला तें गुपित राखण्याविषयीं बजावलें.

**सुसंगता :** मी तुझें गुपित कोणासही कळूं देणार नाहीं. पण मला बाई ह्या मूर्ख मैनेचें भय वाटतें. ती आहे एकपाठी. कदाचित् आपलें भाषण ऐकून ती कोणापुढें बोलेल. ह्याखेरीज दुसऱ्या कोणाचेंही भय नाहीं.

इतक्यांत एक वानर सांखळी तोडून सैरावैरा पळत सुटलेला सागरिका व सुसंगता ह्यांना दिसला. त्या घाबरल्या आणि तो वानर आपणांकडे धावत येत आहे असें पाहून जवळच्या तमालवृक्षाच्या अंधकारांत जाऊन लपल्या. मैनेचा पिंजरा व चित्राचा फलक मात्र त्या गडबडींत होता तेथेंच

† न कमलाकरं वर्जयित्वा राजहंसी अन्यस्मिन्नभिरमते।

राहिला. अमळशानें त्यांना असें दिसलें कीं वानरानें त्या पिंजऱ्याचें दार उघडल्यामुळें त्यांतील मैना उडून जात आहे आणि तो वानर पिंजऱ्यांतील दहीं-भातांवर यथेच्छ ताव मारीत आहे.

सागरिका व सुसंगता ह्यांना मैनेची चिंता वाटूं लागली. म्हणून त्या तिचा शोध करण्यास निघाल्या.

ह्या वेळीं उदयन व त्याचा मित्र वसंतक त्याच उद्यानांत आले होते.

"ही पाहा नवमल्लिका लता कशी फुलांनीं बहरली आहे! देवी वासवदत्तेची माधवी लता जणूं हसत आहे!" ह्याप्रमाणें वसंतक वर्णन करीत आहे आणि राजा कौतुकानें तें ऐकत आहे, तों त्यांच्या कानांवर मैनेचे शब्द पडले. ते शब्द म्हणजे सागरिका व सुसंगता ह्यांच्यामध्यें नुकतेंच झालेलें संभाषण होतें! तें ऐकून विदूषकाला वाटलें कीं तेथें झाडावर कोणी भूत बसलें आहे. पण राजानें मैनेचा शब्द ओळखला आणि दोघेजण कान देऊन मैनेचे बोल ऐकूं लागले.

"सखे, येथें तूं कोण काढला आहेस?"

"ज्याचा उत्सव सुरू झाला आहे तो कामदेव."

"सखि, तूं माझें चित्र कां काढलेंस?"

"सखि, रागावूं नकोस; तूं कामदेव काढलास, मीं रति काढली."

**राजा :** मित्रा, ही मैना किती मधुर बोलते आहे?

**विदूषक :** अरे, हा कामदेव तुझ्याशिवाय दुसरा कोण असणार?

असें बोलून विदूषक मोठ्यानें खो-खो हसला. त्यासरशीं ती मैना दुसरीकडे उडून गेली.

**राजा :** हा मूर्खा, तूं हें काय केलेंस? ही उडून कदलीवनाकडे जात आहे. चल आपण जाऊन तिला धरूं.

**विदूषक :** जाऊं दे रे ! ह्या केळीच्या कुंजांत बसून आपण विश्रांति घेऊं. मंद मंद वायूनें हलणाऱ्या कोमल केळीच्या पानांची सावली इथें पडली आहे. चल तिकडे.

राजा व विदूषक दोघेही केळीच्या कुंजांतील शिलातलावर जाऊन बसले. त्या जागेवर एक पिंजरा पडलेला होता आणि त्याचें दार उघडें होतें. तें पाहून विदूषक म्हणतो,

"मित्रा, ह्या पिंजऱ्याचें दार उघडें आहे. ह्यावरून त्याच मैनेचा हा पिंजरा असावा असें वाटतें." असें म्हणून तो पिंजऱ्याजवळ गेला. तेव्हां तेथें त्याला एक चित्रफलक दिसला. तो घेऊन विदूषक हर्षानें म्हणाला,

"मित्रा, मीं तुला म्हटलें होतें तें खरें झालें. हें पाहा तुझें चित्र !"

राजानें तो चित्रफलक हातांत घेतला. त्यावरील चित्रें कौतुकानें पाहून तो उद्गारला, "काय हें लावण्य ! ही लावण्यलतिका प्रत्यक्ष लक्ष्मीला सौंदर्यांत मागें सारणारी आहे !"

इकडे सागरिका व सुसंगता मैनेचा शोध करून करून थकल्या पण त्यांना सारिका कांहीं सापडली नाहीं. निदान चित्रफलक तरी कोणाच्या हातीं लागूं नये म्हणून त्या केळीच्या बनाकडे येऊं लागल्या. त्या जवळ आल्या तेव्हां त्यांना विदूषक व उदयन ह्यांचें बोलणें ऐकूं येऊं लागलें. म्हणून त्या झाडाच्या आड थबकल्या.

'चित्रांतील स्त्री तुला आवडली का ?' असें विदूषक राजाला विचारीत होता आणि राजा पुनः पुनः त्या स्त्रीचें वर्णन करीत होता.

आपणास प्रकट होण्यास ही संधि उत्तम आहे असें पाहून सुसंगता पुढें झाली आणि तिनें राजाचा जयजयकार केला. तेव्हां राजा विस्मित होऊन सुसंगतेस म्हणाला,

“ मी इथें आहें हें तुला कसें कळलें ? ” सुसंगतेनें उत्तर दिलें, “ महाराज इथें आहेत, इतकेंच मला कळलें असें नाहीं, पण ह्या चित्रफलकाचा सर्व वृत्तान्तही मला कळला आहे आणि तो मी देवीला जाऊन निवेदन करणार आहें. ”

आतां राजाला वाटलें कीं ह्या दासीची मूठ दाबून तिचें तोंड बंद केलें पाहिजे. नाहीं तर ही भलतीच कलागत लावील. म्हणून तो तिला आपलें कर्णभूषण देऊन म्हणाला, “ सुसंगते, अग, हें उगीच विनोदाचें बोलणें. ह्यांत कांहींच खरें नाहीं. भलतेंच सांगून देवीस दुखवूं नकोस. ”

तेव्हां सुसंगता विनयानें म्हणाली, “ महाराज, आपण मजवर प्रसन्न झालां इतकेंच पुरे ; मला हें कर्णभूषण नको. महाराजांनीं मनांत कांहीं शंका आणूं नये. ‘ ह्या चित्रफलाकावर तूं माझें चित्र कां काढलेंस ? ’ असें म्हणून माझी प्रियसखी सागरिका माझ्यावर रागावून इथें उभी आहे. तिचें आपण समाधान करावें. एवढी देणगी आपण मला दिली म्हणजे पुरे. ”

सागरिका उदयनाच्या सन्मुख येऊन उभी राहिली. राजाकडे पाहून तिला हर्ष झाला होता तरी ती भीतीनें कांपतही होती.

तिला बघून विदूषक म्हणतो, “ असलें युवतीरत्न मनुष्यलोकीं दृष्टीस पडावयाचें नाहीं. हिला निर्माण केल्यावर हिच्याकडे पाहून ब्रह्मदेवासही विस्मय वाटला असेल. ”

राजा म्हणाला, “ अरे, ब्रह्मदेवास विस्मयच वाटला असेल असें नव्हे, पण त्यानें आपलीं चारी मस्तकें डोलविलीं असतील आणि चारी मुखांनीं ‘ वाहवा वाहवा ’ असे उद्गारही काढले असतील. ”

विदूषक म्हणाला, “ पण ही फार रागीट दिसते. मला वाटतें ही दुसरी वासवदत्ताच आहे. ”

वासवदत्तेचें नांव ऐकतांच राजा बिचकला आणि सागरिका व सुसंगता तेथून जाऊं लागल्या.

त्या दृष्टीआड झाल्यावर राजा इकडे तिकडे बघून विदूषकास विचारतो, "हा मूर्खा, वासवदत्ता म्हणालास ती कुठें आहे वासवदत्ता ?"

विदूषकानें उत्तर दिलें, "मित्रा, तसें नव्हे. रागीट मुखचर्येवरून ही दुसरी खरोखरीच वासवदत्ता दिसते आहे असें मीं म्हटलें."

पण बोलाफुलास गांठ पडली म्हणा कीं कांहीं म्हणा, विदूषकाचे शब्द योगायोगानें खरे ठरले. राजाची आवडती नवमल्लिका लता कशी काय बहरली आहे हें समक्ष पाहण्यासाठीं वासवदत्ता आपल्या कांचनमाला दासीसह तेथें येऊन राजासमोर दत्त म्हणून उभी राहिली. ती म्हणाली, "आर्यपुत्र, आपल्या नवमालिकेला फुलें आलीं का ?"

राजा म्हणाला, "तुला यायला उशीर झाला म्हणून आम्हीं तीं अद्याप पाहिलीं नाहींत."

ह्या चतुर उत्तरानें विदूषकास इतका हर्ष झाला कीं त्यानें टुणदिशीं उडी मारली. त्यासरशीं त्याच्या काखेंतला चित्रफलक खालीं पडला.

कांचनमालेनें लगेच तो चित्रफलक उचलून राणीस दाखविला. तेव्हां ती म्हणाली, "महाराज, ह्या फलकावर हें काय आहे ?"

काय उत्तर द्यावें हें राजास सुचेना. तेव्हां विदूषक म्हणाला,

"आपलें चित्र आपणच काढणें सोपें नाहीं असें मी सहज बोललों तेव्हां माझें बोलणें खोटें पाडण्याकरितां म्हणून माझ्या मित्रानें हें चित्रकौशल्य दाखविलें."

**वासवदत्ता :** ही दुसरी जवळ काढली आहे ही कोण ? का हें वसंतकाचें कौशल्य आहे ?

**विदूषक :** जानव्याची शपथ ! असली स्त्री आम्हीं पूर्वीं पाहिली नाहीं.

**राजा :** मीं हें मनानेंच कल्पनाचित्र रेखाटलें आहे.

**कांचनमाला :** बाईसाहेब, कधीं कधीं चित्रांत सारखेपणा दिसतो.

**वासवदत्ता :** हें चित्र पाहून माझें कपाळ दुखूं लागलें आहे. माझ्यानें इथें बसवत नाहीं. ही मी चालल्यें.

असें बोलून ती फणकाऱ्यानें निघून गेली.

कांहीं वेळानें राजा व विदूषक राजवाड्यांत परत आले. तेव्हांपासून राजाला स्वस्थता वाटेना. वासवदत्ता क्रुद्ध झाली होती म्हणून त्याला सागरिकेविषयीं चिंता वाटूं लागली होती. हें विदूषकाच्या ध्यानांत आलें तेव्हां तो सुसंगतेकडे आला आणि त्या दोघांनीं मिळून एक व्यूह रचला. तो असा :

सुसंगतेनें कांचनमालेचा आणि सागरिकेनें वासवदत्तेचा वेष धारण करावा आणि सायंकाळीं माधवीलतामंडपांत राजाच्या भेटीस जावें.

हा संकेत ठरला खरा, पण कर्मधर्मसंयोगानें वासवदत्तेच्या एका दासीनें तो आडून ऐकला आणि वासवदत्तेला जाऊन सांगितला.

सायंकाळीं उदयन राजा माधवीलतामंडपांत जाऊन सागरिकेची मार्गप्रतीक्षा करीत बसला. पण तिकडे काय चाललें आहे हें पाहण्यासाठीं वासवदत्ता व कांचनमाला ह्याच तेथें आल्या. सुसंगता व सागरिका ह्यांनीं हुबेहूब वेष परिधान केल्याबद्दल विदूषकानें हर्षभरित होऊन त्यांचें अभिनंदन केलें. राजानेंही त्यांचें प्रेमानें स्वागत केलें आणि सागरिकेस उद्देशून तो म्हणाला, "सागरिके, तुझा मुखचंद्र इथें प्रकाशत असतांना आकाशांतील चंद्र आपलें तोंड कशाला दाखवीत आहे? तो आपलें तोंड काळें कां करीत नाहीं? तुझें चंद्राशीं सर्व बाबतींत साम्य आहे."

तें ऐकून वासवदत्तेनें आपलें अवगुंठन काढलें आणि ती राजाला टोचून म्हणाली, "प्राणनाथ, मी खरोखरीच सागरिका आहें! तुमच्या मनांत सागरिका आहे म्हणून तुम्हांला जिकडे तिकडे सागरिकाच दिसत आहे."

वासवदत्तेकडे निरखून पाहून राजा खजिल झाला. काय बोलावें हें त्याला समजेना. तेव्हां विदूषक म्हणतो, "बाईसाहेब, आपण थोर

आहां. माझ्या मित्राच्या अपराधाची आपण एक वेळ क्षमा करावी."

खऱ्या आर्य स्त्रीप्रमाणें वासवदत्ता म्हणाली, "मीच ह्यांची अपराधी आहें; मीं ह्यांच्या सुखाला विघ्न आणलें."

आतां राजाला बोलण्यास तोंड उरलें नाहीं. म्हणून तो राणीच्या पायां पडूं लागला. तेव्हां पतीचा झालेला हा पाणउतारा पाहणें नको असें वाटून वासवदत्ता तेथून मुकाट्यानें निघून गेली. तथापि तिला साष्टांग नमस्कार घालून राजा तिची क्षमायाचना करीतच होता.

वासवदत्ता दूर गेलेली पाहून विदूषक म्हणतो, "मित्रा, ऊठ. वासवदत्ता मुकाट्यानें गेली, आतां व्यर्थ अरण्यरुदन कशासाठीं करतोस?"

राजा उठून उभा राहिला व म्हणाला, "मित्रा, चल घरीं; देवीला प्रसन्न केलें पाहिजे." थोड्या वेळानें ते दोघेजण तेथून निघाले. तों त्यांस कोणी आल्याची चाहूल ऐकूं आली. प्रथम त्यांना वाटलें कीं उदार मनाच्या राणीला पश्चात्ताप होऊन तीच माघारीं आली असावी. पण त्यांच्या कानांवर पुढील शब्द आले,

"देवीला सर्व गुपित कळलें. तिनें सुसंगतेला शिक्षा केली. आतां आपण वेलीचा गळफास लावून जीव द्यावा."

ह्या आवाजाचा माग काढीत राजा घाबऱ्या घाबऱ्या चालूं लागला. सागरिकेच्या जवळ येऊन त्यानें तिच्या गळ्यांतला फास काढला आणि ममतेनें म्हटलें, "अग वेडे, हें काय भलतेंच करतेस?"

सागरिका मरणाला सिद्ध झाली होती; पण राजाचें दर्शन होतांच तिला अतिशय हर्ष होऊन तिची मुद्रा खुलली.

इकडे महाराजांचा अव्हेर केल्याबद्दल हुरहूर वाटून वासवदत्ता त्याचें समाधान करण्यासाठीं कांचनमालेसह माधवीलतामंडपाकडे येत होती. ती जवळ जवळ आली तेव्हां तिला पुढील संवाद ऐकूं आला,

**विदूषक :** आतां निर्भय होऊन माझ्या मित्राशीं दोन शब्द बोल.

**सागरिका :** 'देवीशीं कपट करून आपण तिला कां दुखवितां?

**राजा :** अग, माझें खरें प्रेम तुझ्यावरच आहे.

इतका वेळपावेतों वासवदत्ता हा संवाद आडून ऐकत होती. आतां ती पुढें होऊन रोषानें म्हणाली, " महाराज, आपण योग्य भाषण केलेंत. आपणाला अगदीं शोभतें हां हें ! "

राणीला पाहून राजाचा चेहेरा निस्तेज झाला. तथापि स्वतःला सावरून धरण्यासाठीं तो म्हणाला, " देवी, मला निष्कारण दोष देणें तुला योग्य नाहीं. तुझ्यासारखाच वेष पाहून तूंच आहेस असें समजून मी येथें आलों. क्षमा कर. "

विदूषक म्हणाला, " बाईसाहेब, मी खरें सांगतों. तुम्ही आपणास फास लावून प्राण देतां असें मला वाटलें. ह्यामुळें मीं प्रिय मित्रास येथें आणिलें. हें माझें बोलणें खोटें वाटेल, तर हा प्रत्यक्ष वेलीचा फास पाहा. "

राणीच्या रागाचा पारा आतां वर चढला. ती आपल्या दासीला म्हणाली, " कांचनमाले, ह्याच वेलानें ह्या ब्राह्मणाला बांध आणि त्याला नि ह्या द्वाड पोरीला पुढें घालून घेऊन चल. "

" आज्ञा बाईसाहेब " असें म्हणून कांचनमालेनें त्या वेलीनें विदूषकास बांधलें आणि ती म्हणाली, " मेल्या, भोग आतां आपल्या चोंबडेपणाचें फळ. सागरिके, तूंही पुढें हो. "

विदूषक केविलवाण्या मुद्रेनें राजाकडे पाहूं लागला आणि म्हणाला, " मित्रा, देवी तर मला बांधून घेऊन चालली. मी अनाथ झालों; माझें स्मरण ठेव. "

हा प्रकार पाहून सागरिका स्वतःशींच म्हणते, ' मी केवढी हतभागी ! मी केवढी पातकी ! मला स्वेच्छेनें मरणेंसुद्धा शक्य झालें नाहीं. '

ह्याप्रमाणें वासवदत्तेच्या पाठोपाठ सर्वजण निघून गेलीं. माधवीलता-मंडपांत राजा एकटाच राहिला. तेव्हां तो खेदानें एवढेंच उद्गारला, " काय हें संकट ! माझ्या मित्रालाही बांधून नेलें. मीही असहाय झालों. "

वासवदत्तेनें राजवाड्यांत जाऊन सागरिका व विदूषक ह्यांना कारागृहांत ठेवलें. पण तिला काय वाटलें कोणास ठाऊक! तिनें विदूषकास लवकरच बंधमुक्त केलें. सागरिकेस मात्र तिनें डांबून ठेविलें. सागरिकेच्या भेटीस सुसंगता मधून मधून जात असे.

कारावासांत असतांना सागरिकेला वाटे कीं आपला मृत्यु समीप आला आहे. म्हणून तिनें आपल्या कंठांतली रत्नमाला सुसंगतेला देऊन तिला सांगितलें कीं " ही माला योग्य ब्राह्मणाला दे. " त्यानंतर सुसंगतेनें जेव्हां विदूषकास बंधमुक्त झालेलें पाहिलें, तेव्हां तिनें सागरिकेची ती रत्नमाला विदूषकास देऊं केली. प्रथम ती घेण्यासाठीं विदूषकाला आपला हात पुढें करवेना. कारण बिचाऱ्या सागरिकेला राणीनें उज्जयिनीस पाठविल्याची भूमका त्यानें सुसंगतेकडून ऐकली होती; म्हणून त्याला खेद वाटत होता.

पण जरा वेळानें विदूषकानें ती माला घेतली आणि तो राजाकडे आला. त्यानें हें सर्व वर्तमान राजास निवेदन केलें. विदूषक भेटल्यानें राजास जितका आनंद झाला, तितकाच सागरिकेचा वृत्तान्त ऐकून त्यास विषाद वाटला. राजा म्हणाला, " राणी माझी कांहींच पर्वा ठेवीत नाहीं. "

ह्यानंतर विदूषकानें राजाला सागरिकेची रत्नमाला दिली, तेव्हां राजाला दु:खांत थोडेंसें तरी सुख वाटून त्यानें ती रत्नमाला आपल्या हृदयाशीं धरली आणि विदूषकास गळ्यांत घालण्यास दिली. हेतु हा कीं तिजकडे पाहून तरी मनास विरंगुळा वाटावा.

विदूषकानें ' बरें आहे ' असें म्हणून ती माला आपल्या कंठांत धारण केली. तेव्हां राजा त्यास म्हणतो, " मित्रा, ह्याउप्पर प्रियेचें दर्शन दुर्लभ झालें ना ? "

विदूषक कानांवर हात ठेवून भयभीत होऊन म्हणतो, " मित्रा, इथें इतक्या मोठ्यानें बोलूं नकोस. भिंतीला कान असतात. न जाणों, देवीच्या दासींपैकीं इकडे आसपास कोणी फिरत असतील. "

ह्या वेळीं एक आनंदाचें वर्तमान आलें. त्यामुळें खिन्न झालेल्या राजाला उत्साह वाटूं लागला. वसुंधरा नांवाची एक दासी राजाचा जयजयकार करून, राजासमीप येऊन म्हणाली, "महाराज, रुमण्वान प्रधानाचे भाचे विजयवर्मा आपणांस एक प्रिय वृत्त सांगण्यास आले आहेत."

राजा म्हणाला, "येऊं दे त्यांना आंत."

विजयवर्मा विनयानें महाराजांपुढें येऊन उभा राहिला आणि युद्धमंत्र्यानें कोसलदेश कसा काबीज केला, ह्याचें इत्थंभूत वर्णन त्यानें केलें. त्याबद्दल राजानें त्यास धन्यवाद देऊन यौगंधरायण पंतप्रधानाकडून त्यास उत्तम पारितोषिकही देवविलें.

विजयवर्मा निघून गेल्यावर राणीच्या सांगण्यावरून राजाकडे एक गारुडी आला. तो म्हणाला, "मी गुरूच्या कृपाप्रसादानें आपणांस वाटेल तें दाखवितों. आकाशांतला चंद्र भूतलावर आणतों आणि भूतलावरील पर्वत आकाशांत उडवितों. जलांत अग्नि पेटवितों आणि मध्याह्नीं सायंकाळ दाखवितों."

राजाला हा खेळ प्रेक्षणीय होणार असें वाटलें; म्हणून त्यानें तो पाहण्यास देवीस असा निरोप पाठविला कीं ह्या ठिकाणीं दुसरें कोणी नाहीं, तरी कांहीं एक संकोच न धरतां इकडे यावें. आपण दोघेंजण एकत्र बसून हा खेळ पाहूं.

तो गारुडी उज्जयिनीचा रहिवासी असल्यानें राणीला त्याच्याविषयीं आपलेपणा वाटत होता. म्हणून ती त्याचा खेळ पाहण्यास उत्सुकतेनें आली. खेळ सुरू झाला. गारुडी आपल्या सभोवतीं मोरपिसांचा कुंचला फिरवीत फिरवीत म्हणाला, "महाराज, पाहा पाहा, मी आपणांस ब्रह्मा दाखवितों, विष्णू दाखवितों, शंकर दाखवितों, इंद्र दाखवितों; एवढेंच काय, पण सिद्ध-विद्याधर ह्यांना अप्सरांसह नृत्य करतांनाही दाखवितों."

सर्वजण आश्चर्यानें थक्क झालीं आणि वर पाहूं लागलीं. त्यांना ब्रह्मदेव हा कमलासनावर अधिष्ठित झालेला दिसूं लागला; शंकर हा मस्तकीं

चंद्र धारण केलेला दिसूं लागला; विष्णु हा शंख-चक्र-गदा-पद्मधारी दिसूं लागला. इंद्र हा ऐरावतावर आरूढ झालेला दिसूं लागला. स्वर्गांगना पायांत नूपुरें धारण करून नृत्य करतांना दिसूं लागल्या. हा खेळ पाहत असतां वासवदत्तेनें विस्मयानें तोंडांत बोटें घातलीं. विदूषक तर एकीकडे तोंड वळवून गारुड्यास म्हणाला, " अरे लेका, हे देव आणि ह्या अप्सरा दाखवून काय उपयोग! तुला महाराजांना संतुष्ट करावयाचें असेल तर सागरिका दाखीव."

गारुड्याचा खेळ रंगांत आला होता; पण त्याला मध्येंच एक व्यत्यय आला. सिंहलद्वीपाचा राजा विक्रमबाहु ह्याचा प्रधान वसुभूति राजाच्या भेटीस आल्याचा यौगंधरायणाकडून निरोप आला. तेव्हां राणी म्हणाली, " महाराज, हें खेळ पाहण्याचें काम घटकाभर राहूं द्या; माझ्या मामाचा प्रधान वसुभूति आला आहे, त्याला महाराजांनीं अगोदर भेट द्यावी." " ठीक आहे, तसें कां होईना" असें म्हणून राजानें गारुड्यास अंमळ खेळ बंद करण्यास सांगितलें. तेव्हां तो म्हणाला, " जशी आज्ञा; पण माझा एक खेळ राहिला आहे तो मागाहून अवश्य पाहावा." " बरें आहे, पाहूं" अशी राजानें मान हालवून संमति दिली आणि वसुभूतीकडे वळून त्याला कुशल प्रश्न विचारले.

बोलतां बोलतां वसुभूतीचें लक्ष विदूषकाच्या गळ्यांतील रत्नमालेकडे गेलें. तेव्हां तो विस्मयानें स्वत:शीं म्हणतो, ' हीच रत्नमाला सिंहलेश्वरानें आपल्या कन्येस प्रस्थानसमयीं दिली होती.' पुन: त्याचें त्यालाच वाटलें कीं ' अलंकारासारखे अलंकार असतात. वत्सेश्वराच्या घरीं काय रत्नें थोडीं असतील!' म्हणून त्यासंबंधीं विदूषकास विचारणें वसुभूतीस प्रशस्त वाटेना. पण त्याची मुद्रा चिंताक्रान्त झालेली पाहून राजानेंच विचारलें, " सिंहलेश्वराचें कुशल आहे ना?"

“ होय, सिंहलेश्वर खुशाल आहेत; पण त्यांची कन्या रत्नावली समुद्रांत वादळ झाल्यामुळें नौका फुटून ....” पुढें वसुभूतीचा कंठ दाटून आल्यानें त्याला बोलवेना.

वासवदत्ता ‘ हाय हाय ’ म्हणून शोक करूं लागली. कारण, रत्नावली ही तिची मामेबहीण लागत होती. शेवटीं राजानें वसुभूतीस अथपासून इतिपर्यंत वृत्त कथन करण्यास सांगितलें. तेव्हां तो म्हणाला,

“ आमच्या सिंहलदेशाचे महाराज विक्रमबाहु ह्यांची कन्या रत्नावली हिच्याविषयीं असें भविष्य वर्तविण्यांत आलें होतें कीं ही चक्रवर्ती पट्टराणी होणार. हें भविष्य आपले प्रधान यौगंधरायण ह्यांच्या कानीं गेलें. तेव्हां त्यांना वाटलें कीं रत्नावली वत्सदेशाच्या राजास मिळाल्यास तो चक्रवर्ती होईल. ह्या हेतूनें यौगंधरायणानें तिला मागणी घातली. परंतु वत्सराजाची अगोदरच वासवदत्ता नांवाची राणी आहे, म्हणून अशा सवतीवर आपली मुलगी देण्याला विक्रमबाहु सिद्ध होईना. तेव्हां यौगंधरायणानें खोटेंच लोकांत पिकविलें कीं वासवदत्ता पतीसह मृगयेस गेली असतां वणव्यांत सापडून मरण पावली. हें वृत्त वस्तुतः दुःखकारक, पण आपल्या कन्येच्या दृष्टीनें दुःखांत सुखकारक असें मनाचें समाधान करून, विक्रमबाहूनें रत्नावलीला आपणास देण्यासाठीं माझ्यासह नौकेंतून पाठविलें. ती नौका वाटेंत फुटली. पण दैवयोगानें रत्नावली एका फळीच्या आश्रयानें तीरास सुखरूप पोचली. मीही कसाबसा तीरास आलों. पण तेथेंच आमची चुकामूक झाली आणि मी कोशलेश्वरास जिंकण्याकरितां निघालेल्या आपल्या रुमण्वान सेनापतीच्या सेनेस जाऊन मिळालों. ”

वसुभूति आपलें वृत्त कथन करीत आहे, इतक्यांत ‘ अंतःपुराला आग लागली, अंतःपुराला आग लागली ’ अशी आरडाओरड झाली. तेव्हां राजा घाबरा होऊन म्हणाला, “ काय ? देवी वासवदत्ता दग्ध झाली ? हे प्रिये वासवदत्ते ! ”

वासवदत्ता समीप असतांही राजास ती दग्ध झाल्याचा भास झाला. हें पाहून वासवदत्ता म्हणाली, "मीं निर्दयपणानें सागरिकेस अंतःपुरांत कोंडलें आहे. तिला अगोदर वांचवा."

"हा मी निघालों" असें म्हणून उदयन अंतःपुराकडे निघाला.

महाराजांनीं हें साहस करूं नये, असें विदूषक व वसुभूति म्हणाले. विदूषकानें तर राजाचें उत्तरीयच ओढून धरलें होतें. पण तो ऐकेना. तेव्हां सर्वजण राजाच्या पाठोपाठ अंतःपुराकडे धावत गेले.

राजानें सागरिकेस सुरक्षित बाहेर आणलें. "आग इतकी भडकली असतां अंतःपुर जसेंच्या तसेंच आहे आणि सागरिकेला आगीची झळसुद्धा लागली नाहीं हें कसें? आग एकाएकीं नाहींशी कशी झाली? काय हो चमत्कार हा! हें का स्वप्न म्हणावें, का हा गारुड्याचा खेळ म्हणावा?" अशा तऱ्हेचे उद्गार राजाच्या मुखांतून येऊं लागले.

तेव्हां विदूषक म्हणतो, "मित्रा, हा गारुड्याचा खेळच आहे ह्यांत कांहीं संशय नाहीं. तो गारुडी म्हणत नव्हता का, माझा आणखी एक खेळ आवश्य पाहावा म्हणून? तोच हा शेवटचा खेळ त्यानें दाखविला."

ह्यानंतर राजा वासवदत्तेस म्हणाला, "तुझ्या आज्ञेप्रमाणें आम्हीं ही सागरिका सोडवून आणली आहे."

ह्यावर राणीनें हसून म्हटलें, "प्राणनाथ, कळलें मला सारें."

वसुभूतीनें विचारलें, "महाराज, ही कन्या कोठून आणली?" राजानें उत्तर दिलें, "तें सगळें देवीस विचारा." ह्यावर वासवदत्ता म्हणाली, "प्रधानजी, आमच्या यौगंधरायण पंतप्रधानांनीं ही कन्या समुद्रांत सापडली असें सांगून माझ्या स्वाधीन केली आहे. त्यांच्याच सांगण्यावरून आम्ही तिला सागरिका असें म्हणतों."

हें ऐकून राजास पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, "यौगंधरायण मला विचारल्यावांचून कोणतीही गोष्ट करीत नाहीं. मग हें कसें झालें?"

वसुभूतीला आतां निश्चित वाटलें कीं विदूषकाच्या कंठांतली रत्नमाला आणि समुद्रांत सापडलेली ही कन्या, ह्या दोन गोष्टींवरून ही सागरिका म्हणजे रत्नावलीच असली पाहिजे. म्हणून तो सागरिकेच्या संमुख येऊन म्हणाला, "रत्नावली, काय ही तुझी दशा!"

**सागरिका :** (प्रधानास निरखून पाहून व डोळ्यांत आसवें आणून) कोण अमात्य वसुभूति?

**वसुभूति :** होय, तोच दुर्दैवी मी!

**सागरिका :** अग आई, अहो बाबा, तुम्ही कोठें आहांत? तुम्ही माझ्याशीं बोलत कां नाहीं? (असें बोलून तिला मूर्च्छा आली.)

**वासवदत्ता :** (गडबडीनें) काय, ही माझी बहीण रत्नावली? ताई, सावध हो.

**राजा :** काय? महापराक्रमी सिंहलराजाची ही कन्या?

**विदूषक :** (स्वतःशीं, रत्नमालेस स्पर्श करून) तरीच. माझ्या मनांत आलेंच होतें कीं यःकश्चित् माणसास असा मोलाचा अलंकार कसा मिळेल म्हणून!

सागगिका अमळशानें सावध झाली. तेव्हां वासवदत्ता म्हणाली, "मी किती निर्दय! माझ्या भगिनीला मीं शृंखलांनीं बांधून ठेवलें होतें. आर्यपुत्र, हिच्या पायांतल्या बेड्या आपण तोडून टाका पाहूं."

"देवीची आज्ञा कोण मान्य करणार नाहीं?" असें म्हणून राजानें सागरिकेच्या शृंखला तोडल्या, तों यौगंधरायण तेथें आले व म्हणाले,

"महाराजांचा जयजयकार असो! महाराज, आपणांस न कळत मीं कांहीं गोष्टी केल्या, त्याबद्दल मला आपण क्षमा करावी. ज्यानें राजसेवा पतकरिली आहे त्याला अशा थोर माणसाचींसुद्धा मनें दुखवावीं लागतात. महाराज, 'सिंहलेश्वराची उपवर कन्या रत्नावली ही ज्याला वरील तो सार्वभौमपद पावेल' हें एका सिद्धानें केलेलें भाकीत...." हें ऐकून राजा

मध्येंच म्हणाला, "यौगंधरायण, मीं हें सर्व वृत्त आतांच श्रवण केलें आहे. पण काय हो, तुम्ही हिला देवीच्या स्वाधीन कोणत्या हेतूनें केलें?"

विदूषकानें मध्येंच उत्तर दिलें, "मित्रा, हें सांगावयास नको. हिला अंत:पुरांत ठेविली म्हणजे ही जातां येतां आपल्या सहज दृष्टीला पडावी."

यौगंधरायणानें हसून उत्तर दिलें, "होय, असेंच महाराज."

आतां राजाला आणखी एक जिज्ञासा राहिली होती. ती पूर्ण करून घेण्याच्या उद्देशानें त्यानें विचारलें,

"यौगंधरायण, गारुड्यानें खोटी आग लाविली ही तुमच्याच संमतीनें काय?" "होय महाराज, तेंही खरें आहे." यौगंधरायणानें उत्तर दिलें, "नाहीं तर अंत:पुरांत बद्ध झालेल्या रत्नावलीचें आपणांस दर्शन कसें झालें असतें? वसुभूतीला सर्व गोष्टी कशा कळल्या असत्या? आतां देवीची ही भगिनी ठरल्यावर पुढें काय करावयाचें तें देवींनींच ठरवावें."

वासवदत्ता म्हणाली, "प्रधानजी, रत्नावलीचा आर्यपुत्रांशीं विवाह लावून द्यावा असें स्पष्ट कां सांगत नाहीं?" विदूषक मध्येंच उद्गारला, "देवींनीं प्रधानांचा आशय बरोबर ओळखला."

ह्यानंतर वासवदत्तेनें आपल्या अंगावरचे अलंकार काढून ते रत्नावलीच्या अंगावर घातले आणि तिला हातीं धरून व राजाजवळ नेऊन म्हटलें,

"आर्यपुत्र, ह्या रत्नाचा स्वीकार करावा."

"देवीच्या प्रसादाचा कोण स्वीकार करणार नाहीं?"

असें म्हणून राजानें रत्नावलीचें पाणिग्रहण केलें.

विदूषक हर्षभरित होऊन नाचूं लागला. "आज अखिल पृथ्वी माझ्या मित्राच्या हस्तगत झाली," असें तो बोलूं लागला.

यौगंधरायण म्हणाला, "मीं स्वामिकार्य केलें, तें आज पूर्णपणें सिद्धीस गेलें. मी आज धन्य झालों!"

## स्वाध्याय

१. मुलीचें नांव सागरिका असें कां ठेविलें ?

२. संदर्भ सांगून अर्थ लिहा —

(अ) हें चित्र ओकें ओकें दिसत आहे.

(आ) राजहंसी ही कमलाचा ताटवा सोडून दुसऱ्या ठिकाणीं कशी बरें रमेल ?

(इ) दासीची मूठ दाबून तो म्हणाला, "हें उगीच विनोदाचें बोलणें."

(ई) विदूषक म्हणाला, "जानव्याची शपथ !"

३. वासवदत्तेनें विदूषकाला कारागृहांत कां ठेविलें ?

४. गारुड्यानें कोणते चमत्कार दाखविले ? त्याचा हेतु काय होता ?

५. वसंतोत्सवाचें वर्णन करा.

६. विदूषकाच्या काखेंतला चित्रफलक खालीं पडला, त्याचा काय परिणाम झाला ?

७. विदूषकाचें स्वभावचित्र रेखाटा.

८. यौगंधरायणानें कोणतें कारस्थान रचलें ?

भ व भू ति कृ त

# मा ल ती मा ध व

पा त्रें

| | |
|---|---|
| माधव | नायक<br>देवरात प्रधानाचा पुत्र |
| मालती | नायिका<br>भूरिवसु प्रधानाची कन्या |
| मकरंद | माधवाचा मित्र |
| कलहंस | माधवाचा सेवक |
| नंदन | पद्मावतीच्या राजाचा मित्र |
| कामंदकी | बुद्धभिक्षुणी |
| अवलोकिता<br>सौदामिनी | कामंदकीच्या शिष्या |
| लवंगिका | मालतीची सखी |
| मदयंतिका | नंदनाची भगिनी |
| अघोरघंट | कालीदेवीचा उपासक |
| कपालकुंडला | अघोरघंटाची शिष्या |



ती त्याच झाडाजवळून जात असतां माधवाची व तिची दृष्टादृष्ट झाली.

अनुक्रम १५५८
विभाग वा. वा.
क्रमांक २९३८५
नों. दि. १-५-५१

भवभूतिकृत

# मालती माधव

★ प्रेमाची भावना किती गाढ व उत्कट असूं शकते आणि ती मोठमोठ्या अडचणींचे पर्वतही कशी उल्लंघूं शकते ह्याचें मनोहर चित्रण ह्या नाटकांत महाकवि भवभूतीनें केलें आहे. मालती व माधव ह्यांच्यामधील प्रेमाइतकाच किंबहुना त्याहूनही जास्त मित्र-प्रेमाचा प्रकर्ष ह्या नाटकांत दाखविला आहे.

"मला मुलगा झाला व तुला मुलगी झाली किंवा तुला मुलगा झाला व मला मुलगी झाली तर आपण आपल्या मुलांचा विवाह करूं." असें देवरात आपल्या भूरिवसु ह्या मित्राचा निरोप घेतांना म्हणाला.

भूरिवसूला ही कल्पना मान्य झाली. त्यानेंही तशीच प्रतिज्ञा केली.

कामंदकी म्हणाली, "गुरुबंधूंनो, मला हा तुमचा विचार फार आवडला. मी त्या विवाहाला येईन आणि तुम्हांस लग्नांत साहाय्य करीन."

देवरात, भूरिवसु व कामंदकी हीं एकाच विद्यालयांत शिकत होतीं. तें विद्यालय विदर्भदेशांतील पद्मावतीला होतें. तेथें भरतखंडांतील दूरदूरचे विद्यार्थी व विद्यार्थिनी अभ्यास करण्यासाठीं येत असत.

देवरात, भूरिवसु व कामंदकी तिघेंही कुशाग्रबुद्धीचीं असून समानशील होतीं, म्हणून त्यांचा स्नेह जमला होता. तिघांचेंही अध्ययन पूर्ण होऊन विद्यालय सोडण्याची वेळ आली तेव्हां त्यांचे कंठ सद्गदित झाले. आपला स्नेहसंबंध दृढ व्हावा, एवढेंच नव्हे, तर आपल्या कुलांचे संबंध चिरंतन व्हावेत म्हणून त्यांनीं प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें प्रतिज्ञा केल्या आणि त्याही कामंदकीच्या समक्ष.

कामंदकीनें मात्र स्वत:संबंधीं असें ठरविलें होतें कीं बुद्धभिक्षुणी होऊन अध्यापनांत जन्म वेचावयाचा.

झालें ! गुरुजींचा निरोप घेऊन देवरात व भूरिवसु आपआपल्या गांवीं परत गेले.

पुढें भूरिवसु हा पद्मावतीच्या राजाचा मुख्य प्रधान झाला व देवरात ह्यासही विदर्भ देशाचें मुख्य प्रधानपद मिळालें.

यथाकालीं त्यांचे विवाह होऊन सुदैवानें त्यांच्या मनांत होतें तसेंच घडून आलें. भूरिवसूस कन्या झाली नि देवरातास पुत्र झाला. भूरिवसूनें आपल्या कन्येचें नांव मालती असें ठेविलें आणि देवरातानें आपल्या मुलाचें नांव माधव असें ठेविलें. दोन्ही मुलें दिसायला मोठीं सुरेख होतीं.

माधव वीस वर्षांचा झाला, तेव्हां त्याला राजनीतीचा अभ्यास करण्यासाठीं कुंडिनपुराहून पद्मावतीस पाठविण्यांत आलें. पद्मावतीसच पाठविण्याचें कारण त्या स्थळीं देवराताची गुरुभगिनी कामंदकी ही राहत होती.

पूर्वीं निश्चय केल्याप्रमाणें कामंदकी बुद्धधर्माचा स्वीकार करून जोगीण झालेली होती आणि तिनें पद्मावती नगरीच्याच बाहेर एक विद्यालय स्थापन केलें होतें. कामंदकीच्या विद्वत्तेची कीर्ति ऐकून लांबलांबचे विद्यार्थी व विद्यार्थिनी त्या स्थळीं शिकण्यासाठीं येत असत. म्हणून

माधवासही त्याच्या वडिलांनीं कामंदकीच्याच विद्यालयांत आणून ठेविलें. आपल्या बालमित्राच्या मुलाला पाहून कामंदकीला अतिशय आनंद झाला. कारण, तिची इच्छा अशीच होती. माधवास पद्मावतीला पाठविण्यांत देवराताचा आणखी एक हेतु होता; तो हा कीं भूरिवसु जर कदाचित् आपलें वचन विसरला असेल, तर त्यास त्या वचनाचें स्मरण करून द्यावें.

वास्तविक पाहिलें तर भूरिवसु हा गुरुगृहीं केलेली प्रतिज्ञा विसरला नव्हता. आपली मुलगी वयांत आल्यावर तिचें माधवाशींच लग्न लावावयाचें त्यानें योजिलें होतें; पण कांहीं कालानें ह्या लग्नाला एक नवीनच विघ्न उपस्थित झालें.

पद्मावतीच्या राजाचा नंदन नांवाचा एक नर्मसचिव होता. तो वयानें चाळिशीच्या आंत बाहेर असावा. त्याच्यावर राजाची मोठी कृपा. भूरिवसू-कडून मालती आपणांस मिळावी म्हणून त्यानें राजास भीड घातली.

राजानेंही मालती नंदनास देण्याविषयीं भूरिवसूस सुचविलें; तेव्हां भूरिवसूस मोठा पेंच येऊन पडला. इकडे आड व तिकडे विहीर असें त्यास होऊन गेलें. 'महाराजांची आपल्या मुलीवर सर्वस्वीं सत्ता आहे' असें मोघम बोलून त्यानें ती वेळ कशी तरी मारून नेली. उघडपणें 'नाहीं' म्हणण्याचाही त्यास धीर होईना. राजाचा शब्द मोडावा तर त्याचें मन दुखवेल आणि मित्रास दिलेलें वचन न पाळावें तर 'विश्वासघातकी' अशी आपली दुष्कीर्ति होईल. ह्यांतून कोणती तोड काढावी हें त्यास सुचेना. ह्या वेळीं त्यास आपल्या गुरुभगिनीची म्हणजे कामंदकीची आठवण झाली.

भूरिवसूनें कामंदकीची भेट घेतली आणि तिला सर्व वृत्त निवेदन केलें. राजाची अवकृपा तर न व्हावी व मनाचा हेतु तर सिद्धीस जावा अशी कांहीं युक्ति काढण्यास त्यानें तिला सांगितलें आणि आपण जणूं काय त्या गांवचेच नव्हत, अशा तऱ्हेनें तो स्वतः वागूं लागला.

कामंदकी मोठी चतुर स्त्री होती. भगवीं वस्त्रें परिधान करून कालक्रमण करीत असतां तिला ह्या गोष्टींत पडण्याचें वास्तविक कांहींच कारण नव्हतें; पण निःस्वार्थ बुद्धीनें परार्थ झटण्याचें तिनें व्रतच घेतलें असल्यानें मालती व माधव ह्या तुल्यगुण वधूवरांचा विवाह घडवून आणावा असें तिच्याही मनांत आलें. पण ह्या कामीं आपलें अंग आहे असें न दाखवितां तिनें अनेक युक्त्या-प्रयुक्त्या योजल्या. शिवाय ती जोगीण असल्यामुळें तिच्याबद्दल कोणास संशय येण्याचेंही कारण नव्हतें.

कामंदकीची अवलोकिता म्हणून एक शिष्या होती. ती कामंदकीच्या सांगण्यावरून माधवाला गोष्टी सांगत सांगत भूरिवसूच्या वाड्यावरून फिरावयास नेत असे.

एके दिवशीं मालतीनें माधवास आपल्या वाड्यावरून जातांना पाहिलें आणि तत्काल ती त्याच्यावर अनुरक्त झाली. माधव तिला इतका आवडला कीं आपल्या मनाचें रंजन करण्यासाठीं म्हणून तिनें एका फलकावर माधवाचें चित्र काढलें. तें चित्र मालतीच्या लवंगिका नांवाच्या दासीनें पाहिलें आणि तिनें ही गोष्ट कामंदकीच्या कानांवर घातली; तेव्हां कामंदकीला मनांतून अतिशय आनंद झाला. कारण तिला वाटलें कीं आतां आपलें अर्धें अधिक काम झालेंच.

वसंतऋतूचे दिवस आले. पद्मावतीच्या बाहेर 'मदनोद्यान' म्हणून एक उद्यान होतें. त्या ठिकाणीं कामदेवाचा उत्सव सुरू झाला. पद्मावती नगरींतील स्त्रिया नटून थटून कामदेवाच्या दर्शनाकरितां मदनोद्यानांत गोळा झाल्या. अवलोकितेच्या सांगण्यावरून उत्सवाची मौज पाहाण्यासाठीं माधवही तिकडे गेला.

कामदेवाचें मंदिर ज्या आवारांत होतें त्याच आवारांत एक बकुळीचें झाड होतें. त्या झाडाखालीं माधव जाऊन बसला. त्या झाडावर भुंग्यांचे थव्वेच्या थवे येऊन गुंजारव करीत होते. माधव खालीं पडलेलीं बकुळीचीं फुलें घेऊन त्यांची माला गुंफूं लागला. इतक्यांत कामदेवाच्या मंदिरांतून

एक तरुणी बाहेर आली. तिचें वय सोळा सतरा असावें. ती त्याच झाडाजवळून जात असतां माधवाची व तिची दृष्टादृष्ट झाली आणि दोघांच्याही मनांत परस्परांविषयीं प्रेम उत्पन्न झालें. माधवाचें चित्त अगदीं तल्लीन होऊन गेलें; कारण मालती जणूं सौंदर्याची खाणच होती. लोहचुंबकानें लोहाला आकर्षावें तसें तिनें माधवाचें चित्त आपणांकडे ओढून घेतलें.

ह्यानंतर थोड्याच वेळांत मालती अंबारींत बसून घरीं परत गेली आणि परत जात असतां मधून मधून मागें मुरडून ती माधवाकडे पाहत होती.

मालती निघून गेली; पण तिची एक सखी तेथेंच अंमळशी थांबून बकुळीचीं फुलें गोळा करूं लागली. ओच्यांत फुलें गोळा केल्यावर माधव बसला होता त्या ठिकाणीं कांहींतरी मिषानें जाऊन आणि त्याला नमस्कार करून ती म्हणाली, "महाभाग, आपला हार फार मोहक झाला आहे. आमच्या ताईसाहेबांच्या तर तो अगदीं मनांत भरला आहे; तेव्हां तो त्यांच्या गळ्यांत शोभो आणि कृतार्थ होवो. ज्यानें हा हार गुंफला आहे त्याचें कौशल्य सफल होवो."

"ही कोण?" माधवानें त्या दासीला विचारलें.

"अमात्य भूरिवसूची कन्या मालती. मी तिची सखी लवंगिका." तिनें उत्तर दिलें.

माधवानें कामंदकीच्या तोंडून अनेकवार मालतीचें गुणवर्णन ऐकलें होतें. ती हीच मालती असें ध्यानांत येऊन त्यास आनंद झाला. त्यानें आपल्या गळ्यांतून तो हार काढून लवंगिकेला दिला. पुढें यात्रेच्या गर्दींत माधवाची व लवंगिकेची चुकामूक झाली. माधव शून्य मनानें परत फिरला. इतक्यांत त्याचा मित्र मकरंद त्यास वाटेंत भेटला. मकरंद म्हणाला, "माधवा, आज तुझी चित्तवृत्ति मला नित्याप्रमाणें दिसत नाहीं. काय झालंय् काय तुला?"

माधव जरा वेळ तोंड खालीं घालून उभा राहिला. मकरंदानें पुन्हा तसेंच विचारलें.

" गड्या, तुला न सांगण्यासारखें असें काय आहे ? " असें म्हणून माधवानें मदनोद्यानांतील सर्व वृत्त त्यास निवेदन केलें आणि शेवटीं तो म्हणाला, " कांहीं एक स्वार्थ नसतांना माझें मालतीवर अकारण प्रेम जडलें आहे. काय जन्मांतरींचा योग असेल कोण जाणे ? मानवांना जीं सुखदु:खें होतात तीं दैवच घडवून आणतें. सर्व दैवाधीनच आहे. "

तें ऐकून मकरंद म्हणाला, " मित्रा, स्नेहांत स्वार्थ असतो, असें कांहीं लोक म्हणतात तें खोटें आहे. सूर्योदय झाला म्हणजे कमलें प्रफुल्लित होतात; चंद्रोदय झाला म्हणजे चंद्रकांत मणी पाझरतो, ह्याला कारण काय असावें ? "

" आन्तरः कोऽपि हेतुः । "

" अंतर्यामींचें प्रेम, दुसरें काय ? प्रेमाला बाह्य उपाधींची आवश्यकता नसते. प्रेमाचें वर्णन करणें अशक्य होय. तसेंच तुम्हां दोघांचें. "

ह्याप्रमाणें बोलत बोलत माधव आणि मकरंद घराकडे निघाले.

इकडे लवंगिकेनें माधवाकडून घेतलेला बकुळीचा हार मालतीला आणून दिला, तेव्हांपासून मालतीला कांहीं सुचेनासें झालें. ती अगदीं वेडावून गेली. तिनें माधवाचें चित्र काढलें होतें तें लवंगिकेला दाखविलें.

लवंगिकेची मंदारिका नामक एक मैत्रीण होती. तिला लवंगिकेनें तें चित्र दाखविलें. पुढें असें झालें कीं मंदारिकेचा कलहंस नांवाचा एक मित्र होता त्यानें मंदारिकेपाशीं माधवाचें तें चित्र पाहिलें.

कलहंस हा माधवाचा सेवक होता. त्यानें मंदारिकेजवळचें चित्र आपल्या धन्यास दाखविलें. त्या वेळीं मकरंद तेथेंच होता. तो कलहंसास म्हणाला, " कलहंसा, कोणीं रे काढलें हें माधवाचें चित्र ? "

**कलहंस :** ज्या माणसानें ह्यांचें हृदय आपणाकडे ओढून घेतलें आहे, त्यानेंच.

**मकरंद :** अस्सें ! मालतीनें काय ?

**कलहंस :** होय, तिनेंच.

**माधव :** मकरंदा, तुझा तर्क खरा आहे. तूं मोठा चतुर आहेस.

**मकरंद :** कलहंसा, हें चित्र तुझ्या हातीं कसें रे आलें ?

**कलहंस :** मला तें मंदारिकेपासून मिळालें. तिला तें लवंगिकेनें दिलें.

**मकरंद :** कलहंसा, मालतीनें माधवाचें चित्र कां काढलें हें मंदारिकेनें तुला सांगितलें आहे काय ?

**कलहंस :** होय. वियोगदु:ख विसरावें म्हणून.

**मकरंद :** माधवा, आतां तूं निश्चिंत ऐस. मात्र आम्हांला मालतीचें चित्र काढून दाखीव म्हणजे तिचेंही रूप आमच्या दृष्टीस पडेल.

**माधव :** जा रे कलहंसा, रंग नि कलम आण.

कलहंसानें चित्रसाहित्य आणिलें आणि माधवानें त्याच फलकावर स्वत:च्या चित्राशेजारीं मालतीचें चित्र काढिलें व त्याच्या खालीं एक श्लोक लिहून ठेवला त्याचा आशय असा : मनाला मोहून टाकणाऱ्या इतर मधुर वस्तु जगांत अनेक आहेत; पण चंद्रिकेप्रमाणें माझ्या नेत्रांना मोहविणारी ही एकटीच आहे.

मकरंद त्या चित्राची प्रशंसा करूं लागला. इतक्यांत मंदारिका तेथें लगबगीनें आली आणि कलहंसाला म्हणाली, "कलहंसा, मघांशीं मीं दिलेला चित्रफलक कोठें आहे ?"

कलहंसानें तो चित्रफलक तिच्यापुढें केला. त्यावरील मालतीचें चित्र पाहून मंदारिकेला फार आश्चर्य वाटलें. "हें चित्र कोणीं काढिलें ?" तिनें कलहंसाला विचारलें.

"तुझ्या मालतीबाईंनीं ज्यांचें चित्र काढलें आहे त्यांनींच मालतीबाईचें हें चित्र काढिलें आहे. समजलीस ?" कलहंसानें तिला सांगितलें.

तें ऐकतांच मंदारिकेला अत्यंत हर्ष झाला आणि तें चित्र घेऊन लवंगिकेला दाखविण्यास ती निघून गेली.

तिकडे भूरिवसूच्या वाड्याच्या गच्चीवर मालती व लवंगिका बोलत वसल्या होत्या. बोलतां बोलतां लवंगिकेनें मंदारिकेपासून आपणांस मिळालेलें चित्र मालतीला दाखविलें. आपली प्रतिमा येथें कोणीं काढली ह्याविषयीं तिला कुतूहल वाटलें. अशा रीतीनें ज्या स्थळाहून माधवाचें चित्र निघालें होतें त्याच स्थळीं तें परत गेलें.

इकडे मदनोद्यानांत झालेला सर्व वृत्तान्त कामंदकीच्या कानांवर गेला. बकुलपुष्पहार व चित्रफलक ह्यांची गोष्ट ऐकून आपल्या कार्यास दैव अनुकूल आहे अशी तिला आशा वाटूं लागली. विवाहाच्या कामांत वधूवरांची परस्परांवर प्रीति असणें ही पहिली अवश्य गोष्ट होय असें ती म्हणे. आंगिरस ऋषींनीं म्हटलें आहे कीं वाणी, मन व नेत्र ह्यांची प्रवृत्ति ज्याच्याकडे असते त्याच्याशीं विवाह केला असतां त्यांत सर्व प्रकारें कल्याण असतें. हें तिला ठाऊक होतें.

मालतीचा समाचार घ्यावा म्हणून कामंदकी तिच्या घरीं गेली. मालतीनें तिला वंदन केलें, तेव्हां ‘ तुझे मनोरथ पूर्ण होवोत ’ असा आशीर्वाद तिला कामंदकीनें दिला.

“ भगवति, कां बरें येणें झालें ? भगवतींची प्रकृति ठीक आहे ना ? ”

“ हो, ठी .... क .... आहे. ” असें दीर्घ उसासा टाकून कामंदकीनें उत्तर दिलें.

“ भगवति, आपलें बोलणें आज कांहीं निराळेंच दिसतें आहे ! आपणांला इतका उद्वेग वाटण्याचें काय बरें कारण झालें असावें ? ” असें लवंगिकेनें कामंदकीला विचारलें.

**कामंदकी :** वत्से, खरें म्हटलें तर ज्यांनीं भगवीं वस्त्रें परिधान केलीं आहेत, त्या आमच्यासारख्यांनीं मायेच्या पसाऱ्यांत पडूं नये हें चांगलें; नाहीं तर असें दुःख होतें.

**लवंगिका :** कसें बरें ?

**कामंदकी :** अग, तुला माहीत नाहीं का ? ( मालतीकडे पाहून ) राजाची कृपा संपादण्यासाठीं भूरिवसु प्रधान नंदनाला जावई करणार आहे असें ऐकतें. ह्या मुत्सद्दी लोकांची कृति अगम्य असते.

आपणांस नंदनाला देणार हें ऐकून मालतीच्या मनाला मोठा धक्का बसला.

**लवंगिका :** माई, तुम्ही कांहीं करा पण माझ्या प्रियसखीस ह्या जिवंत मरणापासून वांचवा.

**कामंदकी :** अग, माझ्या हातीं काय आहे ? कन्येचें बरें वाईट करणें हें प्रायः पित्याच्या किंवा दैवाच्या आधीन असतें ; पण राजकारणी पुरुषांना राजकारणापुढें आपल्या पोरांबाळांची काय पर्वा ? तसें म्हटलें तर लग्नाच्या बाबतींत स्त्रियांना देखील स्वातंत्र्य असतें. शकुंतलेनें दुष्यंताशीं गांधर्वविवाह केला ; उर्वशीनें पुरुरव्यास स्वतः वरिलें. वासवदत्तेला तिच्या वडिलांनीं संजय राजास देऊं केलें असतांही तिनें आपण होऊन उदयन राजास वरिलें ; ह्या प्राचीन कथा तुला ठाऊक आहेत ना ? पण जाऊं दे. अशा प्रकारचें साहस मालतीनें करावें असें सांगणें मजसारखीस उचित होणार नाहीं.

हें बोलणें ऐकत असतां मालतीच्या डोळ्यांस पाणी आलें. ती मनाशीं म्हणाली, "किती मी हतभागी ! माझे वडील किती निर्दय ! तृष्णेनें कोणासही सोडिलें नाहीं हेंच खरें."

कामंदकीबरोबर तिची शिष्या अवलोकिता आली होती, ती हें दृश्य पाहून म्हणाली, "भगवति, आपणांस इकडे येऊन बराच वेळ झाला."

**कामंदकी :** होय, खरेंच. माधवाची प्रकृति बरी नाहीं, मला तिकडे लवकर ....

कामंदकीचें हें वाक्य पूर्ण होतें न होतें तोंच लवंगिकेनें मध्येंच विचारलें, " भगवति, ज्याच्यावर आपण इतकी माया करितां तो माधव आहे तरी कोण ?" कामंदकीनें उत्तर दिलें, " त्याची कथा बरीच मोठी आहे. मला सगळी सांगण्याला आज वेळ नाहीं, पण तुला एवढी उत्कंठा आहे म्हणून थोडक्यांत सांगतें.

" विदर्भ राजाचा देवरात म्हणून एक विख्यात अमात्य आहे. त्याची सर्व माहिती मालतीच्या पित्यास आहे. कारण त्या दोघांनीं एकाच गुरूजवळ विद्याभ्यास केला होता. त्याच देवराताचा पुत्र हा माधव. माधव मोठा गुणवान आहे. त्याचें रूप पाहून तर मदनासही लाज वाटेल. सांप्रत तो ह्याच नगरांत नीतिशास्त्र शिकण्यासाठीं येऊन राहिला आहे. त्याच्याबरोबर त्याचा मकरंद नांवाचा एक स्नेही असतो. "

ह्याप्रमाणें सहज बोलतां बोलतां माधवाचा कुलवृत्तान्त सांगून आणि पौराणिक कथांचा आशय मोठ्या खुबीनें सुचवून कामंदकीनें सर्वांचा निरोप घेतला.

कामंदकीच्या तोंडून माधवाच्या थोर कुलाचें व थोर गुणांचें वर्णन ऐकून मालतीस व लवंगिकेस अत्यानंद झाला. लवंगिका म्हणाली, " स्वर्गावांचून इतर स्थळीं पारिजातक वृक्ष कसा उत्पन्न होईल ? "

लवंगिकेचे हे उद्गार मालतीला यथार्थ व समर्पक वाटले. तिच्या मनांत माधवाच्या कुलीनतेविषयीं जो संशय आला होता तो फिटला आणि माधवाविषयींचा तिचा अनुराग दृढतर झाला.

मालतीचे वडील भूरिवसु ह्यांची अशी मनीषा होती कीं मालतीनें माधवास गांधर्व विवाहानें वरावें म्हणजे आपणांवर कांहीं बोल येणार नाहीं. " मी काय करूं ? माझ्या न कळत मुलीनें हा विवाह केला. " असें सांगून आपणांस राजाची समजूत घालतां येईल असें तो म्हणे.

## वि भा ग

•

## दु स रा

पद्मावती नगरीच्या बाहेर एक शंकराचें मंदिर होतें. तेथें पुष्कळ पौरस्त्रिया नित्य नियमानें देवदर्शनासाठीं जात. त्या दिवशीं शिवरात्र होती म्हणून मालती तिकडेच उत्सवास गेली होती. जातांना कामंदकीनें तिला सांगितलें होतें, " मुली, तूं स्वत: बागेंतून फुलें तोडून आण आणि भगवान शंकराची पूजा कर म्हणजे तो तुझें मंगल करील. "

माधवही कामंदकीच्या सांगण्यावरून तिकडे जाऊन अशोक वृक्षाखालीं कामंदकीची मार्गप्रतीक्षा करीत बसला होता. ह्या उत्सवाच्या निमित्तानें मालती व माधव ह्यांची पुन्हा एकदा दृष्टादृष्ट करवावी असा कामंदकीचा हेतु होता.

मालती शिवालयाच्या उद्यानांत जाऊन जाईजुईचीं फुलें तोडूं लागली. इतक्यांत कामंदकी तेथें आली आणि मालतीला पाहून म्हणाली, " मुली, अग, आतां पुरे कर. तूं फार श्रमलेली दिसतेस. तुझ्या मुखावर घर्मबिंदु आले आहेत. तुझ्या मुखांतून नीट शब्दही उमटत नाहीं. बैस येथें. मला तुला कांहीं सांगावयाचें आहे. " असें म्हणून कामंदकीनें मालतीला आपल्याजवळ एका वेलीखालील शिलातलावर बसवून घेतलें.

त्या वेळीं आम्रवृक्षांवर बसून कोकिल मधुर आलाप करीत होते. मधुकर मकरंद पिऊन मंजुळ गुंजारव करीत होते. चंपक पुष्पांवरून वाहत येणारा सुगंधी वायु त्यांचे श्रमपरिहार करीत होता.

बोलतां बोलतां कामंदकीनें माधवाच्या गोष्टी काढल्या. ती म्हणाली, " माधवाच्या जिवास अलीकडे कांहीं समाधान वाटत नाहीं. तो मुलगा आधींच नाजूक. त्यांत परवांच्या वसंतोत्सवापासून त्याची अवस्था कठीण झाली आहे. विचाऱ्याच्या जिवाविषयीं मला मोठा घोर लागून राहिला आहे. "

हा संवाद झाडाआडून माधव ऐकत होता. तो मनाशीं म्हणाला, " अहाहा ! मी किती धन्य ! भगवती माझी किती काळजी वाहत आहेत ! "

आपणांवर माधवाचें प्रेम जडलें आहे, हें ऐकून मालतीस आनंद झाला आणि ती लवंगिकेस म्हणाली, " सखे, सर्व भूमंडलाचा जणूं अलंकारच अशा त्या महाभागाची अवस्था ऐकून माझ्या बाई हृदयाचें पाणी झालें आहे. काय करावें ? "

लवंगिका कामंदकीस म्हणाली, " माई, आपण म्हणतां तसें असेल; पण माझ्या सखीचीही अवस्था तशीच झाली आहे. "

ह्याप्रमाणें मालती, कामंदकी व लवंगिका ह्यांच्यामध्यें चाललेला संवाद आणखीही पुढें चालला असता; पण त्याला एक मोठें विघ्न आड आलें.

" वाघ सुटला ! सांभाळा ! वाघ सुटला ! ! सांभाळा ! " अशी जिकडे तिकडे आरडाओरड झाली.

शिवालयाच्या प्राकारांत दोन चार वाघ एका पिंजऱ्यांत ठेवलेले होते. त्यांपैकीं एक वाघ पिंजऱ्याचें दार मोडून बाहेर पळत सुटला. त्याची डरकाळी ऐकल्यानें लोक भयभीत होऊन वाट फुटेल तिकडे पळत सुटले. वाघानें एक दोन माणसांना आणि जनावरांना जायबंदी केलें.

" दुष्ट वाघाच्या तावडींत आमची प्रियसखी मदयंतिका सापडली आहे, तिचें रक्षण करा, धावा, धावा .... " असें मोठमोठ्यानें ओरडत कामंदकीची एक शिष्या बुद्धरक्षिता तिकडे येतांना त्यांना लांबून दिसली. सर्वजण डोळे विस्फारून आणि कान टवकारून त्या दिशेला पाहूं लागलीं.

" अहो, हा मेला वाघ मदयंतिकेचा जीव घेऊं पाहत आहे. " हें ऐकून मालती म्हणाली, " भगवति, हाय हाय ! मोठा घात झाला ! " तोंच माधव घाईघाईनें पुढें होऊन म्हणाला, " कोठें आहे, कोठें आहे तो वाघ ? "

माधवास पाहून मालती भयानें व हर्षानें स्वतःशीं म्हणाली, ' काय, माझा प्रियकर पण येथेंच आहे ? '

इतक्यांत बुद्धरक्षिता तेथें येऊन ठेपली आणि घाबऱ्या घाबऱ्या म्हणाली, "तो पाहा तो दुष्ट वाघ! देवळासमोरच्या रस्त्यावर बागेच्या बाहेर आहे."

माधव त्वरेनें तिकडे निघाला. कामंदकी म्हणाली, "वत्सा, सावध ऐस."

माधव दहा वीस पावलें जातो न जातो तोंच त्याचा मित्र मकरंद अवचित त्याच्यापुढें येऊन उभा राहिला. वाघानें घायाळ केलेल्या एका माणसाच्या हातांतील तलवार घेऊन मकरंदानें वाघालाच ठार केलें होतें. मकरंदाचा हा पराक्रम पाहून 'शाबास! शाबास!' असे सर्वांच्या तोंडून धन्योद्गार निघाले.

मोठें अरिष्ट टळलें. सर्वजणांस हायसें वाटलें; पण क्षणभरांत दुसरा एक चमत्कार झाला. सर्वांच्या तोंडून आनंदाच्या उद्गारांनंतर दुःखाचे सुस्कारे निघाले.

वाघाशीं लढतांना मकरंदाच्या दंडास वाघाचा पंजा लागला होता आणि त्यांतून रक्ताच्या चिळकांड्या उडत होत्या. मकरंद जमिनीवर तलवार टेकून आणि तीवर आपला भार सावरून स्तब्ध उभा राहिला होता. पण असा तो किती वेळ उभा राहणार? त्याला घेरी आली. तेव्हां मदयंतिकेनें प्रसंगावधान राखून त्यास सावरून धरिलें.

माधव म्हणाला, "भगवति, माझा प्रियमित्र मूर्च्छित झाला आहे; मला ह्या संकटांतून सोडीव." कामंदकीनें उत्तर दिलें, "वत्सा, तुझें मन फार कोवळें आहे. थांब, मकरंदाला कितपत जखम झाली आहे तें पाहूं." माधवानें हे शब्द पुरते ऐकले असतील नसतील तोंच त्यास मूर्च्छा आली. कामंदकीनें मकरंदाचा रक्तप्रवाह पट्टी बांधून थांबविला. मालती व बुद्धरक्षिता माधव व मकरंद ह्यांना वारा घालूं लागल्या. कामंदकीनें त्यांच्या मस्तकांवर आपल्या कमंडलूंतील पाणी शिंपडलें.

प्रथम मकरंद सावध झाला आणि माधवाकडे पाहून म्हणाला, "गड्या माधवा, सावध हो. अरे, तूं इतका म्यालास? मला तर कांहींच झालें नाहीं."

मालतीनें माधवाच्या कपाळावर हात ठेविला व हळूच म्हटलें, "सावध व्हा. आपले स्नेही सावध झाले. आपण भाग्यवान आहांत." हें ऐकून माधव हळुहळू सावध झाला. कामंदकीनें माधव व मकरंद ह्यांच्या मस्तकांचें अवघ्राण केलें आणि ती म्हणाली, "ईश्वराची कृपा. त्यांनीं माझीं बाळें मला पुन्हा परत दिलीं."

माधव आणि मकरंद हे परस्परांना मिठी मारून कडकडून भेटले.

कामंदकीनें मकरंदास म्हटलें, "वत्सा मकरंदा, तुझ्यामुळेंच आज मदयंतिकेचा जीव वांचला. तुला देवानें नेमकें ऐन वेळीं इकडे कसें पाठविलें ह्याचें मला नवल वाटतें!" मकरंदानें उत्तर दिलें, "मीं आज गांवांत कांहीं चमत्कारिक वार्ता ऐकिली तीवरून माधवाच्या मनाला बराच उद्वेग झाला असेल असें वाटून त्याला भेटण्यासाठीं मी ह्या उद्यानाकडे येत होतों. वाटेंत मला ही कुमारी वाघाच्या तावडींत सापडलेली दृष्टीस पडली."

मकरंदानें ऐकलेली वार्ता मालती व नंदन ह्यांच्या वाग्दानासंबंधीं असावी असें कामंदकी मनांत उमजली; पण त्याचा उच्चार न करतां ती म्हणाली, "वत्सा माधवा, तुझा मित्र तुला आज भेटला ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. ह्या असल्या आनंदाच्या प्रसंगीं तूं मालतीला कांहीं-तरी पारितोषिक दिलें पाहिजेस." माधव म्हणाला, "भगवति, मला हिनें आपल्या हातानें स्पर्श करून आणि माझ्या मित्राची कुशल वार्ता सांगून सावध केलें हा तिचा मजवर मोठा उपकार आहे. ह्याचा मोबदला म्हणून मी हिला आपलें हृदय आणि जीवित अर्पण करीत आहें." हें ऐकून लवंगिका माधवास म्हणते, "मी आपल्या प्रियसखीच्या वतीनें सांगतें कीं आपण दिलेलें हें पारितोषिक तिनें मोठ्या आनंदानें स्वीकारलें आहे."

मदयंतिका स्वतःशीं म्हणते, 'हा महाभाग प्रसंगोचित भाषण करण्यांत मोठा चतुर दिसतो.' मालती कांहीं बोलली नाहीं, पण मनाशीं म्हणाली, 'मकरंदानें उद्वेगाचें कारण म्हणून मघांशीं म्हटलें तें काय बरें असावें?'

लवंगिकेच्या भाषाणनें माधवास निरतिशय हर्ष झाला; पण त्याला उत्तर म्हणून कांहीं न देतां तो मकरंदाकडे वळून म्हणतो, "गड्या, मघां अनिष्ट वार्ता तूं ऐकिली म्हणतोस ती कोणती रे? सांग, सांग लवकर."

इतक्यांत तेथें एक दूत आला आणि मदयंतिकेस म्हणाला, "ताईसाहेब, आपले वडील बंधु नंदन ह्यांचा असा निरोप आहे कीं आज आपल्या घरीं पद्मावतीचे महाराज आले होते. त्यांच्या सांगण्यांत असें आलें कीं अमात्य भूरिवसूनें आपली कन्या मालती आम्हांस देण्याचें ठरविलें आहे. ह्याकरितां महोत्सवाच्या तयारीस लागूं या. तरी लवकर घरीं चलावें."

ह्या वार्तेनें मालती-माधवास जणूं विजेचा धक्का बसला. मालतीचें मुखकमल तत्काल म्लान दिसूं लागलें. माधव हिरमुसला झाला. मदयंतिकेस मात्र अत्यंत हर्ष झाला. ती मालतीला आलिंगून म्हणाली, "सखे मालती, आपणा दोघींचा जन्म ह्याच नगरांत झाला. बालपणापासून आपण एकत्र खेळत आलों. आजवर तूं माझी केवळ मैत्रीण होतीस, आतां तूं वहिनी होणार, म्हणून मला किती किती आनंद होतो म्हणून सांगूं!"

ह्यावर मालती बिचारी काय उत्तर देणार?

कामंदकीला मनांतून दुःख झालें. पण तसें बाह्यात्कारी न दाखवितां ती म्हणाली, "वत्से मदयंतिके, तुझ्या भावाला मालती मिळाली तर मग आजचा दिवस मोठा आनंदाचा होईल खरा!" मदयंतिकेनें उत्तर केलें, "भगवति, हें आपल्याच आशीर्वादाचें फल होय."

इतकें बोलून बुद्धरक्षिता व दूत ह्यांसह मदयंतिका तेथून जाण्यास निघाली. ज्यानें आपला प्राण वांचविला त्या मकरंदाकडे मदयंतिकेनें आदरानें व प्रेमानें पाहिलें. ती बुद्धरक्षितेला म्हणाली, "सखे, ह्या

महाभागाची व माझी पुन्हा गांठ पडेल काय ?" बुद्धरक्षितेनें उत्तर केलें, "जर भाग्य असेल तर पडेल."

मदयंतिका जात असतां माधव एकीकडे वळून मनाशीं म्हणतो, 'आज माझ्या आशेचा तंतु तुटून गेला. ज्या दैवानें माझा सर्वस्वीं घात केला तें दैव तरी कृतार्थ होवो. जरी मालतीचें मजवर खरें प्रेम आहे तरी ती पराधीन असल्यामुळें मीं तिची आशा करावयास नको होती! म्हणून मला शिक्षा झाली ती योग्य झाली. पण मालतीचें प्रभातकालीन चंद्रासारखें निस्तेज मुखमंडल पाहून माझें हृदय फुटून जात आहे.'

आतांच आलेल्या वार्तेनें माधव व मालती हीं खिन्न झालेलीं पाहून कामंदकी माधवास म्हणाली, "अरे माधवा, अमात्य भूरिवसु आपण होऊन तुला मालती देईल, असें का तुला वाटत होतें?"

**माधव** (किंचित् लाजून) : छे! नाहीं. तो तसें करील अशी मीं कधींच आशा केली नाहीं.

**कामंदकी** : तर मग विशेष निराश वाटण्यासारखें सध्यां काय झालें आहे?

माधवानें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

**मकरंद** : मालतीचें वाग्दान होऊन गेलें म्हणून मला विशेष भय वाटत आहे.

**कामंदकी** : अरे, ही वार्ता तर मला केव्हांच कळली होती. राजानें जेव्हां नंदनासाठीं भूरिवसूपाशीं मालतीची मागणी केली, तेव्हां 'महाराजांनीं आपल्या कन्येचा विचार पाहिजे तसा करावा. आपल्या कन्येवर आपली सत्ता आहे,' असें भूरिवसूनें राजास सांगितलें, ही गोष्ट पुष्कळ लोकांना ठाऊक झाली आहे.

**मकरंद** : हो हो, मींसुद्धा ऐकली आहे खरी.

**कामंदकी** : राजानें स्वतः नंदनाला मालती देण्याचें ठरविलें आहे, असें आतांच दूतानें आपणांला सांगितलें, पण त्यांत काय अर्थ आहे?

कारण शब्दांचा काय पाहिजे तसा अर्थ करितां येतो. भूरिवसु जें कांहीं राजास बोलला त्याचा अर्थ निराळाच आहे. मनुष्यास जें कांहीं करावयाचें असतें तें त्याच्या मनांत असतें. नुसतें बोलण्यावर काय आहे? 'महाराजांनीं आपल्या कन्येचा विचार पाहिजे तसा करावा' ह्या वाक्याचा अर्थ महाराज आपली स्वतःची कन्या नंदनास देण्यास समर्थ आहेत असाही होतो. महाराजांची सत्ता स्वतःच्या कन्येवर आहे, इतरांच्यावर नाहीं. शिवाय लोकांच्या कन्येचें दान राजानें करावें असें धर्मशास्त्रांतही सांगितलेलें नाहीं आणि लोकांत तशी चालही नाहीं. राजानें भूरिवसूची कन्या नंदनाला देऊं केली, त्यामुळें भूरिवसु कांहीं बांधला गेला नाहीं. ह्या सर्व गोष्टींचा विचार करा. तुम्हां दोघांचा इष्ट हेतु साध्य व्हावा म्हणून मी झटत आहें. तुमचें दुःख मला दिसत का नाहीं? तुमच्या शत्रूलाही असें दुःख न होवो. वत्सा, मीं अशी प्रतिज्ञा केली आहे कीं माधवाचा व मालतीचा विवाह मीं घडवून न आणला, तर मी प्राण देण्यासही मागेंपुढें पाहणार नाहीं.

मकरंद म्हणाला, " भगवति, आपण बोलतां हें योग्यच आहे. आपण जरी संन्यास घेतला आहे, तरी माधवास मातेप्रमाणेंच आहांत. त्याच्यावर आपल्या कृपेची पाखर आहे, म्हणूनच ज्या गोष्टी करण्याचें विरक्त मनुष्य मनांत आणणार नाहीं, त्या आपण करीत आहां. ह्या कार्याला यश येणें न येणें दैवावर अवलंबून आहे. त्यास कोण काय करणार? " ह्याच वेळीं एक दूत येऊन म्हणाला, " भगवति, मालतीबाईच्या मातुःश्रींनीं आपणांस मालतीताईंना घेऊन त्वरित बोलाविलें आहे. "

ह्या निरोपाप्रमाणें कामंदकी, मालती व लवंगिका ह्या तेथून निघाल्या. माधव व मालती परस्परांकडे दीनपणें पाहूं लागलीं. लवंगिकेला बोलल्या-वांचून राहवेना. ती म्हणाली, " हाय हाय! अमात्यानें आमच्या ह्या प्रिय सखीचा कसा घात केला आहे पाहा. " मालती काय बोलणार? जातां जातां ती मनाशीं म्हणते, ' हे भाग्यवंता, तुझी ही शेवटची भेट. आतां

मला जगण्याची इच्छा नाहीं. बाबांच्या निर्दयपणाची पराकाष्ठा झाली. ह्या मेल्या दैवानें जें एकदा आरंभिलें तें शेवटास नेलें. मीच फुटक्या नशिबाची, तेथें दुसऱ्यास काय बोल लावायचा आहे? आतां मी काय करूं? कोणास शरण जाऊं?'

कामंदकी, मालती व लवंगिका ह्या तेथून गेल्या. आतां त्या स्थळीं माधव व मकरंद हे दोघेच राहिले. क्षणभर कोणी कोणाशीं कांहींच बोललें नाहीं. मालती जात असतां माधव तिच्याकडे बरेंच लांबपर्यंत पाहत होता. त्या वेळीं त्याच्या मनांत असे विचारतरंग येत होते, 'मालतीशीं सहवास झाला हा इतकाच! जें दैव आजपर्यंत मजबरोबर मित्राप्रमाणें वागलें, तेंच आतां मला शत्रूप्रमाणें गांजीत आहे. भगवतीचा मजवर अत्यंत लोभ म्हणून तिनें उगीच कांहींतरी माझें समाधान केलें. हर हर! माझा जन्म व्यर्थ गेला! आतां मी पुढें काय करूं....? बस्स! ठरलें! आतां स्मशानांत जाऊन ह्या देहाचा त्याग करतों. ह्याशिवाय दुसरा उपाय कांहीं सुचत नाहीं.' तो मकरंदाकडे पाहून म्हणाला, "गड्या, मदयंतिकेचें तुजवर फार प्रेम दिसतें आहे. तुलाही मदयंतिकेची उत्कंठा लागली आहे असें वाटतें." मकरंद उत्तर करतो, "हें काय विचारतोस? चल ऊठ, आपण ह्या संगमावर स्नान करावयास जाऊं." ह्यानंतर ते दोघे पद्मावतीजवळ वरदा व सिंधू ह्या नद्यांचा संगम आहे तिकडे गेले.

## वि भा ग

## ति स रा

मालतीच्या लग्नसमारंभाची तयारी झाली पण आदल्या रात्रीं एक अकल्पित विघ्न उपस्थित झालें.

पद्मावती नगरीच्या दक्षिणेस नदीच्या तीराजवळ स्मशान होतें. त्या स्मशानांत एक जुनें देवीचें देऊळ होतें. त्यांत अघोरघण्ट नामक एक

शिवोपासक राहत असे. ह्या देवीला मानवांचे बळी फार आवडतात अशी अघोरघण्टाची श्रद्धा होती. आपणांस अमृतसिद्धि प्राप्त व्हावी म्हणून त्यानें एका सुंदर व गुणी कन्येचा बळी देण्याचें ठरविलें. हें कन्यारत्न शोधून आणण्याचें काम त्यानें आपल्या कपालकुण्डला नामक प्रिय शिष्यिणीकडे सोपविलें. कपालकुण्डलेनें बरेंच मंत्रसामर्थ्य प्राप्त करून घेतलें होतें. ती भीषण वेष धारण करून मुलीचा शोध करीत करीत आकाशांतून उडत उडत मालतीच्या वाड्यापाशीं आली. मध्यरात्रीची वेळ. मालती आपल्या सख्यांसह गच्चीवर झोपली होती. कपालकुण्डलेनें मालतीला अलगद उचललें आणि स्मशानांत नेलें. तेथें अघोरघण्टानें तिला बळी देण्यासाठीं देवीच्या पुढें उभें केलें; तेव्हां ती जागी झाली. आपण कोठें आहोंत हें तिला कांहींच उमगेना! कपालकुण्डलेनें मालतीच्या कपाळावर कुंकवाचा मळवट भरला आणि तिच्या अंगावर लाल फुलांच्या माळा घालून ती म्हणाली, " मुली, तूं आपल्या प्रियजनांचें स्मरण कर आणि मरणास तयार हो. "

तें दृश्य पाहून मालती मनांत चरकली. लांडग्यापुढें हरिणी उभी राहावी, तशी ती उभी राहिली आणि केविलवाण्या मुद्रेनें किंकाळी फोडून उद्गारली,

" हा ताता, निर्दया, तूं जिच्या योगानें राजाची कृपा संपादणार त्या तुझ्या कन्येची काय दशा होत आहे पाहा. अरेरे! आई, तुझें हृदय केवळ प्रेममय आहे. ह्या दुर्दैवानें तुझाही कसा घात केला? हा भगवति कामंदकी, मालती म्हणजे केवळ तुमचे प्राण. तिचें कल्याण करण्यासाठीं तुम्ही सतत झटलां. वृद्धपणीं मी तुमच्या दु:खास कारण झालें ना? हा प्रियसखी लवंगिके, आतां तुझी माझी स्वप्नांतच भेट. हे प्राणनाथा माधवा, मी परलोकीं गेलें तरी तूं मालतीला विसरूं नको हो! ज्या माणसाची प्रियजन आठवण ठेवतात, तो खरोखर मृत नसून जिवंतच असतो. " §

§ न खलु स उपरतो यस्य वल्लभो जनः स्मरति।

कर्मधर्मसंयोग असा कीं त्या रात्रीं माधव निराशेच्या भरांत कोणालाही न कळवितां घरांतून बाहेर पडला आणि हिंडत हिंडत स्मशानाकडे आला; तों मालतीचे करुणोद्गार अकस्मात् त्याच्या कानीं पडले. तो तेथेंच थबकला व कानोसा घेऊं लागला, तेव्हां पुढील शब्द त्याला ऐकूं आले. कपालकुण्डला म्हणाली, "अरेरे, ह्या बापड्या पोरीचें मन माधवाकडे ओढ घेत आहे."

कपालकुण्डलेचें हृदय कसें झालें तरी स्त्रीचें! अघोरघण्ट म्हणाला, "तें कांहीं असो. मी आतां हिला देवीला अर्पण करतों."

इतकें बोलून अघोरघण्ट मालतीवर शस्त्राचा वार करणार तोंच ....

"अरे दुष्टा चांडाळा, हात आवर. पुढें येशील तर मेलास म्हणून समज." असें त्वेषानें ओरडत माधव त्याच्यापुढें उभा राहिला. माधवास पाहून मालतीनें त्याच्या गळ्यास घट्ट मिठी मारली, तेव्हां अघोरघण्ट स्तिमित होऊन तारस्वरानें म्हणाला, "अरे कोण रे हा पापी, आम्हांला विघ्न करावयास आला आहे?"

इतक्यांत जवळच मोठा गलबला ऐकूं आला.

"अहो, मालतीचा शोध करणारे सैनिक हो, उगीच इकडे तिकडे वेड्यासारखे धावूं नका. जिची प्रतिज्ञा कधींही खोटी झाली नाहीं आणि जिनें भूरिवसु अमात्यास पूर्ण आश्वासन दिलें आहे, ती कामंदकी तुम्हांस आज्ञा करते कीं अघोरघण्टानें मालतीला बळी देण्यासाठीं कराला देवीच्या देवळांत नेलें आहे; तरी हें देऊळ आधीं बंद करा पाहूं."

कामंदकीच्या आज्ञेप्रमाणें सैनिकांनीं देवळाचीं दारें बंद केलीं. तेव्हां "आतां मालतीला तिच्या बांधवजनांच्या स्वाधीन करून ह्या दुरात्म्याला ठार करतों;" असें म्हणून माधवानें अघोरघण्टाचे तिळा तिळाएवढे तुकडे केले.

राहूच्या मुखांतून शशिकला मुक्त व्हावी किंवा व्याघ्राच्या तावडींतून हरिणीची सुटका व्हावी, त्याप्रमाणें मालती संकटांतून मुक्त झाली.

सर्वांचा जीव भांड्यांत पडला. मंगलकार्यांतलें मोठेंच विघ्न टळलें. सैनिक मालतीला घेऊन घरीं गेले.

दुसऱ्या दिवशींच लग्नाचा मुहूर्त धरला होता. सकाळपासून विवाह-पूर्वविधि सुरू झाले. मालती हत्तिणीवर बसून मोठ्या परिवारासह वाजत गाजत ग्रामदेवतेच्या दर्शनास निघाली. मेघगर्जनेसारखा मृदंगध्वनि होऊं लागला. अंबारीला बांधलेलीं केळीचीं पानें पताकांसारखीं फडफडूं लागलीं. शेकडों श्वेतछत्रें आकाशरूपी सरोवरांत श्वेतकमलासारखीं शोभूं लागलीं. सहस्रावधि पांढऱ्या चवऱ्यांकडे पाहून असें वाटूं लागलें कीं हे राजहंस पक्षी अंतरिक्षांत भराऱ्या मारीत आहेत. भालदार चोपदार सोन्यारुप्याचे दंड हातांत घेऊन चालले होते. सर्वांचे डोळे मालतीकडे लागले होते; पण मालतीच्या मनांत काय चाललें असावें हें तिच्या निस्तेज मुद्रेवर स्पष्ट दिसत होतें.

'आतां मरण येईल तर बरें. एकदाची ह्या यातनांतून सुटेन तरी; पण मरणाला देखील काय उपाय करावा हें मला सुचत नाहीं. मजसारखे जे हतभागी लोक असतात, त्यांनीं मरणाची इच्छा केली तरीसुद्धा ती सफल होत नाहीं. बाकी ती सफल होत नाहीं हेंच योग्य होय. कारण हतभागी लोकांची इच्छा फलद्रूप झाली तर मग ते हतभागी कसले?'

अशा प्रकारचे विचारतरंग मालतीच्या हृदयांत उसळत होते.

देवीच्या देवळाजवळ मिरवणूक आली. मालती हत्तिणीवरून खालीं उतरली. तेव्हां "हें पाहा देवळाचें द्वार. चल आपण आंत जाऊं." असें म्हणून लवंगिका तिला आंत घेऊन गेली. ह्याच वेळीं माधव व मकरंद हे दोघेजण कामंदकीच्या सांगण्यावरून देवळाच्या गाभाऱ्यांत गुप्तपणें येऊन बसले होते. ते खांबाच्या आड उभे राहून मालती व लवंगिका ह्यांचें संभाषण कान देऊन ऐकूं लागले. गाभाऱ्यांत जवळजवळ अंधारच होता.

**लवंगिका :** सखे, हें बघ उटी लावायचें केशरी गंध आणि ह्या बघ फुलांच्या माळा.

**मालती :** सखे, आतां कशाला तें गंध नि त्या माळा!

**लवंगिका :** असें काय बरें बोलतेस? तुझें कल्याण व्हावें म्हणूनच तुझ्या मातेनें देवीची पूजा करण्यासाठीं तुला येथें पाठविलें आहे.

**मालती :** अग, अगोदरच माझें हृदय दु:खानें जळत आहे. त्यांत आणखी अशा मर्मभेदक शब्दांनीं उगाच माझ्या दु:खावर डागण्या कां देतेस?

**लवंगिका :** बोल. तुझें म्हणणें तरी काय आहे?

**मालती :** गडे लवंगिके, तूं मला बहिणीसारखी आहेस. तुझ्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. आजवर तूं मजवर असंख्य उपकार केले आहेस. आज मी तुला शेवटची विनवणी करणार आहें. तिला तूं मान दिलास म्हणजे माझ्यावर तुझे अगणित उपकार होतील. मी आतां मरणाच्या दाराशीं येऊन ठेपलें आहें, म्हणून तूंच आतां प्रिय माधवाचें मुखारविंद माझ्याकरितां पोटभर पाहून घे, एवढेंच आतां माझें तुजपाशीं मागणें आहे. मीं परलोकास गेल्याची वार्ता ऐकून माधव दु:खानें कोठेंतरी निघून जाणार नाहीं असें कर."

**लवंगिका :** सखे, हें तूं काय अमंगल बोलतेस? इडा पिडा टळो आणि अमंगळ जळो. माझ्या प्रिय सखीला देव उदंड आयुष्य देवो.

**मालती :** सखे, माधवाची सेवा करायला मिळत नाहीं, तर मला जिवंत राहून तरी काय करावयाचें आहे? माधवाची प्राप्ति होईल अशी तुम्हीं गोडगोड भाषणें करून माझ्या मनांत आशा उत्पन्न केलीत आणि आज हे असले सोहाळे माझ्या नशिबीं आले. ह्या देहावर दुसऱ्याची सत्ता, त्यामुळें मला प्रिय माधवाची सेवा करायला मिळत नाहीं. ह्या पापाचें परिमार्जन करण्यासाठीं मीं असा निश्चय केला आहे कीं माधवाच्या गुणांचें स्मरण करीत करीत प्राणत्याग करावा. तूं माझी खरीखुरी प्रिय सखी असशील तर ह्या माझ्या निश्चयाच्या आड येऊं नकोस.

एवढें बोलून मालती लवंगिकेचे पाय धरण्यास खालीं वाकली.

मालतीला खालीं वाकलेली पाहतांच लवंगिकेनें चटकन माधवाला खुणेनें बोलाविलें. लवंगिका देवळांत शिरतांना कामंदकीनें तिच्या कानांत गुजगोष्ट सांगितली होती ती हीच.

माधवाला काय करावें हें सुचेना. तेव्हां 'पुढें हो' असें मकरंदानें त्यास हळूच सुचविलें. माधव गुपचुप येऊन लवंगिकेच्या जागीं उभा राहिला.

मालती माधवास लवंगिका समजून म्हणाली, "सखे, माझ्यावर एवढी दया कर. मला मरण्याला अनुज्ञा दे."

**माधव :** गे सखी, असें साहस करूं नको.

**मालती :** मला नुसतें तुझ्या पायांसुद्धा पडूं देत नाहींस?

**माधव :** (हर्षानें) तुझ्या वियोगाचें मला फार दुःख होत आहे.

**मालती :** सखे, ह्या मालतीचें निरंतर स्मरण ठेव. मला जिवाहून प्रिय असलेला हा बकुलपुष्पांचा हार मी तुझ्याजवळ देतें. हा माधवानें आपल्या हातांनीं गुंफलेला आहे. हा तूं नेहमीं आपल्या गळ्यांत बाळगीत जा. मालतीची जशी तूं चिंता वाहत होतीस तशीच ह्या हाराचीही वाहत जा.

ह्या प्रकारें विनवणी करून मालतीनें आपल्या गळ्यांतला हार काढला आणि तो माधवाच्या गळ्यांत घालीत असतां ती चपापली व लाजून मागें सरकली.

'अगबाई! लवंगिकेनें मला फसविलें.' असें मालती स्वतःशींच पुटपुटली.

**माधव :** आपलें दुःख मात्र तूं सांगतेस पण दुसऱ्याचें दुःख मात्र तूं जाणत नाहींस हें काय बरें?

आपण ह्या वेळीं पुढें झालें पाहिजे असा विचार करून लवंगिका त्यांच्या समीप येऊन उभी राहिली आणि म्हणाली, "गडे मालती, मीं

कांहीं तुझी थट्टा केली नाहीं; ज्यानें करायची त्यानेंच केली. मग मला बाई उगीच कां बोल लावतेस ?"

लवंगिकेचें बोलणें पुरें होतें न होतें तोंच कामंदकी तेथें आली आणि मालतीकडे पाहून म्हणाली, "बाळ, तूं गोंधळल्यासारखी कां दिसतेस?" ह्यावर लवंगिकेनें विनोदपूर्ण आणि समयोचित असें उत्तर दिलें,

"भगवति, काळोख्या रात्रीं स्मशानांत निर्भयपणें संचार करून त्या मेल्या अघोरघण्टाला ज्यानें नाहींसा केला, त्या ह्या साहसी माधवाला पाहून मालती भयानें कांपूं लागली ह्यांत नवल तें काय?" हें ऐकून कामंदकी माधवाकडे पाहून म्हणाली, "वत्सा माधवा, अमात्य भूरिवसूचें हें कन्यारत्न मी तुला देत आहें. तुल्य गुणांचा संयोग घडवून आणण्यासाठीं ब्रह्मदेवसुद्धा उत्सुक असतो. तुला ह्या वेळीं मला एवढीच प्रार्थना करावयाची आहे कीं आपल्यावरील हिचें प्रेम किती आहे हें जाणून तूं हिला अंतर देऊं नकोस."

माधवानें उत्तर केलें, "मला आपली आज्ञा शिरसावंद्य आहे."

मग मालती व माधव ह्या उभयतांस उद्देशून कामंदकी म्हणाली, "पतिपत्नी परस्परांचे प्रियमित्र असतात. पति हा स्त्रीचें जीवितसर्वस्व होय. पतिपत्नी ह्या नात्यांत सर्व नातीं सामावलेलीं आहेत. पत्नीनें पतीला आणि पतीनें पत्नीला अमूल्य ठेवा आहे असें समजावें. किंबहुना पत्नीनें पतीला आणि पतीनें पत्नीला स्वतःचा प्राणच आहे असें मानावें. वत्सांनो, हें ध्यानांत धरा. §"

आम्ही आपल्या उपदेशाप्रमाणें वागूं असें मालती-माधवांनीं कामंदकीला आश्वासन दिलें.

ह्याच वेळीं एक द्वारपालिका वस्त्रालंकारांची पेटी घेऊन आंत आली आणि कामंदकीपुढें ठेवून निघून गेली.

---

§ प्रेयो मित्रं बंधुता वा समग्रा । सर्वे कामाः शेवधिर्जीवितं वा ॥
स्त्रीणां भर्ता धर्मदाराश्च पुंसाम् । इत्यन्योन्यं वत्सयोर्ज्ञातमस्तु ॥

कामंदकीनें ती पेटी उघडून तिच्यांतील अलंकार मकरंदापुढें ठेवीत म्हटलें, " मकरंदा, देवीच्यापुढें मालतीला घालण्याकरितां आणलेला हा साज तूंच आपल्या अंगावर घाल आणि मीं सांगितल्याप्रमाणें कर. "

" भगवति, आपली आज्ञा. " असें म्हणून जरा बाजूस होऊन मकरंदानें ते वस्त्रालंकार आपल्या अंगावर घातले आणि सर्वांच्या पुढें येऊन तो हसून म्हणाला, " मी आतां मालती झालों पाहा. " तेव्हां सर्वांनाच हसूं कोसळलें आणि ते त्याच्याकडे कौतुकानें पाहूं लागले. माधव थट्टेनें म्हणाला, " ह्या नंदनाचें भाग्य मोठें समजलें पाहिजे. नाहींतर अशी सुंदर बायको त्याला कोठून मिळायला ? "

ह्यानंतर कामंदकी मालती आणि माधव ह्यांना म्हणाली, " तुम्ही दोघेंही आतां ह्या समोरच्या झाडींतून पलीकडे आमचा मठ आहे तिकडे जा. मठांतल्या उद्यानांत अवलोकितेनें विवाहाचें सर्व साहित्य सिद्ध करून ठेवलें आहे. तेथें तुम्ही पुढील विवाहविधि उरकून टाका. मात्र मकरंद व मदयंतिका तिकडे येईपर्यंत तेथेंच बसा. "

कल्याणाची वेळ आली म्हणजे उत्तरोत्तर कल्याणच होऊं लागतें. § असे आनंदोद्गार माधवाच्या मुखांतून बाहेर पडले आणि मालती व माधव चोरवाटेनें निघून कामंदकीच्या मठाकडे निघून गेलीं.

त्यानंतर " वत्सा मकरंदा, वत्से लवंगिके, चला आपण येथून जाऊं. " असें म्हणून कामंदकी त्यांना घेऊन इष्ट स्थळाकडे मार्गस्थ झाली.

---

§ कल्याणावतंसा हि कल्याणसंपदुपरिष्टाद्भवति ।

## चौ था

मालतीचा वेष घेतलेला मकरंद हत्तिणीवर बसला आणि वाजतगाजत भूरिवसूच्या वाड्यांत आला. त्यानें आपल्या तोंडावर अवगुंठन घेतलें होतें. त्यानें आपली भूमिका इतकी उत्कृष्ट वठविली कीं ही मालती नाहीं असा कोणच्याही मनांत काडीमात्र संशय आला नाहीं. नंदनानें ती मालतीच आहे असें समजून त्याचें पाणिग्रहण केलें.

कामंदकी तेथें होतीच. केवढें हें तिचें घटनाचातुर्य ! लग्नविधि आटोपल्यावर ती नंदनाचा निरोप घेऊन आपल्या मठाकडे परत आली.

त्याच दिवशीं सायंकाळीं नवऱ्या-मुलीचा गृहप्रवेशाचा समारंभ होणार होता. पण नंदन पडला उतावळा ! तो मकरंदाच्या पायां पडून आणि लघळपणा करून त्याची मनधरणी करूं लागला. तेव्हां मकरंदानें रागावलेंसें करून त्याला लाथ मारिली ; तेव्हां तो खालीं पडला. बिचाऱ्याचा अगदीं हिरमोड होऊन गेला. रागाच्या भरांत त्यानें शपथ वाहिली, " जा, मी तुझें मुखावलोकनही करणार नाहीं ; तुझें माधवावर प्रेम आहे. " एवढें म्हणून तो पाय आपटीत घरांतून निघून गेला.

नंदनाची बहीण मदयंतिका हिच्या कानांवर ही वार्ता गेली. तेव्हां " काय ? माझ्या दादाला ही दांडगी पोर झिडकारते ? थांब, मीच तिची चांगली कानउघाडणी करतें. " असें म्हणून मदयंतिका बुद्धरक्षितेला बरोबर घेऊन फणकाऱ्यानें मकरंदाच्या अंतःपुरांत आली. त्या वेळीं मकरंदानें तोंडावर पांघरूण घेऊन झोपेचें सोंग केलें होतें आणि लवंगिका त्याच्या जवळच उभी होती.

**मदयंतिका :** लवंगिके, पाहा बरें तुझ्या सखीला झोप लागली आहे कीं काय ती ?

**लवंगिका :** होय, लागली आहे. आतांपर्यंत रागानें विचारी तळमळत होती; आतांच कोठें तिचा अंमळ डोळा लागला आहे. आपण मोठ्यानें बोलूं नये.

**मदयंतिका :** ह्या हट्टी मुलीला एवढें रागवायला काय बरें झालें ? हिनें आपल्या पतीचा अपमान केला हें चांगलें नाहीं.

**लवंगिका :** मलाही बाई समजत नाहीं. आपल्या भावासारखा प्रेमळ नि गोड बोलणारा नवरा मिळाल्यावर हिला रागवायला काय झालें कोणास ठाऊक ?

**मदयंतिका :** बुद्धरक्षिते, पाहिलेंस ना ? ही लवंगिका उलट आम्हांलाच लावून बोलते आहे !

**बुद्धरक्षिता :** कोणाला ठाऊक उलटें बोलते आहे कीं सुलटें बोलते आहे ती !

**मदयंतिका :** असें ग काय तूंही बोलतेस ?

**बुद्धरक्षिता :** अग नवरा पायां पडला असतांही मालतीनें त्याचा मान ठेवला नाहीं हें खरें; पण ह्या बाबतींत तिला दोष लावतां येत नाहीं. तिनें लज्जेमुळें तसें केलें असावें. पण तेवढ्याकरितां तुमच्या दादानें तिच्यावर आग पाखडावी हें त्याला मुळींच शोभत नाहीं.

**लवंगिका :** ( डोळ्यांत पाणी आणून ) बाई बाई ! तुमच्या घरची रीत मुलखावेगळीच दिसते आहे. 'तुझें घराणें वाईट आहे' असें मालतीला बोलणें तुमच्या भावाला शोभलें का ? असले कठोर शब्द कुलीन मुलीच्या हृदयांत मरेपर्यंत सलत राहतात आणि त्यामुळें त्यांचीं मनें विटतात. पोटीं पोरगी नको † असें म्हणतात तें ह्यामुळेंच.

**मदयंतिका :** पण मी थोडेंसें बोलूं का ? माझा भाऊ बोलूं नये तें बोलला हें खरें. तो द्वाड आहे; पण ज्या अर्थी तो आतां मालतीचा नवरा

† स्त्रीणां जन्मलाभं जुगुप्सन्ते बांधवाः ।

झाला आहे, त्या अर्थी आतां तिला त्याच्या मनाप्रमाणें वागणें प्राप्त आहे. दुसरें असें कीं तो जे कडक शब्द बोलला त्याचें कारणही तुम्हांला ठाऊक नाहीं असें नाहीं. मालतीचें माधवावर पराकाष्ठेचें प्रेम जडलें आहे असा जो सर्व गांवांत गवगवा झाला आहे, त्याचेंच हें फळ, समजलीस ?

**लवंगिका :** अग जा, बाजारगप्पांवर भरंवसा ठेवून तूं भलतें सलतें वडवडतेस ?

**मदयंतिका :** लवंगिके, अशी रागावूं नकोस. त्या दिवशीं मदनोद्यानांत आपली सर्वांची गांठ पडली, तेव्हां महाराजांनीं मालती माझ्या दादाला दिल्याचें वर्तमान आपण ऐकलें. त्या वेळीं विस्तवानें फुलें मलूल व्हावींत तशीं मालती आणि माधव ह्यांचीं तोंडें होऊन गेलेलीं मीं स्वतः पाहिलीं नाहींत का ? मला आणखी पण एक गोष्ट आठवली.

**लवंगिका :** आणखी काय बाई ? ऐकूं दे तरी आम्हांला.

**मदयंतिका :** ( लाजून ) ज्यानें आपला जीव धोक्यांत घालून मला वाघाच्या दाढेंतून वांचविलें, तो महाभाग तुला नाहीं का आठवत ? ( हे शब्द उच्चारतांच मदयंतिकेच्या अंगावर रोमांच उभे राहिले. )

**बुद्धरक्षिता व लवंगिका :** हं हं, मकरंद का ?

**बुद्धरक्षिता :** मदयंतिके, आमचा विश्वासभंग करणार नाहींस असें वचन देत असशील, तर मी तुला कांहीं गुप्त गोष्ट सांगतें. सांगूं का ?

**मदयंतिका :** सखे, मी तुमच्या सांगण्याबाहेर कधीं गेलें आहे का ? सांग काय सांगणार आहेस तें. कसलाच किंतु मनांत बाळगूं नकोस.

**बुद्धरक्षिता :** तुझा तो हृदयवल्लभ मकरंद तुझ्या आतां दृष्टीस पडला तर तूं काय करशील ?

**मदयंतिका :** काय करीन ? त्याच्याकडे सारखी दृष्टि लावून डोळ्यांचें पारणें फेडीन ; पण सखे, उगाच कां मनाला आशा लावतेस ?

**बुद्धरक्षिता :** बरें, पण त्यानें तुला आपली सहधर्मचारिणी केली तर तूं काय करशील ?

**मदयंतिका :** सखे, त्या महाभागानें वाघापासून जिंकून घेतलेल्या ह्या देहाची सत्ता मजकडे काय राहिली आहे ? मीं तेव्हांच त्याला आपला देह व मन हीं देऊन टाकलीं आहेत.

**लवंगिका :** धन्य आहे तुझी. आपल्या मोठेपणास उचित असेंच तूं बोललीस !

**बुद्धरक्षिता :** पण सखे, हे शब्द नीट ध्यानांत ठेव, नाहींतर मग बदलशील बघ.

मकरंद हें सर्व संभाषण लक्षपूर्वक ऐकत होता. त्यानें आपल्या तोंडावरचें पांघरूण फेकून दिलें आणि ताडकन् उठून त्यानें मदयंतिकेचा हात धरला.

मदयंतिकेला वाटलें कीं मालतीची झोप पुरी होऊन ती जागी झाली आहे. म्हणून ती म्हणाली, “ सखे मालती, तुझी झोप पुरी झाली ना ? ” पण जरा न्याहाळून पाहिल्यावर तिला आपली चूक कळून आली. “ अगबाई, हें काय ? ” असे शब्द तिच्या तोंडून एकदम बाहेर पडले.

मकरंदाकडे पाहून बुद्धरक्षिता म्हणाली, “ मकरंदा, ही मदयंतिका आधींच आपला देह तुला अर्पण करून चुकली आहे. ”

मदयंतिका गोंधळल्यासारखी झाली. तें पाहून बुद्धरक्षिता म्हणाली, “ सखे मदयंतिके, चल, मालती जाऊन बसली आहे तिकडे आपण सारीं जाऊं. ”

मदयंतिकेनें उत्तर केलें, “ काय ? मालती गेली ? तिनें देखील असलें साहस केलें ? ”

**बुद्धरक्षिता :** तर काय, ती केव्हांच गेली !

असें म्हणून लवंगिका, मदयंतिका व मकरंद ह्यांना घेऊन बुद्धरक्षिता चोरदरवाजानें बाहेर पडली आणि कामंदकीच्या मठाकडे निघाली. वाटेंत

मकरंद मनाशीं म्हणतो, 'मी आज कृतार्थ झालों, माझ्या भाग्याला आतां सीमा नाहीं.'

मध्यरात्रीचा समय. दिवस चांदण्याचे. सर्वत्र सामसूम. रस्त्यांतून चिटपांखरूंही फिरकत नव्हतें. हळुहळू जाणाऱ्या ह्या मंडळींना नगररक्षकांनीं वाटेंत हटकलें; पण योगायोग असा कीं त्यांना तेथें कलहंस अवचित भेटला. तो माधवाच्या आज्ञेवरून नंदनाच्या घरची बातमी काढण्यासाठीं इकडे येत होता. मकरंदानें कलहंसाबरोबरच मदयंतिका, बुद्धरक्षिता व लवंगिका ह्यांना कामंदकीच्या मठाकडे पाठवून दिलें आणि तो स्वतः एकटाच रक्षकांशीं दोन हात करूं लागला.

इकडे मालती व माधव कलहंसाच्या आगमनाची उत्कंठेनें वाट पाहत असतां त्यांना पावलांचा आवाज ऐकूं आला.

थोड्या वेळांत कलहंस, मदयंतिका, बुद्धरक्षिता व लवंगिका त्यांच्यापुढें गडबडीनें येऊन उभीं राहिलीं. तेव्हां सर्वांस हर्ष झाला; पण मकरंद व रक्षक ह्यांची मारामारी चालल्याचा वृत्तान्त जेव्हां त्यांनीं कलहंसाकडून ऐकला, तेव्हां हर्ष मावळून त्याचें स्थान विषादानें घेतलें. माधव सर्वांना धीर देऊन म्हणाला, "तुम्ही अगदीं खेद करूं नका. मकरंद जरी एकटा असला आणि पुष्कळांनीं त्याला घेरलें असलें, तरी तो सर्वांना पुरून उरण्यासारखा आहे. सिंह जरी एकटा असला तरी तो मदोन्मत्त हत्तींचीं गंडस्थळें फोडून टाकतो. जणूं तीं त्याला मडक्यासारखीं वाटतात. त्याला साहाय्य कोणाचें असेल तर तें त्याच्या प्रखर नखांचेंच. माझा प्रिय मित्र तसाच शूर व पराक्रमी आहे. तरीपण मला त्याच्याकडे गेल्याशिवाय राहवत नाहीं. असें म्हणून माधव कलहंसाला घेऊन ज्या ठिकाणीं मकरंद रक्षकांशीं झगडत होता त्या ठिकाणीं त्वरेनें गेला. माधवानें प्रथम शिपायांच्या हातांतील आयुधें हिसकावून घेतलीं आणि त्याच आयुधांनीं तो त्यांना झोडपूं लागला. तेव्हां सर्व रक्षक पळून जाऊं लागले.

राजाच्या कानांवर ही गडबड गेली आणि तो प्रासादाच्या सौधावर येऊन त्या दोन वीरांचा अद्भुत पराक्रम पाहूं लागला. त्यानें आपले चोपदार पाठवून तत्काल मारामारी बंद करविली आणि माधव व मकरंद ह्यांना आंत बोलावून घेतलें. ते कोण, कोठले ह्याची त्यानें विचारपूस केली आणि त्यांना गौरवपूर्वक पारितोषिकें दिलीं.

हा प्रकार पाहून नंदन आणि भूरिवसु रागानें लाल झाले. तेव्हां राजा त्यांची समजूत करून म्हणाला, "प्रधानजी, असले हे कुलीन, गुणवान व पराक्रमी जामात तुम्हांस मिळत आहेत, ह्यामुळें तुम्हांस वास्तविक मोठा संतोष व्हावा असें आम्हांस वाटतें. ह्या दोघांनीं स्वपराक्रमानें संकटांतून मुक्त केलेल्या मुलींशीं विवाह करण्यास तुम्हीं अनुमति द्यावी." इतकें बोलून राजा अंत:पुराकडे गेला.

राजाचें मधुर भाषण ऐकून माधव व मकरंद ह्यांना जितका आनंद तितकाच विस्मय वाटला. आपण वस्तुतः अपराधी असतांही राजानें आपणांवर कृपा केली ह्यावरून तो किती सज्जन व गुणग्राहक आहे ह्याविषयीं त्यांची खात्री झाली. नंतर ते दोघे कामंदकीच्या मठाकडे जावयास निघाले. आपण तिकडे येत आहों असें वर्तमान भगवती कामंदकीस कळविण्यासाठीं त्यांनीं कलहंसास अगोदरच पुढें धाडून दिलें होतें.

माधव आणि मकरंद ह्यांना संकटांतून मुक्त झाल्यानें हर्ष झाला पण तिकडे कामंदकीच्या मठांत दैवानें मालतीपुढें काय वाढून ठेवलें होतें ह्याची त्यांना काय कल्पना! मालतीकरितां ज्यानें आपल्या अघोरघण्ट गुरूचा निर्दयपणानें वध केला, त्या माधवाचा सूड घ्यावयाची संधि केव्हां एकदा सापडेल ह्यासाठीं कपालकुण्डला टपून बसली होती.

अवलोकिता, बुद्धरक्षिता, मदयंतिका व लवंगिका कांहीं कामानिमित्त बाहेर गेल्या आहेत आणि मालती एकटीच मठामध्यें आहे ही संधि साधून

मकरंद मनाशीं म्हणतो, 'मी आज कृतार्थ झालों, माझ्या भाग्याला आतां सीमा नाहीं.'

मध्यरात्रीचा समय. दिवस चांदण्याचे. सर्वत्र सामसूम. रस्त्यांतून चिटपांखरूही फिरकत नव्हतें. हळुहळू जाणाऱ्या ह्या मंडळींना नगररक्षकांनीं वाटेंत हटकलें; पण योगायोग असा कीं त्यांना तेथें कलहंस अवचित भेटला. तो माधवाच्या आज्ञेवरून नंदनाच्या घरची बातमी काढण्यासाठीं इकडे येत होता. मकरंदानें कलहंसाबरोबरच मदयंतिका, बुद्धरक्षिता व लवंगिका ह्यांना कामंदकीच्या मठाकडे पाठवून दिलें आणि तो स्वतः एकटाच रक्षकांशीं दोन हात करूं लागला.

इकडे मालती व माधव कलहंसाच्या आगमनाची उत्कंठेनें वाट पाहत असतां त्यांना पावलांचा आवाज ऐकूं आला.

थोड्या वेळांत कलहंस, मदयंतिका, बुद्धरक्षिता व लवंगिका त्यांच्यापुढें गडबडीनें येऊन उभीं राहिलीं. तेव्हां सर्वांस हर्ष झाला; पण मकरंद व रक्षक ह्यांची मारामारी चालल्याचा वृत्तान्त जेव्हां त्यांनीं कलहंसाकडून ऐकला, तेव्हां हर्ष मावळून त्याचें स्थान विषादानें घेतलें. माधव सर्वांना धीर देऊन म्हणाला, "तुम्ही अगदीं खेद करूं नका. मकरंद जरी एकटा असला आणि पुष्कळांनीं त्याला घेरलें असलें, तरी तो सर्वांना पुरून उरण्यासारखा आहे. सिंह जरी एकटा असला तरी तो मदोन्मत्त हत्तींचीं गंडस्थळें फोडून टाकतो. जणूं तीं त्याला मडक्यासारखीं वाटतात. त्याला साहाय्य कोणाचें असेल तर तें त्याच्या प्रखर नखांचेंच. माझा प्रिय मित्र तसाच शूर व पराक्रमी आहे. तरीपण मला त्याच्याकडे गेल्याशिवाय राहवत नाहीं. असें म्हणून माधव कलहंसाला घेऊन ज्या ठिकाणीं मकरंद रक्षकांशीं झगडत होता त्या ठिकाणीं त्वरेनें गेला. माधवानें प्रथम शिपायांच्या हातांतील आयुधें हिसकावून घेतलीं आणि त्याच आयुधांनीं तो त्यांना झोडपूं लागला. तेव्हां सर्व रक्षक पळून जाऊं लागले.

राजाच्या कानांवर ही गडबड गेली आणि तो प्रासादाच्या सौधावर येऊन त्या दोन वीरांचा अद्भुत पराक्रम पाहूं लागला. त्यानें आपले चोपदार पाठवून तत्काल मारामारी बंद करविली आणि माधव व मकरंद ह्यांना आंत बोलावून घेतलें. ते कोण, कोठले ह्याची त्यानें विचारपूस केली आणि त्यांना गौरवपूर्वक पारितोषिकें दिलीं.

हा प्रकार पाहून नंदन आणि भूरिवसु रागानें लाल झाले. तेव्हां राजा त्यांची समजूत करून म्हणाला, "प्रधानजी, असले हे कुलीन, गुणवान व पराक्रमी जामात तुम्हांस मिळत आहेत, ह्यामुळें तुम्हांस वास्तविक मोठा संतोष व्हावा असें आम्हांस वाटतें. ह्या दोघांनीं स्वपराक्रमानें संकटांतून मुक्त केलेल्या मुलींशीं विवाह करण्यास तुम्हीं अनुमति द्यावी." इतकें बोलून राजा अंत:पुराकडे गेला.

राजाचें मधुर भाषण ऐकून माधव व मकरंद ह्यांना जितका आनंद तितकाच विस्मय वाटला. आपण वस्तुत: अपराधी असतांही राजानें आपणांवर कृपा केली ह्यावरून तो किती सज्जन व गुणग्राहक आहे ह्याविषयीं त्यांची खात्री झाली. नंतर ते दोघे कामंदकीच्या मठाकडे जावयास निघाले. आपण तिकडे येत आहों असें वर्तमान भगवती कामंदकीस कळविण्यासाठीं त्यांनीं कलहंसास अगोदरच पुढें धाडून दिलें होतें.

माधव आणि मकरंद ह्यांना संकटांतून मुक्त झाल्यानें हर्ष झाला पण तिकडे कामंदकीच्या मठांत दैवानें मालतीपुढें काय वाढून ठेवलें होतें ह्याची त्यांना काय कल्पना! मालतीकरितां ज्यानें आपल्या अघोरघण्ट गुरूचा निर्दयपणानें वध केला, त्या माधवाचा सूड घ्यावयाची संधि केव्हां एकदा सापडेल ह्यासाठीं कपालकुण्डला टपून बसली होती.

अवलोकिता, बुद्धरक्षिता, मदयंतिका व लवंगिका कांहीं कामानिमित्त बाहेर गेल्या आहेत आणि मालती एकटीच मठामध्यें आहे ही संधि साधून

कपालकुण्डला तिच्यापुढें दत्त म्हणून उभी राहिली. मालती भयभीत होऊन ओरडूं लागली. पण कपालकुण्डलेस कोठली दयामाया! ती क्रोधानें म्हणाली, "कारटे, ओरड, ओरड, कोठें गेला तुझा तो कैवारी! मुलींना फसवून नेणारा माधव! थांब, उभी राहा. बहिरी ससाण्याची मादी जशी चिमणीस धरून नेते तशी मी तुला धरून नेऊन श्री पर्वतावर हाल हाल करून ठार मारतें." असें म्हणून तिनें मालतीला उचललें आणि आकाशांत उड्डाण केलें.

लवंगिका व मदयंतिका मठांत परत आल्या आणि पाहतात तों मालती नाहींशी झालेली. "अग मालती, अग मालती, कुठें आहेस तूं? किती हाका मारायच्या तुला? तूं ओ कां देत नाहींस?" अशा मोठमोठ्यानें हाका मारीत त्या तिला शोधीत फिरूं लागल्या. तों कलहंस तेथें आला. त्यानें त्यांच्यापुढें युद्धाचें रसभरित वर्णन करून माधव व मकरंद इकडे येत आहेत असें सांगितलें. कलहंसाचें बोलणें पुरें झालें असेल नसेल तोंच माधव व मकरंद तेथें येऊन थडकले.

"मालती कोठें आहे?" हाच त्या दोघांनीं मदयंतिका व लवंगिका ह्यांना पहिला प्रश्न केला. "आम्ही तिलाच शोधतों आहों." दोघी म्हणाल्या.

"अहो, काय तें खरें सांगा. प्रियसखी दृष्टीस न पडल्यामुळें माझा जीव कासावीस होत आहे. माझा डावा डोळा लवतो आहे. तिचें कांहीं बरें वाईट तर झालें नाहीं ना?" माधवानें घाबरटपणानें विचारिलें.

त्यावर मदयंतिकेनें उत्तर दिलें, "हे महानुभावा, आपण येथून निघून गेल्यावर मालतीनें बुद्धरक्षिता व अवलोकिता ह्या दोघींना कामंदकीस मारामारीचें वर्तमान कळविण्याकरितां पाठविलें; तसेंच तिनें 'आर्यपुत्रास सावधपणानें युद्ध करावयास सांग' असा निरोप देऊन लवंगिकेस आपणांकडे पाठविलें. लवंगिका अजून कां परत येत नाहीं असें म्हणून

मालती उतावीळपणें तिला पाहाण्यास बागेच्या फाटकाकडे गेली. मग मीही जरा वेळानें तिच्या मागोमाग गेलें; पण मालतीच कोठें दिसेना, म्हणून आम्ही तिला शोधूं लागलों, इतक्यांत तुम्ही दोघे आमच्या दृष्टीस पडलां."

हें ऐकून माधवाचें मन अत्यंत व्याकुळ झालें. "हा प्रिये मालती, सखी कोठें ग गेलीस? माझा अंत पाहूं नकोस." असे उद्गार त्यानें सुस्कारा टाकून काढले. त्यावर त्याला धीर देण्याच्या हेतूनें मकरंद म्हणतो, "मित्रा, पुरतेपणीं शोध केल्यावांचून शोक कां करतोस? मालती कदाचित् भगवती कामंदकीकडे गेली असेल; तर चल, आपण तिकडे जाऊं." असें म्हणून तो माधवाचा हात धरून तिकडे जाऊं लागला. जातांना त्याच्या मनांत कसले विचार चालले होते?

कामंदकीच्या बरोबर मालती असेल काय? का तिच्या जिवाचें बरें वाईट झालें असेल? छे:! इष्टमित्रापासून लाभणारें सौख्य हें विद्युल्लतेसारखें चंचल असतें, ही जगाची रीतच होय. §

थोड्याच वेळांत माधव आणि मकरंद कामंदकीच्या आश्रमालगत असलेल्या उद्यानापाशीं आले. तेव्हां सूर्य बराच वर आला होता. माधव अत्यंत श्रान्त व उद्विग्न झालेला पाहून मकरंद म्हणतो, "माधवा, दैवाप्रमाणें हा सूर्यही पीडा देऊं लागला आहे. म्हणून ह्या पद्म सरोवराच्या तीरीं आपण दोन घटका विसांवा घेऊं या. हीं पाहा कमळें कशीं प्रफुल्लित झालीं आहेत. तीं पाहा जाईजुईचीं फुलें पाण्यावर पडून त्यांचा कसा गालिचा बनला आहे. तिकडे मयूर कसे आनंदानें नृत्य करीत आहेत. तें तुला दिसलें का?" अशा प्रकारें सृष्टिसौंदर्याचें वर्णन करून आणि त्यायोगें माधवाचें मन तिकडे वेधवून घेऊन, त्याला मालतीचा क्षणभर विसर पडावा ह्यासाठीं मकरंद आपली पराकाष्ठा करीत होता; पण माधवाचें

§ प्रायेण बान्धवसुहृत्प्रियसंगमादि। सौदामिनीस्फुरणचञ्चलमेव सौख्यम् ॥

त्याच्याकडे लक्ष कोठें होतें! तो अगदीं भ्रमिष्टासारखा झाला होता. पुष्कळ वेळानें तो म्हणतो, "मित्रा, आतां ह्या भूमीची रमणीयता मला मुळींच पाहवत नाहीं. असें कां होतें कोण जाणें?"

आपल्या मित्राची आतां फार कठीण अवस्था होऊं लागली आहे ही गोष्ट मकरंदास कळून चुकली. काय करावें हें त्यास न सुचून त्यानें दीर्घ सुस्कारा मात्र टाकला आणि माधवाकडे वळून पाहिलें तों त्यास मूर्च्छा आलेली. मकरन्दानें त्याच्या अंगास स्पर्श केला. सुदैवानें त्या वेळीं नवमेघांनीं थोडीशी जलवृष्टि केली, त्यामुळें माधव अर्धामुर्धा सावध झाला आणि म्हणाला, "माझ्या प्रियेकडे निरोप घेऊन जाण्याला हा मेघ चांगला आहे."

इतक्यांत मेघगर्जना झाली. ती ऐकून हा मेघ आपणांस होय म्हणून प्रत्युत्तर देत आहे असें माधवास वाटलें. तो म्हणाला, "हा पाहा मेघ माझ्या प्रियेकडे निरोप घेऊन निघाला देखील. तर आपण आतां दुसरीकडे जावें आणि कोणाला तरी तिची वार्ता पुसावी. माझ्या बोलण्याकडे लक्ष द्या असें तो वन्य पशूंना विनवूं लागला; पण जो तो आपल्याच कामांत मग्न. आपणांकडे कोणीच पाहत नाहीं असें जेव्हां त्यास आढळलें तेव्हां तो उद्गारतो, "हर हर! मी किती वेडा! बोलून चालून हे पशु. हे मला काय उत्तर देणार! मकरंदासारख्या रसिक मित्राशीं ज्या गोष्टी बोलावयाच्या त्या मी ह्यांच्याशीं काय बोलतों आहें! मित्रा मकरंदा, तूं तरी मला भेट." असें बोलत असतां तो पुनश्च मूर्च्छित झाला.

मकरंद म्हणाला, "मी जवळ नाहीं असेंच समजून हा मला हाका मारीत आहे. शिव! शिव! माझ्या भेटीला उत्सुक झाला, तोंच निश्चेष्ट पडला. आतां कांहीं हा जिवंत हातीं लागत नाहीं. अरेरे! ज्याला मी भीत होतों तेंच झालें. हे हतभागी मकरंदा, माधवाचें मरण पाहावें म्हणूनच तूं अद्याप जिवंत राहिलास काय? आतां तुला तरी जगून काय करावयाचें

आहे ? ह्या पर्वताच्या कड्यावरून खालीं नदींत उडी टाकून मित्राच्या अगोदरच परलोकाच्या मार्गास लागावें, हेंच बरें. माधवा, तुझा असा शेवट व्हावा ना ? पौर्णिमेचा चंद्र उदयास येतांच राहूच्या मुखांत सापडावा, जलानें भरलेला मेघ वाऱ्यानें फाकला जावा, फलांनीं भरलेला वृक्ष दावाग्नीनें होरपळून टाकावा, त्याप्रमाणें हा गुणनिधि काळाच्या दाढेंत सापडला आहे. मित्रा, ह्या जन्मांत तुझी आणि मकरंदाची ही शेवटची भेट. तुझ्यामागें मी क्षणभर तरी जिवंत राहीन असें तूं मनांतसुद्धा आणूं नकोस. ”

ह्याप्रमाणें शोक करीत करीत मकरंद पर्वताच्या कड्यावर चढला आणि शिवाचें स्मरण करून ‘ हे गौरीपते, जेथें माझा मित्र जन्मास येईल, तेथेंच माझा जन्म होऊं दे आणि मला त्याची निरंतर संगति लाभूं दे.’ अशी त्याची प्रार्थना करून तो खालीं पाटलावती नदींत उडी टाकण्यासाठीं सिद्ध झाला. तोंच सौदामिनी नामक कामंदकीची शिष्या तेथें आली.

**सौदामिनी :** वत्सा, असें साहस करूं नकोस.

**मकरंद :** मातुःश्री, आपण कोण आहां ? मला प्रतिबंध कां करतां ?

**सौदामिनी :** मुला, तुझें नांव मकरंद काय ?

**मकरंद :** होय, मीच तो हतभागी मकरंद. सोडा मला.

**सौदामिनी :** मुला, मी योगिनी आहें. मला मालतीची माहिती आहे. माझ्याजवळ तिची खूण आहे. ही पाहा तिच्या गळ्यांतली बकुल पुष्पांची माला.

**मकरंद :** ( माळ पाहून आश्चर्यानें ) काय ? मालती अद्यापि जिवंत आहे ?

**सौदामिनी :** होय, अगदीं खुशाल आहे. तूं जीव कां देत होतास ? माधव खुशाल आहे ना ? कोठें आहे तो ?

हें ऐकून मकरंदास अत्यंत आनंद झाला आणि त्यानें सौदामिनीस माधव जेथें मरणोन्मुख होऊन पडला होता त्या स्थळीं नेलें आणि जातां जातां तिला सर्व वृत्त निवेदन केलें.

माधव नुकताच सावध झाला होता. विरहव्यथेची विस्मृति पाडणाऱ्या मूर्च्छेतून आपणांस जागें केलें ह्याबद्दल तो वाऱ्यास दूषण देत होता. आपणांस वाऱ्यानें निदान मालतीकडे तरी न्यावें अशी तो वाऱ्याची हात जोडून प्रार्थना करूं लागला. इतक्यांत सौदामिनीनें माधवाच्या हातावर मालतीची बकुलमाला टाकून दिली.

माधवानें ती माला तत्क्षणीं ओळखली. त्याच्या चित्तास धीर आला आणि तो हर्षनिर्भर होऊन म्हणाला, " प्रिय मालती, लपून बसलीस काय ? थांब, तुला मी शोधून काढतों. "

हातांतील मालेस उद्देशून तो म्हणाला, " हे माले, तूं माझ्यावर मोठा उपकार केलास. " असें बोलून तो आजूबाजूस पाहूं लागला. तों सौदामिनी सन्मुख येऊन उभी राहिली आणि कपालकुण्डलेनें मालतीस कां उचलून नेलें, मालतीच्या किंकाळ्या ऐकून आपण कसें धावून गेलों, मालतीनें खूण म्हणून दिलेली बकुलमाला कशी आणली आणि माधवाच्या हातावर टाकिली, इत्यादि हकीकत माधवाला निवेदन केली आणि " चल, हें कसें काय घडलें तें मी तुला प्रत्यक्ष दाखवितें " असें म्हणून ती मंत्रसामर्थ्यानें माधवास बरोबर घेऊन निघून गेली.

आपला मित्र दिसत नाहीं हें काय गूढ आहे तें मकरंदास कांहींच उकलेना. तो अगदीं स्तिमित व भयभीत झाला. शेवटीं भगवती कामंदकीला गांठून हा सर्व वृत्तान्त निवेदन करावा, असा विचार करून तो तिकडे चालता झाला.

तिकडे कामंदकीच्या मठांत काय चाललें होतें ? आपण प्रयत्नांची पराकाष्ठा केली असून ह्या थरास गोष्टी आल्या हें पाहून सर्वांस वैताग

आला. मालतीचा थांग कोठेंच लागेना म्हणून सर्वजण डोंगरावरून कडेलोट करण्यास सिद्ध झालीं. कामंदकी सर्वांची समजूत घालीत होती, पण कोणाचीच समजूत पटेना. अखेरीस तीही प्राणत्याग करण्यास उद्युक्त झाली. मालतीचे वडील भूरिवसु विरक्त होऊन अग्निकुंडांत प्रवेश करण्यास सिद्ध झाले. इतक्यांत मकरंद तेथें आला आणि त्यानें पाहिलेल्या आश्चर्यकारक गोष्टींचें तो वर्णन करूं लागला. त्या वर्णनाचें जणूं प्रात्यक्षिकच कीं काय, मालती आणि माधव आकाशमार्गानें तेथें एकदम खालीं उतरलीं. सर्वांचे डोळे आनंदानें भरून आले. त्यांच्या जिवांत जीव आला. मकरंदानें माधवास विचारिलें, "माधवा, तूं आलास पण ती योगिनी कुठें आहे?" माधवानें उत्तर दिलें, "आम्ही योगिनीसहच इकडे येत होतों. वाटेंत अत्यंत दीन स्वर आमच्या कानीं पडला, त्याबरोबर ती योगिनी नाहींशी झाली."

मालतीनें कामंदकीच्या पायांवर मस्तक ठेविलें. लवंगिका व मदयंतिका मालतीस कडकडून भेटल्या. कामंदकी व मकरंद आकाशाकडे तोंड करून म्हणालीं, "हे योगिनी, तूं गुप्त कां झालीस? तूं आम्हांला भेट." ही त्यांची प्रार्थना ऐकूनच कीं काय, सौदामिनी मेघमंडल भेदून तेथें अवचित अवतीर्ण झाली. "ही मी आपली फार दिवसांची शिष्या." असें म्हणून तिनें कामंदकीस अभिवादन केलें. कामंदकी विस्मयानें म्हणाली, "कोण, कोण? सौदामिनी?" मालतीनें मध्येंच उत्तर दिलें, "हीच ती सौदामिनी. हिनेंच मला मृत्यूच्या मुखांतून वांचविलें." सौदामिनी म्हणाली, "भगवति, मालती व माधव ह्यांना मी घेऊन येत असतां वाटेंत भूरिवसु अग्निकुंडांत प्रवेश करण्यास सिद्ध झाल्याचें वर्तमान मीं ऐकलें आणि लगेच मालती-माधवांना सोडून मी तिकडे गेलें. भूरिवसूस मीं मालतीचें कुशल वृत्त सांगून त्याला आपल्या घोर निश्चयापासून परावृत्त केलें. तिकडून येतांना मीं हें पत्र आणिलें आहे, तें घ्या." असें म्हणून तिनें कामंदकीच्या हातीं तें पत्र दिलें.

पद्मावतीच्या राजानें भूरिवसूच्या समक्ष तें स्वतःच लिहिलें होतें. कामंदकीनें तें पत्र वाचलें :

" माधवा, तुझें कुल थोर होय. तुझ्या गुणांनींच आम्ही तुझ्यावर प्रसन्न झालों आहों. मालतीस तूं योग्य वर आहेस. संकटांतून मुक्त होऊन तुला मालतीचा लाभ झाला ह्याचा आम्हांला आनंद होत आहे. तुमच्या उभयतांच्या विवाहास आमची संमति आहे, एवढेंच नव्हे, तर तुमच्या आनंदांत भर घालावी म्हणून ह्या मंगलप्रसंगीं नंदनाची भगिनी मदयंतिका आम्ही तुझ्या मकरंद मित्रास देत आहों. "

पत्र ऐकून माधव म्हणाला, " भगवति, आपल्या कृपाप्रसादानें मी सर्व प्रकारें कृतार्थ झालों. "

मालती व माधव आणि मदयंतिका व मकरंद ह्यांचे विवाह मोठ्या थाटानें झाले.

भूरिवसु व देवरात ह्यांच्या बालपणच्या प्रतिज्ञा सिद्धीस गेलेल्या पाहून त्यांस अत्यंत समाधान वाटलें.

सर्वजण कामंदकीच्या चतुराईची वाहवा करूं लागले. तेव्हां कामंदकी म्हणाली, " मला जीं इतकीं कारस्थानें रचावीं लागलीं, त्याचें कारण भूरिवसूवर राजाचा कोप होऊं नये हेंच. "

त्यावर मालती म्हणते, " हीं असलीं कसलीं बाई कारस्थानें ? "

माधवालाही बोलल्यावांचून राहवेना. तो म्हणाला, " मोठ्यांचीं कारस्थानें अशींच खोल असतात. त्यांचा थांग सामान्य माणसांस कसा लागणार ? "

४०९८
आ.वा.

## स्वाध्याय

१. देवरात व भूरिवसू ह्यांनीं कोणती प्रतिज्ञा केली होती ? केव्हां ? ती कशी पार पाडली ?

२. कामंदकीनें कोणत्या युक्त्या-प्रयुक्त्या योजिल्या ?

३. ह्या कथेंत तुम्हांला कोणतें पात्र आवडतें ? कां ?

४. ह्या कथेंतील सुभाषितें लिहा.

५. 'माझ्या प्रियसखीस ह्या जिवंत मरणापासून वांचवा,' असें कोणीं कोणाला विनविलें ? केव्हां ? कां ?

६. पिंजऱ्यांतून सुटलेल्या वाघाचा उपयोग कवीनें कथानकाचा परिपोष करण्यासाठीं कसा केला आहे ? इतर कथांतील अशा प्रकारचीं उदाहरणें सांगा.

७. मकरंदाचें स्वभाववर्णन करा.

८. कामंदकीनें पतिपत्नींस कोणता उपदेश केला आहे ?

९. ह्या कथेमधले अद्भुत प्रसंग कोणते ?

१०. कथा वाचून तुमच्या मनावर कोणता ठसा उमटतो ?

११. प्रस्तुत नाट्यकथानकांतील कोणती कथा तुम्हांस विशेष आवडते ? कां ?

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ७५५८
विभाग ना. वा.
क्रमांक २९२८५
नों. दि. ९-४-६२



IRBK-0104097
IRBK-0104097